
# माणूस

शनिवार । १९ फेब्रुवारी १९७७ । पंचाहत्तर पैसे



दिल्लीतील दोन सभा

□ □

जगजीवनरामांचा राजीनामा :
पडद्यामागील हालचाली

□ □

चक्रमचक्री । दुसरी गिरकी

□ □

मतपेटीचे शस्त्र

## लोकसभा-ठाणे : ' जनता 'ला विजयाची आशा

**साप्ताहिक माणूस**

**वर्ष सोळावे – अंक अडतिसावा**

**१९ फेब्रुवारी १९७७**

**मूल्य पंचाहत्तर पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

¤

दूरध्वनी : ४३४५९

¤

# मुक्काम दिल्ली

## रामलीला मैदानावरील दोन सभा

तब्बल अठरा महिन्यांच्या राजकीय शांततेनंतर पुन्हा एकदा दिल्ली जागी झाली आहे. वरवर शांतता असली तरी बरेचसे घडत होते; पण ते सारे गुप्तपणाने, कोणालाही न समजता; न समजू देता. एक विचित्र असे गूढतेचे, गुप्ततेचे ते वातावरण होते. पण आता तात्पुरती का होईना गुप्तता, तणाव संपला आहे. दिल्लीच्या गतिमान राजकीय वातावरणाची झलक आता दिसू लागली आहे. पण हे सारे राजकीय चैतन्य पाहण्यासाठी कनॉट प्लेसचे ते सुप्रसिद्ध कॉफी हाऊस शिल्लक नाही. कारण युवराजांनी पुरस्कृत केलेल्या स्वच्छ–सुंदर दिल्ली यज्ञात त्याची पहिली आहुती पडली आहे. दिल्लीची राजकीय नाडी जाणण्याचे ते एक महत्त्वाचे स्थान होते. राजकारणी, साहित्यिक, कलावंत, विद्यार्थी, वकील इ. अनेक प्रकारचे लोक येथे कॉफीसह राजकारणाची मजा चाखत असत. त्यामुळे एका खेपेत दिल्लीच्या एकूण परिस्थितीचा अंदाज येत असे. आता त्याच कामासाठी वणवण फिरावे लागते. भर आणीबाणीतही, दबलेल्या आवाजात का होईना, लोक इथे येऊन निकराच्या चर्चा करीत असत. कॉफी हाऊसची शान कधी त्यांनी जाऊ दिली नाही. पण आता डॉ. लोहियांच्या लोकनीतीचा हा दरबार बंद पडला आहे !

पण चौका–हॉटेलात, बसमध्ये आता उघड राजकीय चर्चा सुरू झाल्या आहेत. प्रेस कॉन्फरन्सेस जोरात सुरू झाल्या आहेत. जनता पक्षाच्या पत्रकार परिषदा तर रोज होत असतात. पंचवीस वर्षांच्या राजकीय इतिहासात चार मोठे पक्ष एकत्र येऊन एकच पर्यायी पक्ष (त्यांना विरोधी म्हटलेले चालत नाही,) स्थापन करतात, ही एक महत्त्वाची घटना. त्यामुळे साहजिकच त्याविषयी पत्रकारांमध्ये उत्सुकता भरपूर, म्हणूनच रोजच पत्रकार परिषदेस तुडुंब गर्दी असते. देशी पत्रकारांच्या जोडीस विदेशी पत्रकारही असतात. रोज नव्या उत्साहाने, उत्सुकतेने सारे जमतात. एकमेकात ठरलेली प्रश्नोत्तरे, शेरेबाजी करतात आणि हाती आलेली आपापली कॉफी घेऊन 'कोण आधी'च्या शर्यतीतल्यासारखे आपापल्या वर्तमानपत्राच्या कचेरीच्या दिशेने सुटतात.

निवडणुका जाहीर झाल्या ही जेवढी अनपेक्षित व धक्कादायक घटना त्यापेक्षा अधिक जगजीवनबाबूंचा राजीनामा ही धक्कादायक व अनपेक्षित घटना. बाबूजींनी राजीनामा इतक्या अचानक व ड्रॅमॅटिकली दिला की, सारे निरीक्षक, पत्रकार अवाक् झाले. बाबूजींनी शेवटपर्यंत आपला मनोदय कमालीचा गुप्त ठेवला होता. तोही त्यांनी पत्रकारांना व पंतप्रधानांना एकदमच कळविला. इंदिराजींनी याविषयी घेतलेल्या आक्षेपास उत्तर देताना परवा बाबूजी म्हणाले, 'मी हा माझा निर्णय अखेरपर्यंत गुप्त राखला नसता तर माझे काय झाले असते कुणास ठाऊक. कदाचित मी आज तुमच्यात नसतोही.'

तर अशा रीतीने एका झटक्यात पवित्रा बदललेले जगजीवनराम व त्यांचे घर हे सध्याच्या राजकीय हालचालींचे एक केंद्र झाले आहे. त्यांच्या घरी (ते आज सरकारी बंगल्यातच राहतात.) रोज पत्रकार परिषद असते, आणि अर्थातच पत्रकारांची झुंबड असते. इंदिरा गांधींच्या निवासस्थानी रोज भरविल्या जाणाऱ्या मेळाव्यांची वर्तमानपत्रांतून इतकी जाहिरात केली जाते, पण बाबूजींच्या घराच्या आवारात जमलेल्या एकाही मेळाव्याची बातमी अजून वर्तमानपत्रात आली नाही. पत्रकार परिषदेसाठी देशी–विदेशी मूव्ही कॅमेरे, साधे कॅमेरे असलेले फोटोग्राफर्स गर्दी करतात. तेच कॅमेरे बाबूजींबरोबरच या फाटक्या कपड्यांतील खेडूत माणसांवरही फिरले तर !

रफी मार्गावरील विठ्ठलभाई पटेल हाऊस हे खासदारांचे निवासस्थान. तिथेच सर्व पक्षांची केंद्रीय कार्यालयें आहेत. गेल्या अठरा महिन्यांत सामसूम असलेल्या या कार्यालयामध्ये आता गर्दी उसळली आहे. दीड वर्षांच्या तपस्येनंतर–प्रतिक्षेनंतर कार्यकर्त्यांच्या दर्शनाचे, सहवासाचे भाग्य त्यांना लाभले आहे. कारण खासदारकीच्या राज्यवार तिकिट-वाटण्याचे काम आता संपत आले आहे. ठिकठिकाचे इच्छुक आपल्या समर्थकांच्या ताफ्यानिशी येत असत. दूरहून आलेल्यांना दिल्लींत अन्यत्र राहायला जागा नसल्याने त्यांच्या राहुट्या इथेच पडत होत्या. सर्व खोल्या त्यांना अपुऱ्या पडल्या. चरणसिंग, अटलबिहारी, सुरेंद्र मोहन यांच्याभोवती, ते आवारात आले रे आले की गर्दी जमत असे. सात, जंतरमंतर रोडवरील संघटना काँग्रेसचे ऑफिस हे आता जनता पक्षाचे ऑफिस आहे. तिथे दिवसभर माणसांचा राबता असतो. एरव्ही इथे फिरकण्याचाही संभव नसलेल्या अरुण जेठली (विद्यार्थी परिषद) पासून झाडून सर्व राजकीय शेड्सची माणसे इथे दिसली.

काँग्रेस आणि जनता पक्ष दोघांच्याही पहिल्या निवडणूक प्रचार सभा लागोपाठ दोन दिवस झाल्या. दोन्ही रामलीला मैदानावर. काँग्रेसची सभा ५ फेब्रुवारीस तर जनता पक्षाची ६ फेब्रुवारीस. काँग्रेसच्या सभेत इंदिरा गांधी बोलल्या. त्यामुळे त्याची वृत्ते सर्वांनी रसभरित, सविस्तर दिली. सभेसाठी हरियाना राज्यातूनही ट्रक्समधून लोक आणले होते. मैदानाच्या भोवती ट्रक्सचा वेढा होता. श्रोत्यांची उपस्थिती एक लाखांची पण इंदिराजींनीच त्याला जनसागर म्हटल्याने दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांनीही त्या सभेचे वर्णन तेच केले. दुसऱ्या दिवशी जनता पक्षाच्या सभेत जयप्रकाशजी बोलले. दीड वर्षानंतर त्याच मैदानावर जयप्रकाशजींचे भाषण ऐकण्यासाठी पाच लाख लोक जमले होते. संपूर्ण मैदान अक्षरशः माणसांनी फुलून गेले होते. या सभेस लोक येऊ नयेत म्हणून नेहमीच्याच ट्रिक्स योजण्यात आल्या होत्या. रामलीला मैदानाकडे जाणाऱ्या सर्व बसेस एक वाजल्यापासूनच बंद करण्यात आल्या होत्या. हरियाना व दिल्लीच्या आसपासच्या खेड्यांतून येणारे ट्रक्स दिल्लीच्या सीमेवरच अडविण्यात आले. एवढे सारे कमी पडले म्हणूनच की काय, त्या दिवशी संध्याकाळी दिल्ली टी. व्ही. वर बॉबी सिनेमा ६ वाजता दाखवला जायचा होता, तो ५ वाजता दाखविण्यात आला. निदान डिंपल तरी सभा अयशस्वी करण्यासाठी उपयोगी पडेल हा अंदाज ! पण ते काही जमले नाही. १०–१२ मैलांवरून पायी चालत लोक सभेला आले. जयप्रकाशजी सभेच्या स्टेजवर येताच सर्व श्रोत्यांनी उभे राहून त्यांचे स्वागत केले व त्यांना अभिवादन दिले. जयप्रकाशजी पाऊण तास बोलले. या सभेत जगजीवनरामही बोलले. सभेच्या ठिकाणी जनता पक्षाच्या वतीने निवडणूक निधीसाठी मदत करण्याचे आवाहन करण्यात आले होते. फक्त सभेच्या ठिकाणी केलेल्या या आवाहनास प्रतिसाद म्हणून १,०७,६३१ रुपये ५२ पैसे जमले. यात एक पैशाची नाणी होती तसेच शंभर रुपयांच्या नोटाही होत्या. एकाने आपल्या हातातील टिटोनी रिस्टवॉच मदतीसाठी फिरणाऱ्या डब्यात टाकले, तर आणखी एकाने सोन्याची अंगठी टाकली ! सभा अभूतपूर्व होती असा झाडून साऱ्या दिल्लीकरांचा निर्वाळा आहे. एक ब्रिटिश पत्रकार तर म्हणाला, एवढी मोठी आणि शिस्तबद्ध सभा मी आजपर्यंत जगात कुठेही पाहिली नाही.

ही सभा चालू असताना प्रेक्षकांच्या डोक्यापासून सुमारे १५ फुटांवरून एक छोटे पाइपर विमान दोन वेळा पुऱ्या मैदानाभोवती फिरून गेले. हे विमान सभेस किती लोक जमले आहेत त्याचा अंदाज घेण्यासाठी खास पाठविण्यात आले होते. जनता पक्षाच्या वतीने नंतर या प्रकाराविषयी पोलिसात तक्रार नोंदविण्यात आली आहे. सभेस जमलेल्या श्रोत्यांना घाबरविण्यासाठी आणि त्यांना इजा पोहोचेल एवढ्या खालून हे विमान नेण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

निवडणुका जाहीर झाल्या त्याच दिवशी आणीबाणी शिथिल करण्याचीही घोषणा झाली. परिणामी सभा-बैठका यांवरील निर्बंध आणि या निर्बंधामुळे ज्यांच्या हाती अधिकार होते त्यांचा गैरवापर कमी होईल असे वाटले होते. पण सुप्रीम कोर्टाच्या रजिस्ट्रारनी या भ्रमाचा निरास केला. त्याचे असे झाले : निवडणुका जाहीर होताच सुप्रीम कोर्ट बार असोशिएशनने 'फ्री अँड फेअर इलेक्शन्ससाठी अनुकूल वातावरण कसे असावे,' याची चर्चा करण्यासाठी असोसिएशनच्या लायब्ररी हॉलमध्ये एक वकिलांची सभा बोलावली होती. सभा केवळ निमंत्रितांसाठी होती. ठरलेल्या दिवशी वकील मंडळी सभेसाठी जमली. पाहतात तो हॉलला कुलूप. दारावर कोर्टाच्या रजिस्ट्रारच्या सहीची नोटीस लागलेली. रजिस्ट्रारसाहेबांनी सभेस बंदी घातली होती. कारण, कोर्टाच्या आवारात राजकीय विषयावर चर्चा करता येत नाही. वकील मंडळी खुल्या निवडणुकांविषयी चर्चा करतात ही देखील एक 'पोलिटिकल ॲक्टिव्हिटी' आहे असे ठरविण्यात आले. नोटीसची सुरवात 'I am directed to inform...' अशी होती.

Directed by whom ?'

या प्रकाराविषयी खेद प्रकट करणारे असोसिएशनच्या उपाध्यक्षांचे पत्रक कोणी छापले नाही. (अपवाद–इंडियन एक्सप्रेस व स्टेट्स्मन.) मात्र पत्रकाचा उल्लेख न करता काही लोक यासंबंधी गैरप्रचार करीत आहेत अशा आशयाचे रजिस्ट्रारचे पत्रक मात्र सर्वांनी छापले. सध्या सेन्सॉरशिप व तत्सम निर्बंध वृत्तपत्रांवर नाहीत !

निवडणुकात उभे राहणाऱ्या दोन्ही पक्षांचे उमेदवार अजून जाहीर होत आहेत. महाराष्ट्रातील काँग्रेसचे उमेदवार जाहीर व्हायला अपेक्षेपेक्षा जास्तच उशीर झाला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने ज्या नावांची शिफारस केली होती, त्यांपैकी एकूण २४ नावे मंत्र्यांच्या नातेवाइकांची होती. प्रदेश काँग्रेसमधील एका गटाच्या

म्होरक्यांनी याविषयी दिल्लीत येऊन आपली नाराजी नोंदविली. त्यामुळे एवढा उशीर झाला. रजनी पटेल बरेच दिवस दिल्लीत मुक्काम ठोकून आहेत. असे म्हणतात की, मुंबईतून उभे करण्याच्या उमेदवारांत दोन नावे त्यांच्या खास मर्जीतली आहेत. ती मंजूर करून घेण्याच्या खटपटीत ते आहेत.

जगजीवनराम यांच्या राजीनाम्यामुळे काँग्रेसच्या तटबंदीला भले मोठे खिंडार पडले आहे. दिल्ली, हरियाना, बिहार, उत्तर प्रदेश, पंजाब या राज्यांमधील अनेक काँग्रेसी आमदार, जि. प. सदस्य व संघटनेतील पदाधिकारी त्यांच्या बाजूस आले आहेत. खुद्द दिल्लीत दलित जातींची बहुसंख्य वस्ती असलेल्या भागातील लोकप्रिय काँग्रेस कार्यकर्ते किशोरलाल, पी. एन्. सिंग यांच्यासह १५ कार्यकर्त्यांनी काँग्रेस सोडली असून, जगजीवनराम यांना ते येऊन मिळाले आहेत. जनता पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढविण्याचे त्यांनी ठरविले असले तरी सी. पी. आय्. बरोबर नेमके कसे संबंध ठेवायचे याविषयी त्यांची नक्की नीती अजून ठरली नाही. त्यांच्याबाबतीत एवढेच म्हटले आहे की, 'ते जेव्हा निवडणूक विषयावर बोलण्यासाठी आमच्याकडे येतील तेव्हा पाहू.' बिहार हे बाबूजींचे राज्य. गेल्या निवडणुकीत तेथे काँग्रेसला एकूण मतदानाच्या ३७ टक्के मते पडली होती. बाबूजींच्या राजीनाम्यामुळे, आता त्या राज्यातली काँग्रेसची १५ ते २० टक्के मते कमी होतील (म्हणजेच यावेळी त्या पक्षास तेथे १२ ते १५ टक्केच मते मिळतील.), असा एक अंदाज व्यक्तविला जात आहे. उत्तर प्रदेशात जगजीवनराम आणि बहुगुणा या दोघांची ताकद एकत्र आल्याने तेथेही काँग्रेसला बराच धोका आहे. हेमवतीनंदन बहुगुणा हे मुख्यमंत्रिपदावरून काढले गेल्याने ते बरेच दुखावलेले आहेत. त्यांचे दुःख व क्रोध त्यांच्या वाक्या-वाक्यातून प्रगट होत असतात. त्यांच्या काँग्रेस फॉर डेमॉक्रसीची युवक शाखा उत्तर प्रदेशात स्थापन झाली आहे. तिच्या पदाधिकाऱ्यांची यादी येथे बाबूजींकडे आली आहे. पण त्यातल्या एकाही पदाधिकाऱ्यास बाबूजी व बहुगणाही ओळखत नाहीत. याचा अर्थ तिथल्या युवकांनी उत्स्फूर्तपणे ही युवक शाखा काढली आहे. बहुगुणांच्या शब्दात हा अपसर्ज असल्याने कोणत्या राज्यातून किती लोक त्यांच्याकडे आले आहेत, त्याचा अंदाज सध्या त्यांनाही लागत नाही.

जगजीवनराम यांच्या राजीनाम्याने अजूनही अनेकांना गूढ वाटते. जवळ जवळ विरोधी पक्षांनी केलेल्याच मागण्या करून त्यांनी राजीनामा दिला आहे. तथापी त्यांच्या राजीनाम्याची प्रामुख्याने तीन कारणे जाणकार सांगतात– १) लोकसभेच्या येत्या निवडणुकांसाठी बिहारमधील काँग्रेसचे उमेदवार निवडताना त्यांच्याशी विचारविनिमय केला गेला नाही. विशेषतः दलित जातीचे उमेदवार त्यांना डावलून ठरविण्यात आल्याने ते दुखावले. २) या निवडणुका संपल्यावर काँग्रेसचे जे मंत्रिमंडळ केंद्रात सत्तेवर येईल त्यातून त्यांना वगळण्याचे बेत आखले गेले होते. या बेताचा सुगावा त्यांना आधीच लागला आणि योग्य वेळी त्यांनी प्रहार केला. ३) सरकारी कारभारात आणि मंत्रिमंडळाच्या धोरण व दैनंदिन कारभारात संजय गांधींचा हस्तक्षेप दिवसेदिवस वाढत चालला. खासगीत त्यांनी याविषयी एकदोन वेळा नाराजी व्यक्तही केली होती, पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

महाराष्ट्रातल्या शरद पवारांपासून पंजाबच्या ग्यानी झैलसिंगपर्यंत सर्व काँग्रेसवाल्यांनी आणि काँग्रेस कमिटयांनी, एवढेच काय नामदेव ढसाळांनी जगजीवनराम यांच्या या 'विश्वासघातकी वर्तनाबद्दल' निषेध केला असला तरी दिल्ली प्रदेश काँग्रेसने मात्र त्यांचा निषेध केला नाही, एवढेच नव्हे तर त्यांना आपल्या कृतीचा फेरविचार करण्याची विनंती करून पुन्हा 'आत' येण्याचे आवाहन केले आहे. सध्या तरी हे येथे सूचक मानले जात आहे.

आणीबाणी व निवडणुका यांच्यात परस्पर विरोध असण्याचे कारण नाही, आणीबाणीतही निवडणुका घेता येतात ही घटनात्मक परिस्थिती आहे. पण दर वेळेला घटनात्मक परिस्थितीवर बोट ठेवून प्रत्यक्ष राजकारण चालत नसते. या निवडणुकांमध्ये काँग्रेस विरोधकांच्या निवडणुक प्रचाराचा महत्त्वाचा मुद्दा आणीबाणी चालू ठेवली हा असणार आहे. तो तसा असणे अगदी स्वाभाविक आहे. म्हणूनच विरोधकांच्या शिडातली निम्मी हवा काढून घेण्यासाठी निवडणुकांचे बराच काळ आधी (म्हणजे निवडणुकांचे अर्ज मागे घेण्याची वेळ संपल्यावर काही दिवसातच.), आणीबाणी उठविण्यात येईल असाही एक अंदाज सध्या येथे जाणकार व्यक्त करतात. आजपर्यंतच्या एकूण धक्का-तंत्राशी हे विसंगत वाटत नाही खरे!

–रत्नाकर

---

# बाबूजींचा राजिनामा पडद्यामागच्या हालचाली

**दिल्लीहून केवल वर्मा, मुंबईहून ओल्गा टेलिस, पाटण्याहून एस. पी. सागर, भुवनेश्वरहून स्वरूप जेना अन् कलकत्त्याहून वरुण सेनगुप्त यांच्या वृत्तांतून संकलित करून कलकत्त्याच्या 'आनंदबाजार पत्रिके'ने ७ फेब्रुवारीच्या अंकात प्रसिद्ध केलेल्या सुरस न् चमत्कारिक गोष्टी.**

जनता पक्षाची बैठक चाललीय् दिल्लीत.

प्रफुल्लचंद्र सेनजवळ येऊन बसले विजू पट्नायक. बसल्या बसल्या तोंड कानाजवळ नेऊन विजूबाबू म्हणाले, प्रफुल्लदा, एक दणकेबाज बातमी मिळेल तुला ह्या काही दिवसांतच.

प्रफुल्लबाबू हसून म्हणाले, तू असा कुजबुजत सांगतोय्स की, वाटतंय् चांगलीच दणकेबाज असणार बातमी. सांग ना तुझी दणकेबाज बातमी.

विजू पट्टनायकनी तोंड आणखी जवळ नेलं. म्हणाले, 'प्रफुल्लदा, खरंच दणकेबाज बातमी आहे.'

प्रफुल्लबाबूंची उत्सुकता आणखीच वाढली. ते म्हणाले, 'मग ऐकव ना. सांगूनच टाक.'

मग विजूबाबूंनी ती दणकेबाज बातमी त्यांना सांगितली: 'प्रफुल्लदा, बाबूजी काँग्रेस सोडून येतायत.'

हे ऐकून प्रफुल्ल सेन चाट पडून गेले. म्हणाले, 'काय म्हणतोस काय? बाबूजी इंदिरेला सोडणार!'

परत कुजबुजत विजूबाबू म्हणाले, 'हो प्रफुल्लदा. सगळं पक्कं झालंय्. ह्या काही दिवसांतच जाहीर होऊन जाईल.'

ही घटना आहे २६ जानेवारीची. बाबू-

जींनी काँग्रेस सोडायची असा गोळाबेरीज निर्णय अर्थातच ह्याच्याही आधीच होऊन गेला होता.

ऑक्टोबर महिना. दिल्लीतली एकमेकाला लागून असलेली दोन भवनं. उत्कल भवन न् उत्तरप्रदेश भवन. दोन चिडलेल्या व्यक्ती एकत्र बसल्यायत. त्यांच्यापैकी एकजण आहे मुख्यमंत्री, एकजण आहे माजी मुख्यमंत्री. नंदिनी सत्पथी न् हेमवतीनंदन बहुगुणा. दोघांचंही म्हणणं एकच : आता सहन करण्यापलीकडं गेलंय्. काही तरी करायलाच हवं.

पण दोघंही उमजून आहेत की, एकट्यानं काही करता यायचं नाही. दोघांचंही एकमत : वाट पाह्यला पाहिजे. संधीची वाट पाह्यला पाहिजे. अन् इतरांना गाठायला पाहिजे. तूर्त तरी गुपचूप बसण्याखेरीज इलाज नाही.

आणखी काही दिवसांनंतरची गोष्ट. नंदिनीबाई मुख्यमंत्रिपदावर शाबूत असतानाच. त्यांचं खास विमान लखनौला थांबलं. अवघ्या तासाभराकरता. नंदिनीबाईंच्याजवळ चांगली बातमी आहे. आणखी काही चिडलेल्या लोकांना गाठता आलंय्. पश्चिम बंगालमधल्या, पंजाबमधल्या, दक्षिणेतल्या पण. ते पण एकत्र यायला तयार झालेयत. बहुगुणांनी सगळं ऐकलं. ते खूष झाले. म्हंजे गाडं पुढं सरकायला लागलंय् आता. नंदिनीबाईंनी दिलेल्या सगळ्यात महत्त्वाच्या बातमीनं बहुगुणा भारीच खूष होऊन गेलेयत. बाबूजी पण म्हणालेयत पश्चिम बंगालमधल्या एकाकडं की, आता सहन करण्यापलीकडं गेलंय्.

पण काय करायचं? कसं करायचं? कुणालाच वाट सापडत नाहीय्. चिडलेले बरेचजण आहेत. पण एखादं खंबीर पाऊल टाकायची हिंमत कुणालाच होत नाहीय्. सगळेच त्रस्त होऊन आहेत.

गोहाटीचं अधिवेशन आलं एवढ्यात. तिथं पण कँक कँक खलबतं झाली गुप्त. परिस्थिती जिथल्या तिथंच. चिडलेले बरेचजण आहेत. पण वाट कुणालाच सापडत नाहीय्.

ओडिसाचं प्रकरण उद्भवलं. तिथं पण हेच चित्र दिसून आलं. नंदिनीबाई एकट्याचं झुंज देतायत. गुपचूप कुणी काहीही म्हणत असू दे, उघड्यावर कुणीच आलं नाही. सगळेच म्हणाले, योग्य वेळ ही नव्हे. वाटच बघायला हवी. काही इलाज नाही.

नंदिनीबाई वैतागल्या. सगळ्यांनाच टाकून बोलल्या. पण तरीसुद्धा कुणी जाहीर तोंड उघडायला तयार झालं नाही. मान हलवून सगळे एकच गोष्ट म्हणाले : अजूनसुद्धा वेळ आलेली नाही, वेळ आलेली नाही.

एव्हाना विरोधी गोटातला एकजण हलके हलके एकेक पाऊल टाकत होता, ह्या चिडलेल्या काँग्रेसवाल्यांच्या दिशेनं. एकजण म्हंजे विजू पट्टनायक. ते नंदिनी सत्पथींशी बोलले. नंतर बहुगुणांशी बोलले. नंतर बाबूजींशी बोलले.

इकडं दरम्यान नंदिनीबाईंनी सी. पी. आय. च्या पुढाऱ्यांना पण चाचपून बघितलं. होतं थोडंफार. गणेश पण बोलले होते ह्या लोकांशी. पश्चिम बंगालमधील एकदोघांनी पण ही गोष्ट काढली होती.

सी. पी. आय. पण चिडलेली होतीच. पण ती मंडळीसुद्धा राष्ट्रीय न् आंतरराष्ट्रीय कारणांसाठी ऑल–औट लढाईत उतरायला तयार नव्हते. नरम न् गरम–दोन्ही उपाय योजत राहावेत, असं त्यांना वाटत होतं. त्यांच्यावर प्रचंड हल्ला झालेला असूनसुद्धा ते हातघाईच्या लढाईत उतरायला तयार नव्हते.

इकडं देशात व्यापक मुक्तिपर्व सुरू झालं. रामधन सुटले. नेतेमंडळींच्या कडव्या विरोधाला न जुमानता श्रीमती कौलना प्रचंड मतांनी हरवून काँग्रेसच्या सेंट्रल पार्लमेंटरी पार्टीच्या चिटणीसपदावर निवडून आलेले रामधन. हे बाबूजींच्या अगदी घनिष्ठ मंडळींपैकी. ज्यांच्याबद्दल बोलताना पश्चिम बंगालमधल्या एका पुढाऱ्यासमोर बाबूजींना चक्क रडू कोसळलं होतं, ते रामधन. बाबूजी म्हणाले होते, पिलू मोदी पण सुटला. पण रामधन मात्र सुटला नाही. असा कारभार चाललाय !

हे रामधन सुटले. बाबूजींच्या बाजूनं उभे राह्यले. बहुगुणांची गाठभेट झाली. इतर पण बऱ्याच नेत्यांच्या गाठीभेटी झाल्या. सगळेच चिडलेले. पण सगळेच लुळेपांगळे झाल्यासारखे. कुणी एक पाऊलसुद्धा टाकायला तयार नाही. रामधनना भारी आश्चर्य वाटलं. पण सगळ्यांचा आपला एकच सूर : वेळ अजून आलेली नाही.

एवढ्यात आली निवडणुकांची घोषणा. विरोधी नेते मोकळे झाले. चंद्रशेखर वगैरे मंडळी पण बाहेर आली. रातोरात जनता पक्ष बांधला गेला. एकामागोमाग एक चमत्कार घडत चालले. राजकीय आखाड्यात धांदल माजली.

काँग्रेसच्या आखाड्यात पण धांदल सुरू झाली. प्रांताप्रांतातनं काँग्रेसी मंडळींच्यात तिकिटाकरता झोंबाझोंबी सुरू झाली. वेगवेगळ्या प्रांतातनं एकापाठोपाठ प्रस्ताव यायला लागले : सगळे अधिकार पंतप्रधानांच्या हाती सुपूर्द करावेत. निवडणुकीच्या तिकिटांच्या बाबतीत त्यांचा शब्द अखेरचा मानावा.

त्याबरोबर भुमका पसरली की, ह्या खेपेला पंतप्रधानांच्या घरनंच सगळं ठरणार. ह्या खेपेला युवक काँग्रेसच्या लोकांनाच जास्ती तिकिटं मिळणार. जुन्या न् जाणत्या नेत्यांना तिकीट मिळालं तरी त्यांच्या अनुयायांना मात्र मिळणार नाहीत. निवडणुकीनंतर जे मंत्रिमंडळ बनेल त्यातनंसुद्धा सगळ्या जुन्याजाणत्या मंडळींना वगळलं जाईल.

आता विजू पट्टनायकांच्या हालचाली आणखीच वाढल्या. चंद्रशेखर, रामधन, मोहन धारिया, चंद्रकांतम्मा ही मंडळी पण लगबगीनं कामाला लागली. हीच वेळ आहे. ह्या खेपेला तरी काँग्रेसमधली जुनी मंडळी काहीतरी करायला तयार होतील.

भराभर गाठीभेटी झाल्या. दुसऱ्या बाजूनं चुळबूळ सुरू झाली. बहुगुणा, नंदिनीबाई, गणेश, अन् पश्चिम बंगाल न् महाराष्ट्रातली काही मंडळी. ज्येष्ठ नेत्यांशी गाठीभेटी झाल्या. सगळ्यांचंच म्हणणं पडलं : हीच वेळ आहे. आता वर्तमानपत्रांची तोंडं मोकळी आहेत. आता लोकसभा पण नाही. निवडणुका होणारायत. तेव्हा आता पंतप्रधानांची बाजू जास्तीत जास्त पडती आहे. तेव्हा घाव आत्ताच घालायला हवा.

ज्येष्ठ नेत्यांना वारंवार सांगितलं गेलं : ही शेवटची संधी आहे. हा जीवनमरणाचा संधिक्षण आहे. आता आत्तासुद्धा तुम्हाला घाव घालता आला नाही, तर मग निवडणुकीत इंदिराबाईंना घसघशीत बहुमत मिळाले तर नंतर मग काहीसुद्धा करता यायचं नाही. मग तेव्हा त्यांच्या मंत्रिमंडळात त्या ज्येष्ठ नेत्यांपैकी कुणालासुद्धा घ्यायच्या नाहीत.

जुनं लोक तयार झाले. नवे लोक पण तयार झाले. ठरलं : २३ जानेवारी हा 'डी–डे ' असेल.

पण अगदी शेवटच्या क्षणी काही जुनी न् काही नवी अशी दोन्ही मंडळी मागं सरली. सगळं वाऱ्यावर उधळलं गेलं.

पण विजू पट्टनायक, चंद्रशेखर, रामधन न् बहुगुणा ह्यांनी मोडून जाणं तर सोडाच, पण वाकायला पण नकार दिला. त्यांनी जाऊन बाबूजींना धरलं : बाबूजी, तुम्ही एकटेच शंभरजणांसारखे आहात. इंदिरा गांधींवर सगळचात जबरदस्त वार तुम्हीच करू शकाल. तुम्ही बाहेर पडलात तर सगळे विरोधी पक्ष तुमचं स्वागतच करतील.

बाबूजींनी विचारलं, जनता-सी. पी. आय. —सगळे ?

विजू पट्टनायक, चंद्रशेखर न् रामधननी जनता पक्षाच्या वतीनं शब्द दिला. इकडं बहुगुणा, नंदिनीबाई न् गणेशनी सी. पी. आय. शी बोलणी केली. सगळचांनी सांगितलं : ठीक है। आम्ही बाबूजींचं स्वागतच करू.

हे बाबूजींच्या कानावर सगळं घातलं, मग बाबूजी म्हणाले, अच्छा, आणखी जरा विचार करून बघतो.

देशाच्या वेगवेगळचा प्रांतांतनं त्यांनी आपल्या विश्वासू सहकाऱ्यांना बोलावणं पाठवलं. पश्चिम बंगालचे विजयसिंग नाहर पण त्यात होते. २९ जानेवारीला विजयबाबूंना आमंत्रण मिळालं. बाबूजी फोनवर म्हणाले, निघून या. काही महत्त्वाची सल्लामसलत करायचीय.

सगळे दिल्लीत जमा झाले. दरम्यान दिसून आलं होतं की, बाबूजींच्या माणसांना काही बिहारमध्ये तिकिटं मिळत नाहीयत. मग बाबूजी म्हणाले, आता उशीर नको. मी कॉंग्रेस सोडतोय. तुम्ही माझ्याबरोबर येणार का ?

सगळे म्हणाले, हो ! आम्ही तुमच्याबरोबरच राहणार !

ठरलं की, कॉंग्रेसच्या निवडणूक समितीची बैठक भरायच्या आधीच बाबूजींनी आपला निर्णय जाहीर करून टाकायचा. असंही ठरलं की, ज्या दिवशी बाबूजी कॉंग्रेस सोडणार, त्या दिवशी सकाळी सगळचांना फोनवरनं इशारा द्यायचा.

३१ जानेवारी न् १ फेब्रुवारी दोन दिवस बाबूजींच्या घरी बैठकींमागून बैठकी होत गेल्या. १ फेब्रुवारीला सगळं पक्कं ठरून गेलं. बाबूजी पंतप्रधानांना भेटायला गेले. आणीबाणी उठवा म्हणून त्यांनी सांगितलं. पण राजीनाम्याबद्दल ते चकार शब्द बोलले नाहीत.

परत बाबूजींच्या घरी बैठक भरली लगेच त्या दिवशी रात्रीच. रात्री उशीरपर्यंत बोलणी चालली. ठरलं, आता उशीर नाहीं, बाबूजींचा निर्णय जाहीर करायचा मुहूर्त उद्या सकाळचाच.

झालंही तसंच. सकाळी उठल्याउठल्या बाबूजींनी फोनवर सगळं सांगितलं. मग त्यांनी बातमीदारांना बोलावणं पाठवलं. मग ते गेले राष्ट्रपतींना भेटायला. दरम्यान एका दूतामार्फत पंतप्रधानांच्या घरी रवाना झाला होता बाबूजींचा अखेरचा निर्णय—त्यांचा राजीनामा. □

# चक्रम्‌चक्री - दुसरी गिरकी

दीर्घस्मृती विश्वनाथ

आठवडाभर होता कुठे ? इथे केवढी गडबड उडाली आहे ! काय हो, राजकीय वानप्रस्थाश्रम ही काय भानगड आहे ?

ती भानगड उलगडायची म्हणजे माझ्या दिल्लीतल्या मुक्कामाचीच कहाणी सांगितली पाहिजे. गेला आठवडाभर दिल्लीतच होतो—आपल्या ' स्मरण–संतोष ' विठ्ठलरावांकडे.

' स्मरण–संतोष ' ही कोणती नवी पदवी ?

त्याचे काय झाले की, बाईंनी कोणतीही हट्टीपणाची गोष्ट केली तरी तिचे समर्थन करण्यासाठी इंग्लंडमधले दाखले विठ्ठलरावांना अचूक आठवतात. बाईंनी ग्रोव्हरना बाजूला सारून रेंना सरन्यायाधीश केले की, विठोबांनी इंग्लंडमधल्या अशा पन्नास घालमेलींच्या हकीकती दिल्याच; बाईंनी व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेतले की, इंग्लंडमध्येही व्यक्तिस्वातंत्र्य कसे नाही हे विठ्ठलरावांनी सिद्ध केलेच; मंत्रिमंडळातल्या कुणावर लाचलुचपतीचा आरोप आला की इंग्रजही लाचलुचपतीपासून अलिप्त नाहीत, हे दाखविणारी उदाहरणे बॅरिस्टरसाहेब देणारच. विठ्ठलरावांची स्मरणशक्ती अशी संतोषकर असल्याने बाई त्यांना ' स्मरण–संतोष ' याच नावाने हाक मारतात.

असं असं, पण तुमची आणि त्यांची काय ओळख ?

तीच तर गंमत आहे. आपल्या चाफाजीराव पाटलांना तिकीट हवे होते. विठ्ठलरावांनी पहिल्यांदाच सांगून टाकले. चाफाजीरावांना, की बाईंचा विचार लोकसभेचे पाळणाघर करण्याचा आहे–संजयसारख्या राजकारणातल्या बाबालोकांना त्या तिकिटे देणार आहेत. तुमच्यासारख्या पोटं सुटलेल्यांना तिथे वाव नाही. महाराष्ट्रातल्या खासदारांची सुटलेली पोटं फार डोळचावर येऊ लागलीत दिल्लीतल्या लोकांच्या. मी मंत्री का झालो ? पोट सुटलेले नाही म्हणून !

मग काय केलं चाफाजीरावांनी ?

चाफाजीराव व्यायाम घ्यायला लागले–जमिनीवर बसून, पाय ताठ करून हातांनी पायांचे अंगठे धरण्याचा. दोन मुलांना बांबू देऊन बाजूला उभे करीत.

कशाला ? बघ्यांची गर्दी हटवायला ?

नाही. पोट आत ढकलायला. चाफाजीराव पुढे वाकले, की पोरे पोटावर बांबू रोवून पोट आत ढकलायला लागत. होता होता पंधरवडयात बरेच सुटसुटीत झाले. मला म्हणाले, ' चला, दिल्लीला बॅरिस्टरसाहेबांना भेटायला ' गेलो, आणि राहिलो मंत्रिसाहेबांकडेच.

पुढे ?

पोचलो सकाळी. दुपारी विठ्ठलरावांनी नेलं बाईंच्या कोठीवर. तिथे ही धमाल !

जगजीवनरामांनी राजीनामा दिल्यामुळे उडालेली गडबड असेल ?

छे, हो ! बाबूजी गेल्यामुळे बाई गडबडतील काय ? आणि बाई गडबडत नाहीत तोपर्यंत कुणीच गडबडत नाही. तिथे गडबड निराळीच होती. मेनकादेवी लागल्या होत्या

माताजींच्या मागे की, 'मला तिकीट पायजे,' म्हणून.

मेनकादेवी कोण ?

संजयच्या पत्नी. त्या म्हणाल्या, 'मला अमक्या-तमक्या जिल्ह्यातनं पत्रं आल्येत उभ्या राहा म्हणून. तेव्हा तिकीट पायजे.' बाईंनी तावडतोब सांगितले बारुआंना की, 'तिकीट द्या.'

म्हणजे सुटलाच की प्रश्न.

पण तितक्यात आपल्या विठ्ठलरावजींची स्मरणशक्ती आड आली. म्हणाले, 'देवीजींचं वय कमी पडतं.' बारुआ म्हणाले, 'बोलवा लोकसभा आणि करून टाका घटनेत दुरुस्ती.'

पण विठ्ठलराव म्हणाले, 'लोकसभा बरखास्त केली आहे.'

पेचच आला म्हणायचा.

तर काय! बाई म्हणाल्या, 'अशी ही घटना! जिथे तिथे आडवी येते. चांगलं पाळणाघर काढीन म्हटलं तर ही वयाची अट.' झालं. मेनकादेवी फुरंगटल्या. म्हणाल्या, 'मला तिकीट नाही तर, संजयला तरी कशाला?' बारुआंना काहीच सुचेना. आपली जाड गर्दन फिरवता येईल तितकी फिरवत ते इकडे तिकडे पाहू लागले. विठ्ठलराव म्हणाले, 'इथे थांबू नका आता. चाफाजीरावांना घेऊन निसटा कसे.' बाहेर आलो. चाफाजीराव म्हणाले, 'चालतच जाऊ. तितकेच अंग झडेल.' दोन तास चालत होतो. पण दिल्लीची हवा बेश, अजीबात घाम आला नाही.

मग पुढे ?

घरी पोचतो तो मंत्रिसाहेब मोटारीने आधीच पोचले होते. जयंतरावही आले.

जयंतरावही दिल्लीतच होते तर. त्यांनाही तिकीट हवं असेल ?

छे, छे! पुण्याच्या तिकिटासाठी आपले नाव पुढे येऊ नये, असा बंदोबस्त करण्यासाठी ते आले होते. धारियांना तोंड देणे सोपी गोष्ट नाही. वाचलंत ना 'केसरी'त, वसंतराव थोरातांना तिकीट मिळाल्यावर त्यांचे सांत्वन करायला किती मंडळी गेली ते! अहो, सभासुद्धा भरल्या. जयंतरावांनी मुंबईपासूनच चोख व्यवस्था केली होती, आपलं नाव कुणी सुचवू नये अशी. आता ते रामभाऊंना घेऊन 'अशी ही दिल्ली'सारखे लेख लिहायला आले असतील.

घराच्या पायरीवर जयंतराव येताच विठ्ठलरावांनी विचारलं, 'जयंतराव, बाबूजींच्या राजीनाम्यावरच ठोकलात ना आजचा अग्रलेख?' जयंतराव रामभाऊंकडे वळून म्हणाले, 'काय आहे हो, आजचा अग्रलेख?' रामभाऊंनी सांगितलं, 'राजकीय वानप्रस्थाश्रम हवाच.' रामभाऊंनी केसरी पुढे केला.

विठ्ठलरावांनी अग्रलेखावरून नजर फिरवली असेल ?

छः, दहावाची बाळेसुद्धा केसरी वाचत नाहीत. मथळा सांगताच विठ्ठलराव ओरडले, 'आयडिया!'

म्हणजे ?

हाच प्रश्न तिथे असलेल्या आम्ही सर्वांनी केला. पण विठ्ठलराव म्हणाले, 'आता मला लायब्ररीत गेले पाहिजे.'

रात्री नऊ-साडेनऊला परत आले आणि सांगायला लागले-आम्ही सगळे, म्हणजे मी, चाफाजीराव, जयंतराव, रामभाऊ तिथे होतोच.

विठ्ठलराव म्हणाले, 'एकोणसत्तरच्या अखेरीला कॉंग्रेसचे अधिवेशन मुंबईत भरलं होतं.'

'म्हणजे बाबू जगजीवनराम अध्यक्ष होते आणि यशवंतरावांनी मावळत्या सूर्याला साक्ष ठेवून समाजवादाची शपथ घेतली, तेच ना?' मी मध्येच म्हणालो.

'त्या आठवणींची इथे जरूर नाही.' स्मरण-संतोष तीव्र आवाजात म्हणाले. मी लगेच जीभ चावली. हा पाहा, फोड आहे अजून.

'तर त्या अधिवेशनात Children's Charter तयार करावा, अशी एक सूचना पुढे आली होती. लोकसभा बरखास्त झाल्यावर चांगली वेळ पाहून मी ती आठवण करून दिली. बाई म्हणाल्या, 'चांगली आठवण केलीत. नव्या लोकसभेचे आपण पाळणाघरच करू.' युनूस म्हणाले, 'संजयही आहेच.' बारूआ म्हणाले, 'भारताच्या या भावी आधारस्तंभांच्या शीलसंरक्षणासाठी..' 'हो, हो,' बाई घाईने म्हणाल्या. झाले. सर्व तिकिटे यूथ कॉंग्रेसच्या बाळगोपाळांना वाटायची, असं ठरलं.'

'म्हणून तर मी व्यायाम घ्यायला लागलो,' डुळडुळणाऱ्या पोटावर हात फिरवीत चाफाजीराव म्हणाले.

'तोच आजचा पेचप्रसंग उद्भवला,' विठ्ठलराव म्हणाले.

'असा काय पेचप्रसंग आहे?' जयंतरावांचा आवाज खरखरला.

मग विठ्ठलरावांनी मेनकाबाईंची हकीकत सांगितली असेल ?

हो ना. जयंतरावही काळजीत पडले ती हकीकत ऐकून कारण बाईंपुढली प्रत्येक अडचण म्हणजे देशाला मिळणारा धक्का. देशाला धक्का म्हणजे आपल्या घराण्यावरील संकट असे मानायचे, हे टिळकघराण्याचे व्रतच आहे.

'मी जाऊ का मेनकाबाईंची समजूत घालायला?' जयंतरावांनी सल्ला विचारला.

हाताची तुटक हालचाल करीत विठ्ठलराव म्हणाले, 'मेनकाताई नव्हे, मेनकादेवी. जयंतराव, 'ताई' हा संघाचा शब्द आहे. अजून असे शब्द तुमच्या तोंडात असणे बरे नाही. जुन्या सवयी सोडल्या पाहिजेत.' जयंतराव हिरमुसले असे पाहून विठ्ठलराव म्हणाले, 'आणि आता त्याची जरूरीही नाही.'

'विठ्ठलरावांनी तोडगा काढला वाटतं बाईंच्या अडचणीवर ?

तर. विठ्ठलराव पुढे म्हणाले, 'आता आपण लोकसभेचा वानप्रस्थाश्रमच करू या. रामभाऊ, तुमची कल्पना मला पसंत. मी मघाशीच लायब्ररीत जाऊन इंग्लंडमधल्या Old Age Pension Scheme चे अहवाल वाचले. एक रिपोर्ट तयार केला. बाईंकडे पाठवला आहे. उद्या जाऊन भेटीन. पाळणाघर नाही तर नाही. वृद्धाश्रम तरी काढू.'

मग काय झालं दुसऱ्या दिवशी ?

विठ्ठलरावांची योजना बाईंना पटली. बारूआ ओरडले, 'बूढोंको पकडके लाओ.' लगोलग जेवढे म्हातारे सापडले तेवढ्यांना तिकिटे दिली. बघा ना, वसंतराव नाईक, अण्णासाहेब मगर, सूरजमल दामाणी, हरिभाऊ गोखले, मनूभाई शहा, श्रीमाळी, राजबहाद्दुर या सगळ्या गोडाऊनमधल्या लोकांना वाळवणासाठी उन्हात काढले की नाही ते ?

पण आपले चाफाजीराव आणि उल्हास पवार यांचे काय ?

चाफाजीराव चांगलेच चिडले विठ्ठलरावां-

–र. म्हणाले, 'लहान दिसा, असं सांगितले म्हणून अर्धपोटी राहून पोटाला भोके पडेतोवर बाबू रोवून घेतले आणि आता म्हणता म्हाताऱ्यांनाच तिकिटे? मी चाललो बाबूजींकडे.' मी कशीबशी त्यांची समजूत काढली. विठ्ठलरावही म्हणाले की, 'शंकररावांना सांगून तुम्हाला साखर कारखाना संघाचे अध्यक्ष करतो.' म्हणून. उल्हास पवारांची मात्र समजूत पटेना. शेवटी विठ्ठलराव त्यांच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाले, 'गुलामा, जा बरे आता लग्नाला–मुहूर्त चुकवू नकोस. तुला राज्यसभेवर नेऊ–मग तर झाले? नाही तरी राज्यसभावाल्यांना 'एल्डर असेच म्हणतात.'

अहो, पण 'केसरी'ची वानप्रस्थाश्रमाची कल्पना काही निराळीच होती. बाबू जगजीवनराम, मोरारजीभाई अशा वृद्धांनी– ज्यांची बाईंना अडचण होत्येय अशांनी– रिटायर व्हावे, असे 'केसरी'ने लिहिले होते आणि इंग्लंडमधल्या Old Age Pensionचा आणि वानप्रस्थाश्रमाचा काय संबंध?

कसले फालतू प्रश्न विचारता हो तुम्ही! मी मघाशीच सांगितले ना की, 'केसरी' कोणीच वाचत नाही म्हणून. काँग्रेसश्रेष्ठींना वाटले असेल, 'अनुशासनपर्व'नंतर 'वानप्रस्थाश्रम' हा शब्द साजरा दिसतो. असेल काही तरी महाभारतातली भानगड. दुसऱ्या कोणी वापरण्यापूर्वी आपणच वापरलेली चांगली. Old Age Pension संबंधी म्हणाल, तर विठ्ठलरावांचे रिपोर्ट दिल्लीत कोणीच वाचत नाही. इंग्लंडच्या पार्लमेंटात १९०९ किंवा १० साली काय झाले, हे इथे कोणाला हवंय. विठ्ठलरावांचा अहवाल आहे ना, मग तो आपल्या लहरीला पाठिंबा देणारा असणार, ही सगळ्यांची खात्री.

असो. सारांश असा की, सगळ्या जुन्या काँग्रेस खासदारांना, राजेरजवाड्यांना, शेठसावकारांना, म्हाताऱ्याकोताऱ्यांना काँग्रेसची तिकिटे मिळणार आणि निवडून आलो तर ही मंडळी वानप्रस्थाश्रम लोकसभेतच काढणार.

मग विठ्ठलराव आता काय करताहेत?

गेल्या शंभर वर्षातल्या ब्रिटिश लोकसभेतल्या सभासदांच्या वयाच्या सरासरीचे आकडे गोळा करतायत. आले काँग्रेसवाले निवडून तर मिळेलच महाराष्ट्र टाईम्समध्ये आणि केसरीत तो लेख वाचायला. □

# इये मिसाचिये नगरी

## □ आदेश हाच आहे

मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा श्रीमती दुर्गा भागवत यांच्यावरील सर्व खटले मागे घेण्यात आल्याची घोषणा, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी नुकतीच मुंबईत केली. कुणावरही खटला होणे बरे नाही, अनेक खटले एकाच वेळी होणे मुळीच बरे नाही परंतु या कारवाईमुळे लोकशिक्षणाची एक संधी हुकली आहे, याचे आम्हास वाईट वाटले.

दुर्गाबाई स्वतःविषयी एकदा म्हणाल्या आहेत–

'एशियाटिक ग्रंथालय हे माझं खरं घर आहे. तिथे दिवसभर बसून अनेक देशी–परदेशी मासिकांसाठी मी लिहिते. इंग्लंड, अमेरिका, जपान, इटली येथील विद्वान मंडळींशी माझा पत्रव्यवहार चालतो–'

आता अशा संशोधनात आणि विचारात निमग्न असणाऱ्या दुर्गाबाईंना सरकारने का बरे पकडले? खटला भरण्यासारखे त्यांनी काय केले?

दुर्गाबाई नुसत्या विद्वान असत्या तर त्या सरकारविरुद्ध एखादे विद्वत्तापूर्ण विधान करून सरकारच्या रोषाला कारण होऊ शकल्या असत्या. पण तसेही नाही. भारत सरकार गांधीवादी, महाराष्ट्र सरकार गांधीवादी आणि दुर्गाबाई? त्या सांगतात–

'गांधीजींच्या शिकवणुकीचा माझ्यावर फार संस्कार आहे. जगण्याच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत त्यांनी दिलेली हाक मला ऐकू आलेली आहे. माझी संवेदनक्षमता गांधीजींनी व्यापक केली, कसदार केली. 'डेथ डान्स' या शब्दाचं गांधीजींनी केलेले 'पतंग–नृत्य' हे भाषांतर मी वाचलं तेव्हा त्यांच्या सौंदर्यदृष्टीने माझे मन भरभरून येत होतं. कोणत्याही प्रसंगी निर्णायक विचार कसा करावा, याचे मार्गदर्शन गांधीजी मला आजही करतात. 'सेन्स ऑफ कमिटमेंट' मी सांभाळते, ही गांधीजींची देणगी आहे.'

दुर्गाबाईंना पकडण्यापूर्वी त्या हे सर्व सांगत होत्या. तरी गांधीजींचा वारसा सांगणाऱ्या सरकारांनी त्यांना का बरे मग पकडले? त्यांच्या आसपास तुरुंगाचा नवा 'डेथ डान्स' का उभा केला गेला?

एका गांधीवादी, आंतरराष्ट्रीय मान्यता असलेल्या, अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा असलेल्या स्त्रीने काय केले तर तिला तुरुंगात टाकतात हे कळावे, अशी महाराष्ट्रातील असंख्य लेखकांची व विद्वानांची इच्छा होती.

कुणी म्हणतात, दुर्गाबाईंनी संजय गांधीवर टीका केली म्हणून त्यांच्यावर एक खटला भरलेला होता. त्यांनी विचारले होते म्हणे की, सरकारी तिजोरीतून पैसा खर्च करायला संजय गांधी हे कोण? लोकांचा पैसा सरकार का उधळते?

दुर्गाबाईंनी हे बोलायला नको होते. इतर कुणी लेखकांनी हे प्रश्न विचारले का? लेखक–लेखिकांनी टी. व्ही. व रेडिओवर सुखाने नांदण्याचे सोडून असे प्रश्न विचारू नयेत. तेव्हा हा एक खटला आम्हाला बरोबर वाटतो.

पण असे १२–१३ खटले आहेत! खटले उभे राहिले असते की, दुर्गाबाई काय काय बोलल्या ते वृत्तपत्रांत आले असते. इतर लेखकांना यापुढे योग्य ते मार्गदर्शन झाले असते–की काय बोलावे–काय बोलू नये!

खटले उभे राहण्यापूर्वीच पडले, हे आम्हाला यामुळे योग्य वाटत नाही. शिवाय लोकांचा असा समज होतो, की खटल्यात काही दम नव्हता, दुर्गाबाईंचा छळ करण्यासाठीच केवळ हे खटले पोलिसांकरवी सरकारने तयार केले होते. खोटे खटले भरावे व सोयीप्रमाणे चालवावे या काढून घ्यावेत, हे गुन्हेगारीला उत्तेजन दिल्यासारखे नाही का होत?

यामुळे दुर्गाबाईंवरचे खटले काढून घेतले, याचा जसा आनंद व्हायला हवा तसा काही झाला नाही. यावर आता उपाय एकच की, प्रत्येक खटला नेमका कुठल्या कारणाकरता

होता, त्यातला आक्षेपार्ह भाग कोणता, याची पुस्तिका सरकारने काढावी. मुख्यमंत्री शंकररावजी यांनी त्याला प्रस्तावना लिहावी, शक्य असल्यास इंदिराजींचा पुरस्कार मिळवावा आणि खासदार जयंतराव टिळकांच्या 'टिळक स्मारक मंदिरात' या पुस्तकाचे प्रकाशन माननीय यशवंतरावजी चव्हाण यांच्या हस्ते जमल्यास करावे.

नाही तर जर्मनीचे हेरमन हेस, गुंथर ग्रास, फ्रान्सचे सार्ले, आन्द्रे मालरो, अथवा कामू यांच्या योग्यतेच्या भारतात दुर्गाबाई भागवत या एकमेव साहित्यिक आहेत, हा अपसमज वाढीस लागण्याचा धोका आम्हाला स्पष्ट दिसतो. कारण या सर्वांच्या मते, राजकारण हा माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे आणि लेखनस्वातंत्र्य, उच्चारस्वातंत्र्य हा लेखकांचा जन्मजात वारसा आहे आणि तो जोपासण्यासाठी—

आदेश हाच आहे, उपदेश हाच आहे.
ज्ञानेश योगियाचा संदेश हाच आहे.
वाणीस सर्वभावे आम्ही सदा भजावे
तिज बंधमुक्त करण्या स्वप्राणही त्यजावे

※

## □ 'मला बाई—लग्नात रस नाही'

गणिकांचे आयुष्य दुःखद असते, असा समज आहे. लेखकांनी व विशेषतः नाटककारांनी हा समज त्यांच्या उद्धाराची नाटके लिहून बळकट केला आहे. पाटलीपुत्रातली मंबाई ही गणिका तरुण होती, म्हणून सुंदर होती. अशा बाईकडे राजाचे लक्ष न गेले तरच नवल. राजाच्या कानावर मंबाईच्या देहाचा गौरव पोचताच त्याने तिला वश करण्यासाठी अहेरांचा खुराक सुरू केला.

राजाला फार दिवस वाट पाहावी लागली नाही. एक दिवस रात्रीच्या समयी मंबाई राजवाड्यात दाखल झाली. शयनगृहात गेल्यावर राजाने खुलासा केला—

'हे सुंदरी! मी राजा आहे. मला तुझ्याशी उघड संबंध ठेवणे परवडणार नाही. पण रात्रीच्या प्रहरी, नागरिक झोपी गेले की, मी तुझी वाट पाहीन.'

राजाचे व मंबाईचे संबंध हळूहळू दृढ होत गेले. संबंध दृढ झाले की त्याचा गवगवा टळत नाही. प्रधानाच्या कानावर ही गोष्ट गेली. राजा आपल्या कह्यातून निसटून यःकश्चित गणिकेच्या तंत्राने वागू लागला; ही गोष्ट त्याच्या चाणाक्ष नजरेतून सुटली नाही. त्याने धूर्तपणे पावले टाकण्यास सुरुवात केली. एका समारंभाच्या निमित्ताने त्याने आपले अस्त्र बाहेर काढले.

पाटलीपुत्रात रोज एक पुतळा रस्त्यावर बसत होता. अशाच एका पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी प्रधानाने भाषणात सांगितले—

'आपले शहर सुंदर आहे. जागोजागी बसवलेल्या पुतळ्यांमुळे ते अधिक अधिक सुंदर होत आहे. पण या शहरावर एक कलंक आहे. इथेही या सुंदर शहरात गणिकांची वस्ती आहे. शहराचे आरोग्य त्यामुळे धोक्यात येते. तेव्हा 'गणिका नष्ट करा' ही मोहीम जनतेने हाती घ्यावी. कागदी फलक सरकार तयार करील. मोहीम जनतेने करायची आहे.'

प्रधानजींच्या या घोषणेमुळे पाटलीपुत्रात एकच खळबळ उडाली. गणिकांनी गाव सोडावा असे कोणालाच वाटत नव्हते. लहान मुले सोडली तर बहुतेकांनी तिथला पाहुणचार झोडलेला होता. मंबाईशी तर प्रत्यक्ष राजाचे संबंध आहेत, हे जवळ जवळ सर्वांना ठाऊक होते. पण प्रधानजींच्या मोहिमेला विरोध करायला कोणी धजावत नव्हते. विनाचौकशी तुरुंगात पडायला माणसे तयार नव्हती.

मंबाई मात्र मुळीच घाबरलेली नव्हती. राजाच्या गळ्यातले आपले हात हा तिचा आधार होता.

एका रात्री तिने राजा ऐन रंगात आला असताना रुसण्याचे हत्यार काढले—

'तुमचं माझ्यावर मुळीच प्रेम नाही.'

'असं का म्हणतेस?...' राजा अधिक जवळ सरकत तिला मिठीत घेत म्हणाला.

'मग प्रधान बदलावा शिरीमंतांनी. 'गणिका नष्ट करा' मोहीम मेल्याने काढली आहे!'

राजाने त्वरित कारवाई केली. प्रधानाला त्याने 'मोहीम थांबवता का राजीनामा देता?' असा सवाल टाकला. प्रधानाने राजीनामा दिला!

गावातल्या एका सत्प्रवृत्त तरुणावर या घटनेचा फार विपरीत परिणाम झाला. 'गणिका नष्ट करा' अशी मोहीम योग्य नाही असे त्याला वाटत होते. गणिका समाजातूनच निर्माण झाल्या. त्या नष्ट होणार नाहीत, समाजानेच त्यांना पुन्हा पचवले पाहिजे, असे त्याच्या मनाने घेतले. गणिका नष्ट करण्यापेक्षा त्यांचा उद्धार करायचा, तरुण गणिकांशी तरुण नागरिकांनी लग्ने करायची!

एके दिवशी सकाळी हा तरुण मंबाईकडे गेला. दारावरची कडी त्याने वाजवली. राजाकडे रात्र घालवून ती पहाटेसच घरी आली होती. झोपमोड केल्याने ती काहीशी त्रासलीच. अंगाला आळोखेपिळोखे देत तिने दरवाजा उघडला.

तरुणाने अदबीने विचारले—

'आत येऊ का?'

'यावा की, रात्री आलात तर पैसे पडत्यात—'

तरुण म्हणाला—

'बाई, मी त्यातला नाही. 'गणिका नष्ट करा', ही मोहीम प्रधानांनी काढली ती मला मान्य नाही.'

'सकाळच्यापारी कशाला त्या भडव्याचं नाव घेता? जाऊ दे. मरू दे. तुमचं काय काम हाय ते पटापटा बोला.'

तरुण या सरबत्तीने थोडा बावचळला. धीर गोळा करीत म्हणाला—

'तुम्ही तरुण आहात, सुंदर आहात—'.

'नायतर धंदा चालेल का आमचा?'

'पण हा धंदा वाईट आहे. तो तुम्ही सोडावा अशी विनंती करण्याकरिता मी आलो आहे.'

'धंदा सोडा—अन् करू काय?'

तरुण हर्षभरित होऊन म्हणाला—

'मी लग्न करायला तयार आहे तुमच्याशी!'

मंबाई गालातल्या गालात हसली. तिने राजवाडा पाहिला होता. तिथली श्रीमंती पाहिली होती. ज्या राण्या नसतात आणि गणिकाही नसतात, अशा स्त्रिया दुःखात जगतात हे तिला माहीत होते. तिने त्या उत्साही तरुणाला सांगितले—

'मला लग्नात रस नाही!'

लग्नाचे मोसम येतील आणि जातील, पण मंबाई राजरोस बंधनात अडकणार नाही. राजाशी आणि धनिकपुत्रांशी संबंध ठेवून जगणे तिला अधिक सुखाचे आहे, सोयीचे आहे.

पुन्हा केव्हा तरी पाटलीपुत्रात 'गणिका नष्ट करा' ही मोहीम हाती घेतली जाईल.

लोक हसतील. गणिका कधीही नष्ट होणार नाहीत आणि लग्नात त्यांना रस नाही, ही गोष्ट सर्वांना ठाऊक आहे. राजवाड्याच्या आधाराने, धनिकपुत्रांच्या आधाराने त्यांचे दिवस सुखात जाणार आहेत. □

# सोलकढी

## □ निळू दामल्यांच्या दंडातल्या बेटकुळ्या

आणीबाणीच्या अठरा महिन्यांच्या काळात आपली वर्तमानपत्रे, ब्राह्मणी खानावळीतल्या आंबटवरणाइतकी मचूळबेचव होऊन राहिली होती. सकाळच्या प्रबोधक जांभयांची माळ पुरी होण्याआधीच वर्तमानपत्र वाचून संपायचे आणि नव्या टवटवीत जांभया यायच्या. एक उरकण्याची गोष्ट, अशा कोरडेपणाने वर्तमानपत्र वाचले जायचे, एरवी वर्तमानपत्र वाचताना, चहासारख्याच कढत वाफा माझ्यातून निघत असतात. आधी वर्तमानपत्र नुसते हातात घ्यायचे, मग ठळक बातम्यांवरून अधाशी नजर फिरवायची, मग कुठे–काय–कधी–कोण पाहायचे, तेवढ्यात वाचायला सोयीचे जाण्याइतपत वर्तमानपत्र चुरगळायचे, आणि मग बातम्यांचे घुटके घेत घेत वाचत राहायचे. लोकशाहीतल्या सामान्य माणसाचा हा सर्वांत मोठा आनंद. त्याला मुकलो होतो आपण. मुंबईचा मराठी वाचक सवयीने आपला 'महाराष्ट्र टाइम्स' अथवा 'लोकसत्ता' अथवा 'नवशक्ती' अथवा 'नवाकाळ' वाचायचा. अनंतराव 'महाराष्ट्र टाइम्स'-वाले. (पण इतरातसुद्धा डोकावणारे.) आणीबाणीच्या काळातसुद्धा गोविंदराव तळवलकर मधूनमधून फोडणीचे लिहायचे. आपले जुने बॉलपेन वापरायचे. पण एकूण शाईवर जरा तवंग आला होता.



अशा अवस्थेत आम्ही औरंगाबादेहून निघणाऱ्या 'मराठवाड्या'चे चाहते वाचक झालो यात नवल नाही. आधीसुद्धा आम्ही 'मराठवाड्या'त क्वचित डोकावत होतो. पण ते खरे नव्हते. 'मराठवाड्या'चे संपादक अनंतराव भालेराव यांचे नाव आणि कर्तृत्व ऐकून होतो. आणीबाणी जारी झाल्यानंतर चारच महिन्यांत अनंतराव भालेरावांना अटक झाली, आणि 'मराठवाड्या'चा सांभाळ करायची जबाबदारी आमचे मित्र निळू दामले यांच्यावर येऊन पडली. 'माणूस'च्या जुन्याजाणत्या वाचकांना (म्हणजे सगळ्याच की. 'माणूस' वाचू पाहणारे नवेनेणते वाचक आहेत कोठे?) निळू दामल्यांची ओळख करून द्यायची गरज नाही : वसईशी जसे चिमाजी अप्पांचे तसे मानवतशी निळू दामल्यांचे नाव कायमचे निगडित झाले आहे.

गांभीर्याने आणि खांबीर्याने करायच्या भानगडीत सदैव झटपटत असले तरी हे निळू दामले चक्क तरुण आहेत. (काँग्रेसमध्ये असते तर 'युवक'च झाले असते.) चांगला आवाज करत हसतात वगैरे. बेहिशेबी गप्पा मारतात. रंगीबेरंगी सदरे घालतात. बूटसुद्धा वापरू शकतात. खरे म्हणजे ते सिनेपत्रकार म्हणून शोभून दिसले असते. पण समाजवाद्यांच्या नादाला लागले आणि जे व्हायचे ते होत होत, आता 'मराठवाड्या'च्या गढीच्या रखवालीला आले. आणीबाणीत संपादक अनंतराव भालेराव नाशिकच्या तुरुंगात स्थानबद्ध झाल्यावर निळू दामल्यांच्या रखवालीची कसोटी लागली. तिला ते पुरेपूर उतरले, अशी 'सोलकढी'च्या अनंतरावांची साक्ष आहे.

निळू दामल्यांनी या काळात 'मराठवाड्या'ची बाकीची पाने तर नीट सांभाळलीच, पण अग्रलेखातून, वाचकांच्या आणीबाणी-विरोधाला जितके कढ काढता येतील तितके काढायचा शिताफीने प्रयत्न केला. यासाठी कधी आंतरराष्ट्रीय राजकारणाची माहिती देण्याचा आधार घेतला; कधी साहित्यचर्चेचे निमित्त काढले; कधी प्रांतीय राजकारण–समाजकारणावर टीकाटिप्पणी केली; कधी काँग्रेसश्रेष्ठींसंबंधीच्या आंबटतुरट बातम्या घेऊन चघळल्या. (रजनी पटेलांनी इंडो–अमेरिकन सोसायटीच्या जाहीर सभेत मुंबई येथे केलेले भाषण; सुप्रसिद्ध नर्तकी सोनल मानसिंग यांच्याकडून संसदेच्या पुढील अधिवेशनात खासदारांना नृत्याचे पाठ द्यायची खासदार वसंत साठे यांची योजना–२३।९।७६; कर्नाटकचे मुख्यमंत्री देवराज अर्स यांनी घरशोभेसाठी केलेला अवाढव्य खर्च–२६।४।७६; इत्यादी.) कधी देशविदेशच्या घटनांवर औपरोधिक मल्लिनाथी केली. (त्र्यं. सी. कारखानीसांचा काँग्रेसप्रवेश – १६।१०।७६; अमेरिकेत तुरुंगांची संख्या कमी पडणे–९।९।७६.)

पंधरा महिन्यांनंतरच्या कारावासानंतर अनंतराव भालेराव पुन्हा आपल्या संपादकीय खुर्चीत विराजमान झाले आहेत. निळू दामले आता अन्य भानगडींची उचकाउचक करायला काहीसे मोकळे होतील. गेल्या सव्वा वर्षातल्या अनुभवामुळे आपल्या उजव्या-डाव्या दंडातल्या बेटकुळ्या विशेष टणक झाल्यासारख्या त्यांना वाटल्या तर ते सहज समजण्यासारखे आहे.

त्यात 'सोलकढी'च्या अनंतरावांकडून शाबासकी; म्हणजे बेटकुळ्यांचे एकूण कठीणच आहे.

—अनंतराव

लेखांक दुसरा

## राजकीय जागरूकता अधिक महत्त्वाची

# मतपेटीचे शस्त्र

वा. दा. रानडे

जास्तीत जास्त मतदान आणि अचूक मतदान या मतदाराची जागरूकता कितपत वाढली आहे, हे पाहण्याकरता दोन कसोट्या झाल्या. पण जागरूकतेची यापेक्षाही खरी महत्त्वाची कसोटी म्हणजे मतदाराची राजकीय जागरूकता. राजकीय पक्षांच्या भूमिका मतदारांना कितपत माहीत असतात? जाहीरनामे किती जणांनी वाचलेले असतात? मत कोणाला द्यावयाचे याचा निर्णय स्वतःच्या विचाराने किती मतदार घेतात? याबाबतीत पुढाऱ्यांची भाषणे, पत्रके, प्रलोभने, आश्वासने, सत्ता, पैसा आणि जात यांचे दडपण कितपत प्रभावी ठरते? मतदारांची जागरूकता अजमावताना या या सर्व प्रश्नांचा विचार करणे आवश्यक आहे. याबाबतीत काही राज्यांपुरते किंवा मतदारसंघापुरतेच मर्यादित असे काही अभ्यास झालेले आहेत. त्यावरून मतदारांच्या जागरूकतेची काहीशी कल्पना देते, पण सबंध भारताच्या दृष्टीने सर्वंकष पाहणी किंवा अभ्यास होणे आवश्यक आहे. अशा सर्वंकष पाहणीच्या अभावी आतापर्यंत ज्या मर्यादित स्वरूपाच्या पाहण्या झाल्या, त्यावरून काही निष्कर्ष काढता येतील.

बिहारमधील आराह येथील एच. डी. जैन कॉलेजचे प्राध्यापक बी. बी. मुजुमदार यांनी १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी तेथील ३२५ मतदारांची एक पाहणी केली. या मतदारांत शेतकरी, दुकानदार, फेरीवाले, रिक्षावाले, वकील, डॉक्टर, जमीनदार, विद्यार्थी, मध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्रिया अशा विविध थरांतील मतदारांचा समावेश होता. त्यांच्याकडे एक प्रश्नपत्रिका पाठविण्यात आली आणि कॉलेज विद्यार्थ्यांनी त्याची उत्तरे गोळा केली. या ३२५ पैकी ८९ जणांना लोकप्रतिनिधींची ही निवडणूक ज्यासाठी आहे त्या विधिमंडळाची म्हणजे बिहार विधानसभा व लोकसभा यांची नावे बरोबर सांगता आली नाहीत. ४२ जणांना उमेदवारांची फक्त नावे माहीत होती. आम्हाला निवडणुकीत रस नाही आणि आम्ही मत देणार नाही, असे काही जणांनी स्पष्टपणे सांगितले. या पाहणीत ३२ स्त्रियांचा समावेश होता. त्यांच्यापैकी बारा जणींनी सांगितले की मतदान हे स्त्रियांचे काम नाही. पुरुषमंडळी सांगतील त्याप्रमाणे आम्ही मत देऊ, असे नऊ जणींनी सांगितले.

प्रा. स. वा. कोगेकर यांनी १९५२ च्या निवडणुकीचे वेळी पुण्यात विधानसभेच्या पुणे नैर्ऋत्य मतदार संघात एक पाहणी केली. लोकसभा मतदारसंघाची ही पाहणी नसली तरी लोकसभेसाठी तेच मतदार असल्याने मतदारांच्या जागरूकतेची कल्पना त्यावरूनही येऊ शकते, या उद्देशाने त्या पाहणीचे निष्कर्ष येथे देत आहे. बारा प्रश्नांच्या एका प्रश्नपत्रिकेवर ७१ विद्यार्थ्यांनी मतदारांच्या मतदानाच्या आधी मुलाखती घेतल्या. ५३२ मतदारांनी उत्तरे दिली. त्याचे विश्लेषण करता असे दिसून आले की, आपले नाव मतदारयादीत आहे की नाही, हे १८२ मतदारांना माहीत नव्हते. प्रतिनिधी कशासाठी निवडून द्यावयाचे अहेत याची माहिती २५२ जणांना नव्हती. १४४ जणांना निवडणूक लढविणाऱ्या एकाही पक्षाचे नाव माहीत नव्हते तर ६७ जण फक्त चार किंवा अधिक पक्षांचे नाव सांगू शकले. आपण विशिष्ट पक्षाला मत देणार, असे १५५ जणांनी सांगितले, तर आपण उमेदवारांचे वैयक्तिक गुण पाहून मत देणार असे १७४ जणांनी उत्तर दिले; ८४ जणांचा काहीच निर्णय झाला नव्हता, ११९ जणांनी काहीच उत्तर दिले नाही. या निवडणुकीत कोणते प्रश्न आहेत, असे विचारता १९७ जणांनी काहीच उत्तर दिले नाही. पण बाकीच्या ३३५ जणांनी दिलेल्या उत्तरात सर्वांत जास्त म्हणजे ३०५ वेळा अन्न व कापडाचा उल्लेख होता. बेकारी ३८, जमीनदारी निर्मूलन ३१, परराष्ट्र धोरण २४, दारूबंदी २०, हिंदु-कोड बिल १३, सरकारी कारभारातील भ्रष्टाचार ९, साक्षरता ९, संयुक्त महाराष्ट्र ५, लोकसंख्या नियोजन ३, निर्वासित २, शिक्षण २, आर्थिक समता १, व्यक्तिस्वातंत्र्य १ असा इतर प्रश्नांचा क्रम होता.

### पैशाचा प्रभाव

मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी पंजाबमध्ये १९५२ च्या निवडणुकीत पैशाचा कसा उपयोग केला गेला, याचा उल्लेख होशियारपूरच्या गव्हर्मेंट कॉलेजचे प्राध्यापक बोधराज शर्मा यांनी ' रिपोर्टस ऑन दि इंडियन जनरल इलेक्शन्स- १९५१–५२' या प्रा.स. वा कोगेकर आणि रिचर्ड एल पार्क यांनी संपादित केलेल्या पुस्तकातील लेखात केला आहे. ते म्हणतात, 'पैशाचा वापर निरनिराळ्या प्रकारे केला जातो. काही वेळा तो धर्मादायाचे रूप घेतो. कांग्रेसच्या काही उमेदवारांनी गरिबांना कांबळी व धोतरे वाटली. काही ठिकाणी शाळा, विहीर किंवा तळ्यासाठी पैसा देण्याचे आश्वासन देण्यात आले. पैशाची थैली जेवढी मोठी त्या प्रमाणात दानही मोठे, त्याचा फायदाही मिळणारेही जास्त आणि मतेही जास्त. निवडणुकीच्या आदल्या दिवशी संध्याकाळी मद्याची पार्टी झालीच पाहिजे, अशी शीख वस्तीत प्रथा आहे. काही उमेदवारांनी पार्ट्या दिल्या. प्रतिस्पर्धी उमेदवार विकत घेण्यासाठीही पैसा देण्यात आला. मोठे चेक दिले गेल्यानंतर काही उमेदवारांनी काही ठिकाणी मतदारसंघात माघार घेतली, असे आरोप उघडपणे केले जात होते. काही ठिकाणी माघार घेणाऱ्या उमेदवारांचा किंवा त्यांच्या नातलगांचा निराळ्या प्रकारे फायदा झाला. ज्या उमेदवारासाठी माघार घेतली त्यांच्या नियंत्रणाखालील संस्थेत त्यास मोठ्या जागा देण्यात आल्या. काही ठिकाणी पैसा मतदारांना उघडपणे वाटण्यात आला. निर्वासितांच्या छावण्या आणि हरिजन मतदारांच्या बाबतीत हे विशेषतः घडले. पैशाने मत मिळाले की नाही याची मात्र शंका आहे. काही हुषार मतदारांनी दोन्ही बाजूकडून किंवा दोनपेक्षा अधिक उमेदवारांकडून पैसा घेतला, पण मत कोणालाच दिले नाही.'

होशियारपूर जिल्ह्यातल्या अंब मतदार संघातील एक मतदार

म्हणाला, 'एका उमेदवाराने मला तीन रुपये व दुसऱ्याने दोन रुपये देऊ केले. दोघांकडूनही मी ते आभारपूर्वक स्वीकारले.' 'मग मत कोणाला दिलेस असे विचारता तो म्हणाला, 'दोन रुपये देणारास मी मत दिले. कमी पैसे देणारा कमी अप्रामाणिक आहे आणि तो अधिक चांगला लोकप्रतिनिधी ठरेल, असा मी विचार केला.'

निवडणुकीतील पैशाच्या वापराचे हे प्रकार काही पंजाबपुरतेच मर्यादित नाहीत. थोड्या फार फरकाने सर्वत्र ते चालतात, असा अनुभव १९५२ च्या पहिल्या निवडणुकीपासूनच आलेला आहे.

## जातीचा प्रभाव

पैशाप्रमाणेच जातीचा प्रभाव मतदारांवर कसा असतो, याकडे वर उल्लेखिलेल्या पुस्तकातील उत्तरप्रदेशासंबंधीच्या टिपणात लक्ष वेधले आहे. पुस्तकाचे संपादक प्रा. कोगेकर आणि पार्क यांनीच हे टिपण तयार केले आहे. ते लिहितात :

'मतदारांनी मत कोणाला द्यावयाचे याचा अंतिम निर्णय घेताना उत्तर प्रदेशात जातीय व धार्मिक भावनांचा बराच पगडा दिसून आला.

१) निरनिराळ्या पक्षांनी उमेदवार निवडताना मतदारसंघाची रचना जातींच्या दृष्टीने कशी आहे, याला बरेच महत्त्व दिले. अपक्ष उमेदवारांनी तर मते मिळविण्यासाठी जातीनिष्ठेचा फायदा घेण्याचा उघड प्रयत्न केला.

२) पूर्वेकडील जिल्ह्यात काँग्रेसजनांनी 'शोषित संघ' ही संघटना स्थापन केली. शोषित जातींच्या लोकांची मते मिळविणे हा त्यामागे उद्देश होता. पश्चिमेकडच्या जिल्ह्यातील पाच जातींच्या उमेदवारांनी अशीच एक संघटना स्थापली. मतदारसंघाचा आकार लहान असल्याने जात व पोटजातीच्या भावनांचा उपयोग झाला.

३) सुन्नी मुस्लिमांनी काँग्रेसविरुद्ध मत द्यावे, असे आवाहन उत्तरप्रदेश सुन्नी बोर्डाने केले, पण काही ठिकाणी काँग्रेस उमेदवारांना पाठिंबा देण्याबाबत शिया व सुन्नी मुस्लिमात करार झाला.

४) पावणेपाच लाख निर्वासितांची मते तसेच दहा लाख शिखांची मते काँग्रेस पक्ष आणि त्यांचे जातीयवादी प्रतिस्पर्धी यांच्यात विभागली गेली.

५) चौदा टक्के मुस्लिम मतदारांनी मुख्यतः काँग्रेसला मते दिली.

६) वीस टक्के हरिजन मतदारांपैकीही बहुतेक मतदारांनी काँग्रेसला मते दिली. विधानसभेतील हरिजनांच्या ८३ राखीव जागांपैकी ८२ काँग्रेसने जिंकल्या व एक अपक्ष उमेदवारास मिळाली. शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशनचा फारसा प्रभाव दिसला नाही.

७) विधानसभेत ३७ मुस्लिम निवडून आले. त्यापैकी ३६ काँग्रेस पक्षाचे व एक अपक्ष आहे.

८) फैजाबादजवळच्या बाबरी मशीदप्रकरणी निर्माण झालेल्या धार्मिक भावनांचा गोंडा जिल्ह्यातील हिंदुसभेच्या उमेदवारांनी पूर्ण उपयोग करून घेतला.

९) धार्मिक भावना चेतविण्याचा व निवडणुकीत त्याचा फायदा घेण्याचा महासभा, जनसंघ आणि रामराज्य परिषद यांचा प्रयत्न यशस्वी झाला नाही.

१०) अल्मोडा, नैनिताल, डेहराडून, गढवाल आणि तेहरी-गढवाल या पहाडी जिल्ह्यांत ब्राह्मण-ब्राह्मणेतर भावना तीव्र होती. काँग्रेस पक्षावर ब्राह्मणांचे वर्चस्व असल्याने ब्राह्मणेतरांचा त्यास विरोध होता. ब्राह्मण पुढारी आमच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष करतात, असे कारण देऊन, या जिल्ह्यांत बहुसंख्य असलेल्या ठाकूर जमातीने काँग्रेसला विरोध केला. ब्राह्मणांतील उच्च व कनिष्ठ पोटजातीतही संघर्ष होता. त्याचा फायदा सर्व उमेदवारांनी करून घेतला.'

निवडणुकीतील जातीच्या प्रभावाचे हे चित्र उत्तर प्रदेशापुरतेच मर्यादित नसून, थोड्याफार फरकाने इतर राज्यांतही १९५२ च्या पहिल्या निवडणुकांपासूनच आढळते.

१९५२ ची निवडणूक म्हणजे एकवीस वर्षांवरील सर्व प्रौढांना मताचा हक्क मिळालेली पहिलीच निवडणूक. अनेकांना मतदानाचा हा पहिलाच अनुभव. राजकीय पक्षांच्या भूमिका समजून घेऊन मतदान करण्यापेक्षा निवडणूक चित्रांचाच प्रभाव मतदारांवर पडला. त्यांच्या अज्ञानामुळे अनेक गमतीचे प्रसंग घडले. कम्युनिस्टांचा देवाधर्मावर विश्वास नाही. पण कोयता व कणीस हे त्यांचे निवडणूक-चिन्ह म्हणजे पश्चिम बंगालमधील हिंदू महिलांना लक्ष्मीचे प्रतीक वाटले. त्यांनी हे चिन्ह असलेल्या कम्युनिस्ट उमेदवारांच्या मतपेटीला वंदन करून मते आत टाकली.

चोवीस परगणा जिल्ह्यातील मतकेंद्रावर एक शेतकरी मत नोंदविण्यासाठी आला. बैल आणि गाडी या दोहोंनी त्याला चांगले काम दिले होते. तेव्हा ही दोन्ही चिन्हे असलेल्या उमेदवारांना मत द्यावयाचे, असे त्यांनी ठरविले. बैल काँग्रेसची व गाडी एका अपक्ष उमेदवाराची खूण होती. 'तुला फक्त एकाच उमेदवाराला मत देता येईल,' असे निवडणूक अधिकाऱ्याने त्याला समजावून सांगितले, तेव्हा तो म्हणाला, 'मग मी कोणालाच मत देणार नाही.' आणि नाराज होऊन तो बाहेर पडला.

दुसऱ्या एका मतकेंद्रापुढे पत्नीने कोणाला मत द्यावयाचे, यावर पति-पत्नीत भांडण जुंपले. पत्नीने विशिष्ट उमेदवारालाच मत दिले पाहिजे, असा पतीचा आग्रह, तर 'माझ्या पसंतीच्या उमेदवाराला मी मत देणार,' असा पत्नीचा हट्ट. अखेर आपली मते न नोंदविताच दोघेही घरी परतले. पतीच्या सांगण्याप्रमाणे मी मत देणार नाही, माझ्या पसंतीच्या उमेदवारालाच मत देईन, असे म्हणण्याचा बाणा त्या स्त्रीने दाखविला. हे स्त्रियांमध्ये मतदानाच्या हक्काबद्दल होत असलेल्या जागृतीचेच लक्षण होते. पण ही अपुरी जागृती होती. आपले एकमत होत नाही, म्हणून कोणालाच मत द्यायचे नाही, हा त्यांचा निर्णय चुकीचा होता.

१९५२ च्या निवडणुकीत हैदराबादमधील १६० मतदारांची धावती पाहणी उस्मानिया विद्यापीठातील प्रा. एच. के. शेरवानी आणि हैदराबादच्या निजाम कॉलेजचे प्रा. पी. व्ही. राजगोपाल यांनी केली. तिचे निष्कर्ष वर उल्लेखिलेल्या कोगेकर-पार्क संपादित पुस्तकातील लेखात त्यांनी दिले आहेत. वरच्या वर्गातील सर्व आणि मध्यम वर्गातील बहुतेकांना मतदारयादीत आपली नावे असल्याचे माहीत होते. कनिष्ठ वर्गात मात्र फार थोड्यांना ही माहिती होती. सर्वच जण मत देणार आहेत, काहींची नावे यादीत असतील तर इतरांचीही असलीच पाहिजेत, अशी त्यांची समजूत होती. 'रेशन-कार्डावर आमचे नाव आहे तर मतदारयादीत असणारच. आम्ही

मत दिले नाही तर आमची कार्डे काढून घेतली जातील आणि आम्हाला रेशन मिळणार नाही,' अशी स्त्रियांची समजूत होती. त्यांनी मतदानाचा हक्क चुकवू नये म्हणून त्यांची अशी चुकीची समजूत काही उमेदवारांनी करून दिली असली पाहिजे. मतदारांना जागरूक करण्याची ही पद्धत नसून, त्यांनी मत द्यावे, यासाठी तुमचे रेशनकार्ड रद्द होईल, असा धाक दाखवून त्यांच्यावर अवाजवी दडपण आणण्याचाच हा प्रकार होता. काँग्रेसला मत दिले नाही तर तुमच्या रेशनकार्डाचे नूतनीकरण होणार नाही, अशी भीती महाराष्ट्रातही अनेक ग्रामीण भागांत निर्माण करण्यात आली होती. अशा तक्रारी त्या वेळी विरोधी पक्षांच्या नेत्यांनी केलेल्या आहेत.

प्रमुख राजकीय पक्षांची नावे मतदारांना सर्वसाधारणपणे परिचित होती, पण समाजवादी आणि कम्युनिस्ट यांच्यातील फरक सर्वच वर्गातल्या मतदारांना नीट समजलेला नव्हता. जनसंघ, रामराज्य परिषद आणि स्थानिक पक्षांची माहिती फार थोडचांना होती. पक्षांच्या कार्यक्रमाचे ज्ञानही अनेकांना फार अपुरे होते. उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाची व्याप्ती व टप्पे आणि भाषावार प्रांतरचना आताच करावी, पुढे काही वर्षांनी करावी की करूच नये, यावर निरनिराळचा पक्षांच्या भूमिकांची बरोबर माहिती फक्त अकराजणच या पाहणीत देऊ शकले. निरनिराळचा पक्षांच्या धोरणांमागची मूळ बैठक तुम्हाला समजली आहे का, या प्रश्नाचे उत्तर फारच थोडचांनी दिले.

मतदाराने अपक्ष उमेदवारास मत द्यावे का ? या प्रश्नाला फक्त तिघांनी होकारार्थी उत्तर दिले. 'काही चांगल्या अपक्ष उमेदवारांना विधिमंडळात नेहमीच पाठविले पाहिजे,' असे वीसजणांनी सांगितले. अपक्ष उमेदवारात अपवादात्मक गुण असतील तर त्याला जरूर निवडा, पण तसे नसेल तर तुमच्या आवडीच्या पक्षाला मत देणे अधिक चांगले, असे पाहणीसाठी निवडलेल्या बहुसंख्य लोकांचे मत दिसून आले. कनिष्ठ वर्गातील लोकांनी पक्षाच्या उमेदवारास मत देण्यालाच पाठिंबा दर्शविला.

मत कोणाला द्यायचे, हे ठरविताना मतदार कोणत्या कसोटचा लावतो ? या प्रश्नाची जी उत्तरे मिळाली त्यावरून असे दिसून आले की, वरच्या वर्गातील मतदारांत पक्षाचा जाहीरनामा आणि उमेदवाराचे गुण यांपैकी कशाला अधिक महत्त्व द्यावयाचे, यावर त्यांचे मत जवळजवळ सारख्याच प्रमाणात विभागलेले होते. अधिक शिक्षित मध्यमवर्गीय लोकांचेही असेच मत होते. कमी शिक्षित मध्यमवर्ग आणि खालचा वर्ग यांतील लोकांनी मात्र आपल्या कसोटीचा क्रम पुढीलप्रमाणे लावला : प्रथम पक्षनेते, त्या खालोखाल पक्षाचा जाहीरनामा आणि त्या खालोखाल उमेदवाराचे गुण. धार्मिक, भाषिक किंवा प्रादेशिक दृष्टिकोनातून मत देणारांची संख्या फारच थोडी होती. आम्ही या गोष्टींचा विचार करतो, पण त्या सर्वांत महत्त्वाच्या मानीत नाही, असे उत्तर बहुसंख्य लोकांनी दिले.

तुम्हाला उमेदवार आवडतो पण त्याचा पक्ष आवडत नाही, तर तुम्ही त्याला मत द्याल का, या प्रश्नाला १४० जणांपैकी ८० जणांनी आपण पक्षाला मत देऊ तर ६० जणांनी आपण उमेदवाराला मत देऊ, असे उत्तर दिले.

मते मिळविण्यासाठी लाचलुचपतीचा कसा वापर केला जातो, याचा अभ्यास १९६२ च्या निवडणुकीतील बडोदा पूर्व मतदारसंघात श्री. रजनी कोठारी आणि श्री. तरुण घोष यांनी केला असून, त्याचे निष्कर्ष 'पार्टी सिस्टम अ‍ॅन्ड इलेक्शन-स्टडीज' (पक्ष पद्धती आणि निवडणूक-एक अभ्यास) या सेंटर फॉर दि स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज, या संस्थेने प्रकाशित केलेल्या पुस्तकातील लेखात मांडले आहेत. ते म्हणतात, 'मतदारांचे काही गट आणि उमेदवार किंवा पक्ष यांच्यात सौदा घडवून आणण्यात पैशाचा भाग महत्त्वाचा होता. मतासाठी पैसा मिळविणे हा काही टापूत नित्याच्या व्यवहाराचाच भाग समजला जात होता. केवळ गरीब आणि मागासलेल्या वस्तीतच नव्हे तर संपन्न वस्तीतसुद्धा हीच वृत्ती आढळली. मताकडे राजकीय हक्क म्हणून पाहण्यापेक्षा सौदा म्हणूनच अनेकदा पाहिले जात होते. दोन्ही बाजूकडून पैसा घ्यावयाचा, पण मत सर्वांत जास्त पैसे देणारास न देता इतर काही गोष्टींचाही विचार करून दिल्याचेही काही मतदारांच्या बाबतीत आढळून आले.

'संस्था, युवकसंघटना, तालमी व क्रीडा संघ, समाज कल्याण संस्था यांना रोख रकमा देणे हा लाचलुचपतीचा सर्वांत अधिक आढळणारा प्रकार होता. स्वतंत्र पक्षाच्या उमेदवाराने जवळजवळ प्रत्येक महत्त्वाच्या स्थानिक संस्थेशी संपर्क साधला, काहींनी सौदा करून पैसे दिले. काँग्रेसनेही सौदे केले. खेळांची साधने, भांडी, पुस्तके वगैरे वस्तूंच्या स्वरूपातही मदत दिली जाई. वस्तूंच्या स्वरूपात पैसे देण्याचा आणखी एक प्रकार म्हणजे मद्य. गुजरातेत दारूबंदी असनाही दलित वर्गातील स्थानिक लोकांना ती पाजण्यात येई. निवडक गटांने त्यांना व 'दादां'ना पैसे देणे हा लाचलुचपतीचा आणखी एक प्रकार. पण अशा रकमा दिल्या की अनेकदा दुसऱ्या गटाचे नेते आणखी पैशाची मागणी करीत व त्यांचे समाधान न झाल्यास दुसऱ्या पक्षाला जाऊन मिळत. वैयक्तिक मतदारांनाही पैसे देण्यात आल्याच्या अफवा होत्या, पण त्यांना दुजोरा मिळाला नाही.

'निवडणूक डावपेचाचा एक भाग म्हणून लाचलुचपतीचा वापर हा तिसरा प्रकार. केवळ पैशाने अपेक्षित फळ मिळत नाही. योग्य संधी साधून त्याचा वापर केला तरच यश मिळेल. या तंत्रात विरोधी पक्ष काँग्रेसपुढे टिकत नाहीत, हे पुनः एकदा दिसून आले.

'या मतदारसंघात पैसा मोठचा प्रमाणावर खर्च करण्यात आला. मते मिळविण्याचे महत्त्वाचे साधन म्हणून स्वतंत्र पक्षाच्या उमेदवाराने त्याचा उपयोग केला. मागासलेल्या भागात बरेच कार्य केल्याचा त्याचा दावा होता, पण हे सारे कार्य पैसे चारून करून घेतलेले होते. मते मिळविण्यासाठी उत्साहाच्या पहिल्या भरात पैसा सढळ हाताने देण्यात आला. पण लौकरच मर्यादा संपली आणि हे काम किती प्रचंड आहे याची जाणीव झाली. मागताच पैसा मिळतो असे समजल्यावर आणखी मागण्या येऊ लागल्या, त्या भागविणे कठीण झाले. त्यानंतर नुसती आश्वासने दिली जाऊ लागली. याचा प्रतिकूल परिणाम होऊन मतविक्रेते मतदार उलटले.

'याच्या उलट अशी 'बक्षिसे' केव्हा द्यावयाची याची कला काँग्रेसला चांगली अवगत होती. तिने पैसा बराच कमी खर्च केला. विरोधी पक्षांची दमछाक होईपर्यंत तिने वाट पाहिली. विरोधी मते विकणारे लोक काँग्रेसकडे येऊ लागले तेव्हा त्यांची मते तिने आपण

सांगू त्या भावात विकत घेतली. मतदारांवर दडपण आणण्यासाठी पसे वाटण्याबरोबर इतर मार्गाचाही अवलंब काँग्रेसने केला. त्यामुळे तिचा पैसा वाया गेला नाही. काँग्रेसला दीर्घकालचा अनुभव होता. लोकांची जवळून माहिती होती. मानसिक क्षण बरोबर निवडून त्यावेळी दारूच्या बाटलीसारखी नामांकित भेट दिली तरी आपला डाव साधेल हे तिने ओळखले.'

अशा आणखी काही पाहण्यांचे निष्कर्ष देता येतील, पण तपशीलाचा फरक सोडल्यास त्यात निराळे काही नाही.

मतदानाचे प्रमाण वाढण्यासाठी मतदाराची जागरूकता जाणीवपूर्वक वाढविली पाहिजे, हे तर खरेच. पण सध्याची निवडणूक पद्धती किंवा निवडणूक कायदा यात काही सुधारणा करून हा उद्देश साधता येईल का? मतदान सक्तीचे करणे लोकशाहीशी विसंगत असले तरी सध्याच्या निवडणूक पद्धतीत दोन सुधारणा सहज करता येण्यासारख्या आहेत. एक म्हणजे विजयी उमेदवार ज्या मतदारसंघात कमीत कमी पन्नास टक्के मतदान झाले असले पाहिजे. दुसरी अट म्हणजे विजयी उमेदवाराने एकूण मतदानाच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळविली पाहिजेत. या अटी जेथे पाळल्या गेलेल्या नसतील तेथील निवडणूक निकाल रद्द समजण्यात यावे आणि पुढच्या निवडणुकीपर्यंत तेथे निवडणूक घेऊ नये. लोकसभेत त्या मतदार संघास प्रतिनिधित्व राहणार नाही. वरील दोन अटी पुऱ्या केल्याबद्दल ही एक प्रकारे त्या मतदारसंघाला शिक्षा होय. मतदान कमी झाले की, निवडणूक रद्द होऊन लोकसभेतील प्रतिनिधित्वच संपते, ही जाणीव एकदा मतदारांना आणि राजकीय पक्षांना झाली की, मतदानाचे प्रमाण कमी होऊ नये, अशी दक्षता मतदार आणि राजकीय पक्ष घेऊ लागतील. तेव्हा निवडणूक कायद्यात सुधारणा करताना इतर सूचनांबरोबर या सूचनांचा विचार केला जाणे आवश्यक आहे. या संदर्भात आणखी एक सूचना करता येईल. पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान आणि विजयी उमेदवारास पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मते जेथे असतील अशा जागांचे प्रतिनिधी राजकीय पक्षांनी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्त्वानुसार निवडावे. आपल्या सध्याच्या निवडणूक पद्धतीतील एक मोठा दोष म्हणजे निरनिराळ्या राजकीय पक्षांना निवडणुकीत मिळालेली मते आणि जिंकलेल्या जागा यांच्या प्रमाणात खूपच तफावत आढळते. गेल्या पाच लोकसभा निवडणुकांत काँग्रेसला मिळालेल्या जागांचे शेकडा प्रमाण आणि मतांचे शेकडा प्रमाण पाहिल्यास या तफावतीची अधिक स्पष्ट कल्पना येईल.

लोकसभा निवडणुका

काँग्रेसला मिळालेल्या जागा व शेकडा मते

| वर्ष | एकूण जागा | काँग्रेस | जागांचे शेकडा प्रमाण | मतांचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १९५२ | ४८९ | ३६४ | ७४·४ | ४५ |
| १९५७ | ४९४ | ३७१ | ७५·१ | ४७·७८ |
| १९६२ | ४९६ | ३५८ | ७३·१ | ४४·७२ |
| १९६७ | ५२१ | २८३ | ५४·५१ | ४०·७३ |
| १९७१ | ५२१ | ३५२ | ६७·९५ | ४३·६८ |

गेल्या पाच निवडणुकांत काँग्रेसला ४८ टक्क्यांपेक्षा अधिक मते एकाही निवडणुकीत मिळालेली नाहीत, पण जागा मात्र अधिक मिळाल्या. पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मते मिळवूनही सध्याच्या पद्धतीने उमेदवार विजयी ठरत असल्यामुळेच या अधिक जागा मिळू शकल्या. विरोधी पक्षांची मते आपसात विभागली जातात, तेव्हा या पद्धतीचा अधिकच फायदा सत्तारूढ पक्षाला मिळतो. निवडणुकीत लोकांचा कौल अजमावयास निरनिराळ्या राजकीय पक्षांना मिळालेल्या जागांपेक्षा त्यांना पडलेली मतांची टक्केवारी हाच खरा महत्त्वाचा निकष मानला पाहिजे. हा निकष मानावयाचा तर राजकीय पक्षांना पडलेल्या मतांच्या प्रमाणात त्यांना जागा मिळायला हव्यात. मतांच्या प्रमाणात जागांचे प्रमाण निश्चित करावे. पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळवून विजयी झालेल्या उमेदवारांच्या जागा कायम राहतील, बाकीच्या जागांची निवड राजकीय पक्ष त्यांना मिळालेल्या मतांच्या प्रमाणात करतील.

महाराष्ट्राचे उदाहरण घेऊन विचार केला म्हणजे मुद्दा अधिक स्पष्ट होईल. १९७१ च्या निवडणुकीत महाराष्ट्राच्या ४५ जागांपैकी १२ मतदारसंघात ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान किंवा विजयी उमेदवारास ५० टक्क्यांपेक्षा कमी मते पडल्याने तेथील निकाल वरील तत्त्व अनुसरल्यास रद्द करावे लागतील. काँग्रेसच्या ९ जागा यात आहेत, त्या कमी झाल्याने काँग्रेसचे पक्ष बळ ४२ वरून ३३ पर्यंत खाली येते. जनसंघाला ५·२ टक्के, शे. का. पक्षास ४·७ टक्के, रिपब्लिकन (खोब्रा. गटास) गटास २·२ टक्के, संयुक्त समाजवादी पक्षास २·१ टक्के, संघटना काँग्रेसला २·७ टक्के, कम्युनिस्ट १·६, शिवसेना १·६ अशी मते मिळाली. पण त्यांना जागा एकही मिळाली नाही. मताच्या प्रमाणानुसार जनसंघ २ शेकापक्ष २, संघटना काँग्रेस १, रिपब्लिकन (खोब्रागडे गट) १, संयुक्त समाजवादी १ याप्रमाणे जागा मिळावयास हव्यात. या पक्षांचे उमेदवार तर निवडून आले नाहीत, तेव्हा ते या पक्षांनी आपल्या यादीतून निवडावेत. पक्षांना त्यांच्या मतांच्या प्रमाणानुसार प्रतिनिधित्व मिळण्याच्या दृष्टीने ही पद्धती स्वीकारायला हवी.

लोकसभेच्या १९७१ च्या निवडणुकीत काँग्रेसला मिळालेल्या ३५२ जागांपैकी ९० जागा पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतांनी मिळालेल्या होत्या. पन्नास टक्क्यांचा निकष त्यावेळी स्वीकारला गेला असता तर काँग्रेसच्या या ९० जागा कमी होऊन तिचे बहुमत २६२ पर्यंत रोडावले असते. ही पद्धती स्वीकारली तर कोणत्याही पक्षास निर्णायक बहुमत मिळविणे कठीण जाईल. सरकार स्थापण्यासाठी इतर पक्षांचे सहकार्य घ्यावे लागेल. त्यातून अस्थिरता निर्माण होईल, अशी भीती व्यक्त केली जाते. तात्त्विक दृष्ट्या तशी शक्यता नाकारता येणार नाही. पण याबाबतीत गेल्या दोन निवडणुकांचा अनुभव विचारात घेतला पाहिजे. १९६७ च्या निवडणुकात आठ राज्यांत काँग्रेसचे हुकमी बहुमत गेले विरोधी पक्षांनी संयुक्त आघाड्या करून सरकारे स्थापली. पण आपसातील भांडणांमुळे ती फार काळ टिकू शकली नाहीत. केंद्रातही १९६९ मध्ये काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर काँग्रेसमागे हुकमी बहुमत राहिले नाही. कम्युनिस्ट, द्र. मु. क., अपक्ष खासदार यांच्या पाठिंब्याने सरकार तग धरू शकले. पण अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले. ही अस्थिरता नाहीशी करण्यासाठी

१९७१ च्या लोकसभा निवडणुकात आणि १९७२ च्या विधानसभा निवडणुकात जनतेने काँग्रेसला दोनतृतीयांश बहुमतापेक्षा अधिक जागा मिळवून दिल्या. काँग्रेसला आपला कार्यक्रम अंमलात आणण्यास आता कोणतीही आडकाठी राहिली नव्हती. पण पक्षाला गटबाजीने ग्रासले. पंतप्रधान इंदिरा गांधींच्या पसंतीने निवडलेल्या मुख्यमंत्र्याविरुद्ध गट निर्माण झाले. गुजराथ, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, ओरिसा या राज्यांत काँग्रेस पक्षाचे बहुमत कायम असता मुख्यमंत्री बदलावे लागले आणि त्यासाठी काही काळ राज्यामध्ये राष्ट्रपतींची राजवटही लागू करावी लागली. सत्तारूढ पक्षाला अल्पमताने निवडले तरी अस्थिरता आणि मोठ्या बहुमताने निवडले तरी अस्थिरता अशा परिस्थिती निर्माण झाली. स्थिर सरकार मिळवायचे तर गटबाजी नसलेल्या पक्षाच्या हाती सत्ता सोपविली पाहिजे, या विचाराकडे जनता आता झुकू लागली आहे. नव्या जनता पक्षाकडे ती या दृष्टीने आशेने पाहात आहे. जनसंघ, संघटना काँग्रेस, समाजवादी आणि भारतीय लोकदल या चार पक्षांनी आपापल्या पक्षांचे विसर्जन करून हा नवा पक्ष स्थापन केला आहे. पंतप्रधानांनी आणीबाणी जाहीर करून देशातील लोकशाहीची तर गळचेपी केलीच, पण पक्षांतर्गत लोकशाहीही नष्ट केली. राज्याचे मुख्यमंत्री वास्तविक विधिमंडळ पक्षाने निवडावयाचे, पण ते वरून लादले जाऊ लागले. प्रदेश काँग्रेस अध्यक्षाची निवड प्रदेश काँग्रेस कमिटीने करावयाची, पण त्याची नेमणूकही वरून होऊ लागली. मुख्यमंत्री, प्रदेश अध्यक्ष, काँग्रेसचे उमेदवार सारे काही पंतप्रधानांनी किंवा केंद्रीय नेतृत्वानेच निवडावे असे ठराव पास होऊ लागले. आपले लोकशाही अधिकार गमावल्याची खंतही कोणाला वाटलेली दिसली नाही. जे घडत आहे त्याबद्दल कोणी एका शब्दाने नापसंती व्यक्त केली नाही. नव्या जनता पक्षाने देशातील लोकशाहीप्रमाणेच पक्षांतर्गत लोकशाही पाळावी. सर्व महत्त्वाच्या प्रश्नांवर सर्व पातळीवर खुला विचारविनिमय होऊन बहुमताने लोकशाही पद्धतीने निर्णय घेतले जावेत आणि ते शिस्तीने व एकजुटीने अंमलात आणले जावेत, अशा जनतेच्या अपेक्षा आहेत. पुरोगामी, प्रतिगामी हे ठोकळेबाज शिक्के बाजूला ठेवून या नव्या पक्षाचे स्वागत करायला जनता तयार आहे. पूर्वग्रह बाजूला ठेवून या पक्षाची तत्त्वप्रणाली, धोरण, कार्यपद्धती आणि कार्यक्रम यांचा विचार करावयास हवा. काँग्रेसच्या कारभाराला आणि त्यातील वाढत्या हुकूमशाही प्रवृत्तींना विटलेल्या जनतेस जनता पक्ष हेच आता लोकशाहीचे आशास्थान वाटत आहे. स्थिर लोकशाही सरकारसाठी या पक्षाला संधी देण्याची तिची तयारी आहे.

मतदानाच्या संदर्भात आणखी एका गोष्टीचा विचार करायला हवा. आपल्या घटनेप्रमाणे एकवीस वर्षांवरील सर्व प्रौढांना मताधिकार आहे. अठरा वर्षांवरील प्रौढांना मताधिकार का नसावा? इंग्लंडमध्ये तसेच अमेरिकेतील काही राज्यांत अठरा वर्षांवरच्या प्रौढांना मताचा हक्क देण्यात आलेला आहे. आपल्याकडेही विरोधी पक्षांनी ही मागणी केली होती. अठरा वर्षांवरील तरुणांना प्रौढत्वाचे इतर हक्क मिळतात तर मग मतदानाचा हक्क का मिळू नये? सर्व लोकशाहीवाद्यांनी या मागणीबद्दल आग्रह धरला पाहिजे.

निवडणुकीत ५० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान आणि या विजयी उमेदवाराला झालेल्या मतदानाच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक मते पडली असतील तरच तो उमेदवार विजयी झाल्याचे समजण्यात यावे अशी सूचना मी केली. निवडणूक कायद्यात दुरुस्ती होऊन त्यात या सूचनेचा समावेश होईल तेव्हा होवो, त्या दुरुस्तीची वाट न पाहता काही कार्यकर्त्यांनी याबाबतीत स्वतःचं उदाहरण का घालून देऊ नये? माझ्या मतदारसंघात ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाल्यास आणि पहिल्या क्रमांकाची मते पडून मी कायद्याप्रमाणे निवडून आलो असलो तरी माझी मते झालेल्या मतदानाच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी असल्यास मी विजयी झालो असे मानणार नाही, माझ्या जागेचा राजीनामा देईन, अशी घोषणा या कार्यकर्त्यांनी निवडणूक लढविताना का करू नये? त्यांनी असा उच्च आदर्श मतदारांपुढे ठेवल्यास मतदार अधिक संख्येने मतदान करतील.

## परत बोलावण्याचा अधिकार

मतदारांच्या हक्कांच्या दृष्टीने एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे लोकप्रतिनिधींना परत बोलावण्याचा अधिकार मतदारांना असावा की नाही? काही देशांच्या घटनेत असा अधिकार आहे. अनेक उमेदवारांच्या बाबतीत असे दिसून येते की, त्यांना मतदारांची आठवण फक्त निवडणुकीच्या वेळी. एकदा निवडून आल्यावर ते मतदारांकडे ढुंकून पाहात नाहीत. त्यांना दिलेली आश्वासने पाळत नाहीत. त्यांच्या गाऱ्हाण्यांची दाद लावत नाहीत. लोकसभेत किंवा विधानसभेत ते कधी भाषण करीत नाहीत, प्रश्न विचारीत नाहीत. सरकारच्या बाजूने हात वर करणे एवढेच त्यांचे काम. त्यांनी कसेही वागावे. पुढची निवडणूक होईपर्यंत त्यांना त्यांच्या जागेवरून कोणी दूर करू शकत नाहीत. मतदारांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधी त्यांना दिलेली आश्वासनें पाळीत नसेल, कर्तव्यात चुकारपणा करीत असेल तर त्यांच्याविरुद्ध अविश्वास दर्शवून त्याला परत बोलावण्याचा अधिकार मतदारांना असला पाहिजे. असा अधिकार असेल, तर लोकप्रतिनिधी वाटेल तसे न वागता अधिक जबाबदारीने काम करतील. घटनेत तशी तरतूद करण्याची मागणी सर्व लोकशाहीवाद्यांनी केली पाहिजे.

घटनेत तशी तरतूद केली जात नाही तोपर्यंत मतदारांनी आपल्या लोकप्रतिनिधींचा भ्रष्टाचार निमूटपणे सहन करावयाचा. त्या लोकप्रतिनिधीच्या राजीनाम्याची मागणी शांततापूर्ण मार्गांनी केली तर तो एक प्रकारे शांततापूर्ण सत्याग्रहच म्हणता येईल. मात्र राजीनाम्यासाठी कोणत्याही प्रकारची जबरदस्ती किंवा सक्ती करण्यात येऊ नये. गुजरात व बिहारच्या आंदोलनात काँग्रेस आमदारांवर राजीनाम्याची सक्ती झाल्याच्या तक्रारी होत्या. अशा तक्रारींची निःपक्षपाती चौकशी करून सक्ती किंवा जबरदस्ती झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित लोकांविरुद्ध जरूर ती कारवाई करण्याचा मार्ग सरकारपुढे मोकळा होताच. पण तसे काही न करता आमदारांचे सक्तीने राजीनामे मागण्याचे विरोधकांचे वर्तन बेजबाबदारपणाचे व लोकशाहीविरोधी होते, हे सत्तारूढ पक्षाच्या नेत्यांनी केलेले आरोप बरोबर नाहीत. शक्य असेल तर अजूनही या प्रकारांची निःपक्षपाती चौकशी व्हावी. अशा चौकशीचा निकाल मानण्यास आणि दोषी ठरल्यास त्याबद्दलची शिक्षा भोगण्याची तयारी विरोधकांनीही दर्शवावी. उच्च लोकशाही मूल्याची जपणूक करण्याचा हाच मार्ग आहे. □

सांस्कृतिक वार्ता : मुंबई

# आनंदमेळा, दिवाळी अंक स्पर्धा....

**दीपक श्रीराम मांडे**

थंडीचे दिवस सुरू झाल्यावर कार्यक्षमतेत वाढ होते की काय, कोण जाणे ! पण एक गोष्ट खरी की, कॅलेंडरवर डिसेंबर–जानेवारी महिने उगवले की, नाना संस्थांच्या नाना कार्यक्रमांना उधाणच येते जणू !

शाळा–कॉलेजेसची एक दिवसापासून ते आठवड्यापर्यंत चालणारी वार्षिक संमेलने, कॉलनीतले मेळावे, नाना स्पर्धा–त्यांचे बक्षीस-समारंभ, सहली, सभा–परिषदा... आनंदोत्सवाचे अनेक प्रकार !

नुकतेच मुंबईत भरलेले 'श्वानप्रदर्शन', 'साहित्य–सहवास'मधील साहित्यिकांचा 'आनंदमेळा', 'जे. जे. स्कूल ऑफ अॅप्लॉईड आर्टस'चे २५ कलमी कार्यक्रमावरचे प्रदर्शन, ७६ सालच्या दिवाळी अंक–स्पर्धेचा बक्षीस–समारंभ आणि सरतेशेवटी निवडणुकांची धामधूम...अशा आणि इतर अनेक धामधुमीत अफाट पसरलेल्या मुंबईतले बारीकसारीक टापूदेखील सध्या जिवंत झाले आहेत.

आचार्य अत्रे यांच्या अचाट कल्पनाशक्तीतून बांद्रे येथे 'साहित्य–सहवास' या फक्त साहित्यिकांच्या एकत्रित निवासस्थानाची कल्पना उगवली नि ती मूर्तस्वरूपात प्रकटही झाली. साहित्य–सहवासामध्ये प्रत्येकाचा 'शेजारी' साहित्यिकच ! सारा महाराष्ट्र ज्यांना आपल्या नानाविध कार्यक्रमांसाठी अध्यक्ष–उद्घाटक म्हणून पकडू इच्छितो, त्यातील बहुतेक सगळे इथेच राहणारे. मग साहित्य–सहवासात जर साहित्यिकांचे संमेलन झाले, तर त्याला किती मजा येईल, कल्पनाच केलेली बरी.

२६ जानेवारी ते ३० जानेवारीपर्यंत साहित्य–सहवासात 'आनंदमेळा' भरला होता. सुलोचना चव्हाण यांचे गायन, तसेच सर्वश्री प्र. श्री. नेरूरकर, डॉ. अ. वा. वर्टी, शांताबाई, सुधीर मोघे इत्यादींनी सहभाग घेतला होता.

पण नेहमीच्या साचातले कथाकथन, कविसंमेलन, परिसंवाद हे कार्यक्रम सादर होण्यात इथे काय अडचण येणार ? पौरोहित्य करणाऱ्या पुरोहितबुवांनी स्वतःच्याच घरी सत्यनारायण करण्यातला हा प्रकार. त्यामुळे इथल्या ज्या कार्यक्रमांनी मजा आणली, ते कार्यक्रम म्हणजे विवाहित विरुद्ध अविवाहित साहित्यिकांमधील रस्सीखेच, क्रिकेटचा सामना, डोळे मिटून मडके फोडणे इत्यादी खेळांनी. लग्न होऊन 'बाप' झालेल्या विवाहितांनीच क्रिकेट आणि रस्सीखेच जिंकली.

शेवटच्या दिवशी, 'झपूर्झा' इमारतीखालील आवारात 'आनंद–बझार' भरला होता. घरीच तयार केलेले एकेक पदार्थ घेऊन 'झपूर्झा'च्या आवारात काही साहित्यिक–पत्नींनी स्टॉल्स उघडले होते, तर 'चार आणेमें तीन चानस–लग गया तो रुपाया' असं म्हणणारे, पण खेळणाऱ्याला क्वचितच रुपया मिळवून देणारे स्टॉल्सही इथे मांडले होते.

श्री. राजाराम हुमणे यांनी हा सारा आनंदमेळा आयोजित करण्यात पुढाकार घेतला होता.

□

टक्केवारी काढली, तर दरवर्षी दिवाळी अंकांतून वा वर्षभर दैनिके–साप्ताहिके यांत लेखन करणारे ६० ते ७०% साहित्यिक एकट्या साहित्य – सहवासमध्येच राहत असलेले आढळतील.

त्यांपैकी प्रत्येकजण किमान ८–९ दिवाळी अंकांतून तरी लिखाण करतो. आज दिवाळी अंकांचा खपही खूप होतो नि 'मागणी तसा पुरवठा' या न्यायाने त्यांच्या साहित्यालाही खूपच मागणी आहे. पण ह्यामुळे जे लिहिले जाते, त्यांपैकी किती जाणीवपूर्वक वा सकस आहे, हे कळायला मार्गच उरत नाही. सामान्य वाचक एक तर गोंधळून तरी जातो वा अंक तरी भिरकावून देतो.

आणि म्हणूनच, 'मुंबई मराठी पत्रकार संघाने' गेली तीन वर्षे जी 'दिवाळी अंक–स्पर्धा' सुरू केलीय, तिचे महत्त्व या पार्श्वभूमीवर ठळकपणे जाणवते.

एक फेब्रुवारीला पत्रकार–परिषदेत ७६ सालच्या दिवाळी अंक–स्पर्धेचा बक्षीस–समारंभ महापौरांच्या हस्ते पार पडला. मुख्य पाहुणे होते, ज्येष्ठ पत्रकार व पुढारी श्री. गो. बा. महाशब्दे.

स्पर्धेच्या ह्या तिसऱ्या वर्षी अस्मितादर्श (कै. रत्नाकर देसाई स्मृती पारितोषिक), अपर्णा (चित्रकार दलाल स्मृतिचिन्ह), मौज (कै. अंतरकर स्मृतिचिन्ह) व ललित (कै. रघुवीर मुळगावकर स्मृतिचिन्ह) ह्या अंकांनी बक्षिसे पटकावली. ही बक्षिसे म्हणजे रोकड रक्कम नसून, कायम स्वरूपात दिली गेलेली स्मृतिचिन्हे आहेत. स्मृतिचिन्हावर मोरपिसाची लेखणी पकडलेली दोन साहित्यिक बोटं आहेत.

ह्या स्पर्धेचे परीक्षक होते श्री. र. कृ. जोशी, पु. रा. बेहेरे आणि प्रा. के. ज. पुरोहित. स्पर्धेत एकूण ९२ अंकांनी भाग घेतला होता. आधीच्या वर्षी हीच संख्या ११५ होती.

कार्यक्रमाला सुरवात करताना, संस्थेचे अध्यक्ष श्री. देवधर म्हणाले की, दिवाळी अंक वाचकांच्या स्मरणातून जायच्या आतच ह्या स्पर्धेचा निकाल लागावा, अशी वाचकांची इच्छा असते. पण १०० अंकांचे काळजीपूर्वक परीक्षण करण्यासाठी निदान दीड महिना तरी लागतोच. तरी पुढील वर्षी मात्र हा समारंभ लौकर करण्यात येईल, अशी आशा आहे.

परीक्षकांच्या वतीने बक्षीसपात्र अंकांची वैशिष्ट्ये सांगताना प्रा. पुरोहित म्हणाले की, सॉमरसेट मॉमच्या एका कादंबरीचे नाव होते, 'Mixture As Before.' आपल्या दिवाळी अंकांचे सध्या हेच स्वरूप झाले आहे. पण चित्रकार दलाल पारितोषिक विजेता, संपादक बाळ सामंत यांचा 'अर्पणा'चा अंक मात्र अंगभूत निराळेपण ल्यालेला आहे, आनंददायी आहे. हा अंक आत्मचरित्राच्या धाग्यांनी उलगडत जातो

आणि जीवनाची प्रामाणिक जाणीव वाचकांसमोर सादर करतो.

कै. रत्नाकर देसाई पारितोषिक विजेत्या ' अस्मितादर्श 'च्या (संपा. : प्रा. गंगाधर पानतावणे) अंकात सामाजिक जाणीवेची सखोल मांडणी आढळते. ऐतिहासिक सापेक्षता, दलितॅलिझम, इ. लेख व संक्षेपाने दलित लेखकांची चरित्रे, अशा परिणामकारक साहित्यामुळे दोनच कथा, मोजक्याच कविता असलेला हा अंक आमच्या हिशेबी चपखल बसला.

मौजेला बक्षीस देणं हा प्रकार जरा विनोदीच. नाणावलेल्या फलंदाजाच्या शतकाच्या स्तुतीसारखा. पण माणूस जून झाला, तरी प्रयोग संपत नाही, याचे उदाहरण ' मौज प्रकाशन ! ' इथे अस्मितादर्शच्या सामाजिक जाणीवेच्या विरुद्ध टोक म्हणजे ' अभिजात वाङ्मयीन दृष्टी ' आढळते.

उत्तम प्रतिकृती+प्रतीक+उत्तम रंगकाम आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे छायाचित्र नसलेले असे ' ललित ' दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ आहे. त्यामुळेच आम्हा तिघा परीक्षकांचे उत्कृष्ट मुखपृष्ठाविषयी एकमत झाले. आणि ' ललित 'ला या वर्षीचे उत्कृष्ट मुखपृष्ठाचे बक्षीस मिळाले.

बाकी इतर नव्या लिखाणांत काही जोश आढळला नाही आणि कसलेल्यांच्या लिखाणातही कस जाणवला नाही, असा निराशेचा सूर प्रा. पुरोहित यांनी शेवटी काढला.

महापौर श्री. मनोहर जोशी यांनी आरंभीच स्पर्धा भरविल्याबद्दल ' मुंबई मराठी पत्रकार संघा 'चे आभार मानले व विजेत्यांचें अभिनंदन केले.

' आगळेपणा असलेला दिवाळी अंक अचूक उचलून घ्यावा नि वाचावा ही माझी इच्छा ह्या स्पर्धेमुळे विनासायास पुरी होणार आहे, ' असे सांगून महापौर म्हणाले की, ' माझा एक मित्र ' दिवाळी अंक कसा वाटला, ' हा प्रश्न विचारून लगेच स्वतःच सांगतो की, गेल्या वर्षी १५० जाहिराती होत्या, ह्या वर्षी १०० आहेत. म्हणजे उत्पन्नाचे साधन म्हणूनच दिवाळी अंकाकडे कित्येकदा पाहिले जाते. त्यातून जीवनानुभूतींचा वा कल्पनाविष्कारांचा अभावच आढळतो. '

आपल्या अंकाला पुन्हा बक्षीस मिळावे अशी जिद्द आजच्या बक्षीसपात्र अंकाच्यात निर्माण होवो आणि या स्पर्धेला असेच यश लाभो, ही सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.

प्रमुख पाहुणे श्री. गो. बा. महाशब्दे म्हणाले की, वर्षभर खस्ता खात चालणारी मासिके, साप्ताहिके, दिवाळी अंक काढतात तो कमाईच्याच आशेने. म्हणूनच त्यांनी धंदा करण्यास कोणतीच हरकत नाही. पण अंक काढताना वाचकाला काही चांगले साहित्य वाचायला मिळेल असा दृष्टिकोन हवा. नाहीतर या अंकाचा उपयोग दिवाळीचा फराळ करताना केवळ पाने उलटायला म्हणून छान होतो.

उत्तम दिवाळी अंक पूर्वतयारी-प्रेरणा देण्यासाठी बक्षिसाचे स्वरूप बदलायला हवे. बक्षिसांची संख्या वाढवा, रोख रक्कम ठेवा, तसेच उत्तम व्यंगचित्र, लघुकथा, कादंबऱ्या, कविता इत्यादींनाही बक्षिसे ठेवायला हवीत.

मात्र श्री. महाशब्दे यांनी शेवटी नियोजित विषय सोडून दुसऱ्याच विषयावर बोलणे सुरू केले, हे जरा खटकले.

बक्षीस-विजेत्यांच्या वतीने प्रा. मानतावणे म्हणाले की, आज मिळालेली पारितोषिके महत्त्वाची आहेत, कारण ती मुंबई मराठी


With Best Compliments from

**Bombay Alloy-Steel Industries Private Limited**

Manufacturers of

**Industrial Machine Knives**

**and**

**Who believe that**

Quality has no Substitute

Office : 87, Nagdevi Cross Lane, Bombay 3.

Works : Kanjur Road, Bhandup, Bombay 78.

Call : 581359

पत्रकार संघाने मनांत काहीही राजकारण न बाळगता, पत्रकारितेच्या मूल्यांना धरून, तात्त्विक बैठकीच्या आधारे दिली आहेत. ◻

## एक संस्मरणीय प्रदर्शन

ह्याच आठवड्यात, पंतप्रधानांच्या २५ कलमी कार्यक्रमाला चित्रकलेच्या व जाहिरातींच्या अनेक माध्यमांतून उत्तम प्रकारे Project out करणारे एक संस्मरणीय प्रदर्शन पाहायला मिळाले.

जे. जे. स्कूल ऑफ अ‍ॅप्लाईड आर्टसने २५ जानेवारी ते ३ फेब्रुवारीपर्यंत आपल्याच कॉलेजच्या आवारात हे प्रदर्शनं विनामूल्य आयोजित केलं होतं. २५ जानेवारीला मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन झाले.

'कलेसाठीच केवळ कला' असा विचार मनात न आणता, सामाजिक प्रश्नामध्ये पूर्ण डूब घेऊन, त्यावर काही उपाय काढण्याची कला विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे पार पाडलीय, असे समाधान मा. मुख्यमंत्र्यांनी दर्शविले.

गेल्या वर्षी ह्याच सुमारास, 'आर्ट-जत्रा' भरविणाऱ्या ह्या कॉलेजने ह्या वर्षी हे प्रसंगोचित प्रदर्शन भरविले. 'अ‍ॅप्लाईड आर्टस' कॉलेजचे विषय सरळ सरळ व्यावसायिक.' जाहिरातींचे अनेक प्रकार आणि माध्यमं इथे शिकवली जातात आणि ह्याचाच उपयोग पुढे शिक्षणोत्तर व्यवसायात होतो.

म्हणून जाहिरातीच्या यशस्वी माध्यमाद्वारे २५ कलमी कार्यक्रम किती चांगल्या प्रकारे व्यक्त करता येईल, हे अजमावण्यासाठी प्रा. मंडळी नि विद्यार्थी एकत्र आले आणि दिवाळीनंतर सुमारे २-२॥ महिने काम करून त्यांनी हे प्रदर्शन भरविले.

प्रदर्शनात निरनिराळी कॉम्पोझिशन्स, डिझाइन्स, लहान-मोठी पोस्टर्स, म्यूरेल्स, फोल्डर-कार्डस, स्टॅम्प्स, पुतळे, स्लाईडस, स्टोरी-बोर्ड, पुस्तिका, घोषवाक्ये, मोबाईल डिझाईन्स, कॅलेंडर्स, फोटो, अब्दागिऱ्या पताका, 'ऑडियो-व्हिज्युअल्स' इ. अनेक माध्यमांचा यशस्वी आणि कुशल वापर आढळला.

'एका अंड्यातून एका शक्तिशाली हाताचा (२० कलमी कार्यक्रमाचा) उगम होतोय' अशा आशयाचे प्रा. अरुण काळे यांचे पोस्टर. 'डोण्ट सेल युवरसेल्फ फॉर डॉवरी' असे घोषवाक्य मिरवून एका नवरदेवाच्या गळ्यात, हुंड्याच्या रकमेचे लेबल अडकवलेलं 'हुंडा निषेध व्यक्तविणारं' पोस्टर; तसेच 'काळे धंदे कधीच छुपे राहात नाहीत, उजेडात येतातच,' हे सांगण्यासाठी एका चोरून दूध पिणाऱ्या काळ्या-गलेलठ्ठ मांजराचं तोंड मात्र प्रकाशात असल्याचे दाखविणारे पोस्टर; वा 'निरक्षरता उखडून टाका' हे सांगण्यासाठी एक अंगठा नि त्यावर अबक... ही अक्षरे किंवा एका पाटीवर ग म भ न अक्षरे लिहिलेली इ. पोस्टर्स, त्यांच्यामागची कल्पनाशक्ती आणि मेहनत स्पष्ट दाखवत होती.

जाहिरातीचे प्रभावी माध्यम म्हणजे डॉक्युमेंट्री फिल्म! पण ही फिल्म तयार करण्याआधी 'Story-Board' तयार करावा लागतो. त्यानुसार फिल्म चित्रित होते. ६'×६' अशा १६ चित्रांचा एक Story-Board साक्षरतेचे महत्त्व सांगताना एक कहाणीच उलगडून दाखवीत होता.

मालक आणि नोकर याच्यातील समझोत्याचे सुंदर चित्रण एका 'फोल्डर-कार्ड' मधे आढळले. फोल्डरच्या बाह्यपृष्ठावर मालक आणि नोकर यांची चित्रे होतीं. त्यांच्यामधे कारखाना सूचित करणारे चक्र. फोल्डर उघडताच मात्र मालक आणि नोकर एकमेकांच्याजवळ येताना दिसत होते.

'वृक्षसंगोपन : शुद्ध श्वसन' हे सांगण्यासाठी फुप्फुसाच्यामध्ये हिरवी झाडे, वृक्ष काढणे; वा धुराड्यातून निघणाऱ्या धुराला हिरवा रंग देऊन Stop air pollution grow more trees लिहिणे, ह्या आणि अशा अनेक बहारीच्या कल्पनांना चित्ररूप देऊन प्रदर्शनात मांडल्या होत्या. सर्वश्री कदम, जाधव, टंकसाळी या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या '3 dimensional holding design'मध्ये तीन निरनिराळ्या कोनांतून तीन व्यक्ती दिसत होत्या—एक भ्रष्ट अधिकारी, एक काळाबाजारवाला, तर एक स्मग्लर आणि समोरून पाहता त्या तिन्ही व्यक्ती गजाआड दिसत होत्या.

सर्वश्री हलर्नेकर, उमानिया, धुरी, कीर, अंबर, कापडेकर या विद्यार्थ्यांनी २ मोठ्या मेटल-शीट्सवर 'कृषी वाढवा...हरित संपत्तीचे महत्त्व, वृक्षारोपण करा' इ. कलमे सूचित करणारे म्यूरल डिझाईन प्रामाणिक मेहनतीने तयार केले होते; त्याचप्रमाणे प्रवेशद्वाराशी तयार केलेले 'Entrance–Mural', ६"×६" च्या चौरसात २० कलमे दाखवीत होते.

'कुंडेकर' या विद्यार्थ्याने २५ कलमांना चित्रित करण्यासाठी १२ चित्रांचे एक 'कॅलेंडरच' तयार केले होते. 'नेझावाला' याने 'मोबल-डिझाईन' या माध्यमातून एकेक कलम सूचित करणारी २० डब्यांची आगगाडी तयार केली होती.

प्रा. भरत चव्हाण यांनी शाडूचे प्लॅस्टरचे छोटे-छोटे पुतळे तयार करून एक नवीनच माध्यम हाताळले. एक काळा पुतळा व त्याच्या हातात बेडी, स्मगलर्सना होणारी शिक्षा सूचित करीत होता; तर उंचावलेला हात आणि त्याखाली नाण्यांची रास असलेला एक पुतळा 'Price–Control' दाखवीत होता.


जाहिरातीतील मॉडेलिंग हा प्रकारही विद्यार्थ्यांनी वापरला होता. हुंड्याविषयी 'ना देखो, ना सुनो...'च्या धर्तीवर तयार केलेल्या पोस्टर्समधे एक विद्यार्थीच 'मॉडेल' झाला होता.

'ऑडियो-व्हिज्युअल' आणि 'लाईट अ‍ॅण्ड साऊण्ड' ह्या कार्यक्रमांतून स्लाईडसच्या आणि टेपवरील आवाज याद्वारे वरील विषय हाताळला होता, तर दीपक भागवत, यामिनी गुप्ते, सीमा पाटील, विद्याधर कुबल या विद्यार्थ्यांनी याच विषयावरील एक तमाशा, कविसंमेलन इ. कार्यक्रम सादर केले.

हे सर्व चित्रण प्राध्यापक आणि विद्यार्थी यांनी एकमेकांशी चर्चा, विचारविनिमय करून केले. एकेक कलमाला निरनिराळ्या माध्यमातून Project out केल्यामुळे ते चिरकाल स्मरणीय ठरावे.

हे प्रदर्शन 'स्टुडण्टस मजलिस बॉडी'चाच एक भाग आणि अ‍ॅक्टिव्हिटी होती. प्रो. खांबेकर, प्रो. गोखले, चेअरमन प्रो. साठे आणि डीन प्रा. हणमंते यांच्या आणि इतर प्राध्यापकांच्या सहकार्याने, जे. जे. स्कूल ऑफ अ‍ॅप्लाईड आर्टसच्या विद्यार्थ्यांनी भरविलेले हे प्रदर्शन म्हणजे आजच्या परिस्थितीचे विद्यार्थी-जीवनावर उमटणारे पडसाद आहेत! ◻

## ठाणे पुरवणी



नगराध्यक्ष—सतीश प्रधान



आमदार—सौ. विमल रांगणेकर

# ठाणेकरांची नवी ओळख

ठाणे शहराला स्वतंत्र इतिहास आहे. शतकानुशतके मागे धावणारा सांस्कृतिक इतिहास आहे. मुंबईचं सान्निध्य अनेकदा ठाण्याची वैशिष्टचं झाकाळून टाकतं. पण एक काळ असा होता की, मुंबई ठाण्यावर अवलंबून होती. ठाणे ही कोकण प्रांताची राजधानी होती. पुढे बंदर ह्या नात्याने मुंबईला महत्त्व येत गेलं. खाडीवर पूल टाकून मुंबई महाराष्ट्राला-कोकणाला जोडली गेली. बंदर व ईस्ट इंडिया कंपनीचं प्रमुख ठाणं म्हणून मुंबईचं महत्त्व वाढत गेलं. लोकल्स, बसेसचं जाळं, तुफान औद्योगिकरण ह्यांमुळे मुंबई फुगत गेली. आणि एखाद्या प्रचंड व्यक्तिमत्त्वामुळे इतर व्यक्ती झाकाळून जातात, त्याप्रमाणे ठाणे शहराचा स्वतंत्र तोंडवळा लोकांच्या दृष्टिआड होऊ लागला. इतका की, ठाणे हे मुंबईचे उपनगरच आहे असं म्हटलं जाऊ लागलं. एक काळ मध्यंतरी तसा आलाही होता. ठाण्यातली बहुसंख्य मंडळी नोकरीधंद्यानिमित्त मुंबईला धाव घेत होती. पण स्वातंत्र्योत्तर काळात हे दृश्य झपाट्यानं बदलत आहे. ठाण्याला त्याचं स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवणारं गतवैभव पुन्हा प्राप्त होणार, अशी चिन्हं दिसू लागली आहेत.

ठाण्याहून मुंबईकडे जाणारे लोंढे कमी झाले आहेत, असा ह्याचा अर्थ नाही. पण त्याचबरोबर अलीकडे मुंबई-कल्याण, कर्जत-कसारा इकडून ठाण्याकडे मोठा ओघ सुरू असतो, हेही लक्षात घ्यायला हवं. मुंबईच्या स्थानकांवर सुमारे पाच लक्ष उतारू रोज येतात, तर ठाण्यात साडेतीन लक्ष प्रवासी व्यवसायार्थ रोज येतात. ही आकडेवारी पुरेशी बोलकी आहे.

ठाण्यातली प्रचंड औद्योगिक वाढ, तिथल्या उद्योगांचं स्वरूप, शैक्षणिक, सांस्कृतिक संस्था आणि त्यांचं कार्य ह्यांचं जर नीट अवलोकन केलं तर एक गोष्ट आज चटकन लक्षात येईल की, प्रत्येक बाबतीत ठाण्याचं स्वतःचं असं एक वेगळं अस्तित्व आहे. ठाणे शहर, स्वतःची प्रतिमा असलेलं स्वतंत्र आणि आघाडीवरील शहर आहे. ठाणे मुंबईचं उपनगर तर निश्चितच नाही. परंतु मुंबईच्या सान्निध्यामुळे हे स्वतंत्र अस्तित्व बाहेरच्या जगाला जाणवत नाही, हे मात्र खरं. पण ठाण्यात आल्यानंतर, तिथल्या घडामोडींचा आढावा घेतल्यानंतर ह्या शहराचं वेगळेपण जाणवू लागतं. ' ठाणे वैभव ' ह्या ठाण्यातल्या पहिल्याबहिल्या दैनिकाच्या संपादकांनी नेमकं हेच हेरलं. मुंबईची वृत्तपत्रे, तिथली माध्यमं ठाण्याचे प्रश्न, तिथल्या प्रश्नांच्या स्वतंत्र नेणीवांमुळे हाताळू शकणार नाहीत हे त्यांच्या लक्षात आलं तेव्हाच नरेन्द्र बल्लाळ ह्यांनी ' ठाणे वैभव 'चा संकल्प सोडला.

' माणूस 'ची ठाणे पुरवणी मनात येण्याचं कारणही काहीसं हेच. मुंबईच्या झगमगाटात गुणी ठाणेकरांवर अन्याय होतो, त्यांची स्वतंत्र अस्मिता बरीचशी उपेक्षित राहाते. तेव्हा इथल्या व्यक्ती, इथलं जीवन, इथल्या घडामोडी, शक्यतो इथल्याच लेखकांमार्फत रंगवाव्यात; महाराष्ट्राला ठाणेकरांची नवी ओळख करून द्यावी, असा विचार पुढे आला. त्यातूनच ही ठाणे-पुरवणी साकार झाली.

---

## लोकसभा—ठाणे मतदार संघ

# ' जनता 'ला विजयाची आशा ??

बंडू ठाणेकर

ठाणे शहराला व जिल्ह्यालाही शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, औद्योगिक इतिहास जसा आहे, तसाच राजकीय इतिहासही आहे. पूर्वीचा इराणी, अरब, मराठा, मोंगल, पोर्तुगीज, ' ब्रिटिश राजवटींचा इतिहास जरी सोडला, तरी स्वातंत्र्यलढ्याच्या राजकारणाचा लढाही ठाण्याला फार मोठा आहे. अनेक चळवळी ठाणे शहराने उचलून धरल्या. इथे त्या फोफावल्या. मुंबईत अटकसत्र सुरू झालं की, राजकीय नेत्यांच्या हालचाली ठाण्यातनं सुरू व्हायच्या. मुंबईची जागा ठाणे शहर घ्यायचं. स्वातंत्र्यपूर्व व नंतरच्या काळातही ठाण्यातलं राजकारण सतत रंगत राहिलं. प्रामुख्यानं ते काँग्रेस-भोवतीच फिरत राहिलं. विशेष म्हणजे उभ्या महाराष्ट्रात पुण्या-खालोखाल ठाण्याचाच मतदार सुशिक्षित आणि जागरूक मानला जातो, आणि तरीही इथे स्वातंत्र्योत्तर काळात सतत वर्चस्व राहिलं आहे ते मात्र काँग्रेसचंच !

पी. सावळाराम, खंडू रांगणेकर ह्यांच्यासारख्या सर्वमान्य व्यक्तींना तशी पक्षबंधनं पडत नाहीत. पण अशा व्यक्ती ज्या पक्षात असतात, त्या पक्षांचं वजन मात्र आपोआप वधारत असतं. ठाण्यात काही अंशी अशा व्यक्तींमुळे काँग्रेस राजकारणात वरचढ होत राहिली आहे. अपवाद घडवून आणला ठाण्यात तो मात्र शिवसेनेनं. बाळ ठाकरे ह्यांनी मुंबईत शिवसेनेच्या स्थापनेची घोषणा केली, हे जरी खरं असलं तरी शिवसेना खऱ्या अर्थानं ठाण्याचंच अपत्य आहे, असं म्हणायला हरकत नाही. खऱ्या अर्थानं शिवसेना प्रथम रुजली, वाढली, फोफावली ती ठाण्यात. ते लोण मग मुंबईसह इतरत्र पसरलं. शिवसेनेचा ध्वज सर्वप्रथम ठाणे नगरपालिकेवर फडफडला. गेल्या निवडणुकीत तर विद्यमान नगराध्यक्ष सतीश प्रधान हे तीन मातब्बर प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करून नगरपालिकेवर निवडून आले.

खुद्द ठाणे शहरात जरी शिवसेनेनं अशा प्रकारे काँग्रेसला उखडून

लावलेलं असलं तरी लोकसभेच्या ठाणे मतदार संघाच्या निवडणुकीत काँग्रेसचं वर्चस्व आजतागायत तरी कायम आहे. अगदी १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांपासून थेट आजतागायत!

ह्या मतदार संघाच्या सीमारेषाही वेळोवेळी बदलत राहिलेल्या आहेत. लोकसभेच्या गेल्या दोन निवडणुकांच्या वेळी खुद्द ठाणे शहर व आजच्या मतदार संघातला बराचसा भाग ईशान्य मुंबई मतदार संघास जोडलेला होता. मतदार संघाच्या त्या स्वरूपातही काँग्रेस-चीच सरशी होत राहिली होती. काँग्रेसच्या ह्या मतदार संघातल्या तटबंदीपुढे कृष्ण मेनन (विरुद्ध स. गो. बर्वे व सौ. ताराबाई सप्रे), जनरल करिअप्पा, डॉ. आगासकर आदी मातब्बरांनाही हार खावी लागली आहे. स. गो. बर्वे आणि ताराबाई सप्रे ह्यांच्या विजयात शिवसेनेचा मोठा वाटा असल्याचं नेहमी सांगितलं जातं. पण जनरल करिअप्पा शिवसेनेचा पाठिंबा मिळवूनही पराभूत झाले होते, हेही इथे सांगितलंच पाहिजे. थोडक्यात, ह्या परिसरातली शिवसेनेची शक्ती मान्य करूनही, त्या शक्तीमुळे काँग्रेसचं, निदान लोकसभा निवडणुकांच्या संदर्भात तरी, रतीभरही वाकडं झालेलं नाही, हे निश्चित!

ह्या वेळच्या लोकसभा निवडणुकांच्या वेळच्या ठाणे मतदार संघाची रचना तर आणखी वेगळी आहे. ईशान्य मुंबईतून ठाणे वेगळे काढून व इतर तालुक्यांचा समावेश करून घेऊन स्वतंत्र ठाणे मतदार संघ यंदा तयार करण्यात आलेला आहे. ठाणे जिल्ह्यातला साधारणतः मध्यमवर्गीय भाग म्हणून जो गणला जाईल, तो भाग ह्या मतदार संघात मोठ्या प्रमाणात आहे. ठाणे शहर, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ वगैरे भाग ह्या नवीन मतदार संघात मोडतो. ह्या परिसरातल्या बहुसंख्य ग्रामपंचायती, तालुका पंचायती काँग्रेसच्या ताब्यात आहेत, तर पाचपैकी चार नगरपालिका काँग्रेस विरोधकांच्या ताब्यात आहेत. जिल्हा परिषदेवर काँग्रेसचं वर्चस्व आहे. थोडक्यात, देशभर असलेल्या परिस्थितीतच ठाणे मतदार संघही आहे. शहरातून काँग्रेस विरोधकांचं वर्चस्व आहे आणि ग्रामीण परिसरातून काँग्रेसचं! त्यातच भर पडली आहे ह्या मतदार संघाच्या परंपरागत काँग्रेसी तोंडवळ्याची! १९७१ च्या लोकसभा व १९७२ च्या विधानसभा निवडणुकांतून काँग्रेसनं ह्या मतदार संघातून विरोधकांना सपाटून मार दिलेला होता.

ठाणे मतदार संघाच्या ह्या पार्श्वभूमीवर ठाणेकर येत्या निवडणुकीला सामोरे जात आहेत आणि जरी हा मतदार संघ परंपरागत काँग्रेसवादी असला तरी, गेल्या दीड-दोन वर्षांतल्या घडामोडींमुळे ह्याही वेळी काँग्रेसच विजयी होईल, असं कुणीही छातीवर हात ठेवून सांगायला धजावणार नाही.

काँग्रेसचं वर्चस्व असलं तरी इथला राजकीय रंगमंच हा तसा बहुरंगी. काँग्रेस व शिवसेना ह्याखेरीज जनसंघ, समाजवादी ही देखील इथली महत्त्वाची पात्रं. औद्योगिक वाढीनंतर आर. जे. मेहता आणि कृष्णा खोपकर ह्यांनीही इथे भक्कम पाय रोवलेले आहेत. तर कल्याण व आजूबाजूच्या परिसरात शे. का. पक्ष व त्याचे सर्वमान्य नेते कृष्णराव धुळप ह्यांचं नेतृत्व वादातीत आहे. ठाणे जिल्ह्यातला जो काही आदिवासी समाज आहे त्याच्या लेखी गोदाराणी हेच एकमेव नेतृत्व आहे. काँग्रेसविरुद्ध हे एवढे प्रवाह ह्या मतदार संघात वाहत असतात. क्वचित् ते खळाळूनही वाहतात. पण काँग्रेसविरोधी असले तरी हे प्रवाह आजवर तरी परस्परविरोधीही असतच असत. साहजिकच त्यांचं खळाळणं तात्पुरतं वाटायचं. लवकर संथावून जायचं. उलट काँग्रेसलाच ह्या परस्पर विरोधांचा पुष्कळदा फायदा होऊन, काँग्रेसचा प्रवाह पुढेच जात राहायचा.

२६ जून १९७५ रोजी, इंदिराजींनी आणीबाणी पुकारली. अलाहाबाद हायकोर्टाच्या निकालामुळे असेल, किंवा गुजराथेतल्या मध्यावधी निवडणुकांच्या निकालांमुळे असेल; पण आणीबाणी पुकारली गेली आणि परस्पर भांडत बसणारी ही विविध पक्षांची काँग्रेसविरोधी मंडळी एकत्र तुरुंगात डांबली गेली. एक-दोन नाही, तब्बल चौदा-पंधरा महिने. एका अर्थी ही इष्टापत्तीच ठरली म्हणायला हरकत नाही. एरवी एकमेकांची तोंडं पाहायला तयार नसणारी ही माणसं चौदा-पंधरा महिने एकत्र डांबली गेल्यानंतर बाहेर पडली ती मात्र एक होऊन, अंतर्मुख होऊन, विचारांची देवाण-घेवाण होऊन! त्यामुळे आज तरी ही मंडळी एकत्रित झालेली आहेत. काँग्रेसविरोधात ठामपणे उभी राहिलेली आहेत. देशभर ह्या एकत्रितपणाला भरीव फायदा मिळेल असं बोललं जात आहे. ठाणे मतदारसंघही त्याला अपवाद ठरणार नाही असं वाटतं!

'आणीबाणीनंतर सर्वत्र शांतता होती; संप वगैरे प्रकार नव्हते, भाव खाली घसरत होते, आंदोलनं बंद होती व ह्या साऱ्यामुळे सामान्य जनता सुखात होती; ती आता विरोधकांकडे कायमची पाठ फिरवील, काँग्रेसला मुक्त पाठिंबा देईल', असा प्रचार सत्ताधारी पक्षातर्फे सतत होत असतो. आकाशवाणी, दूरदर्शन सारखे 'आणीबाणीचे शंभर फायदे' घोळत असतात. परंतु थोडं हिंडू-फिरू लागलं, चारचौघात बोलू लागलं की, ह्या प्रचारातलं अर्धसत्य लगोलग जाणवू लागतं. चौदा-पंधरा महिन्यांतल्या वृत्तपत्रस्वातंत्र्याच्या गळचेपीमुळे अनेक बातम्या समजत नव्हत्यास सारखं जाणवू लागतं. ठाणे परिसरात ह्या काळात किमान शंभर छोटे-मोठे कारखाने बंद पडले. किमान पन्नास-पंचाहत्तर ठिकाणी संप चालू होते व अनेक ठिकाणी कामगार कपातही भरपूर झाली. खा. मधू लिमये ह्यांनी तुरुंगातून सुटका होताच जी आकडेवारी सांगितली, ती ह्या संदर्भात उद्बोधक आहे. बोनस प्रकरणावरची प्रतिक्रिया तर उमटू लागलेली आहे. भाववाढ नवीन उच्चांक गेल्या तीन-चार महिन्यांपासून गाठू लागलेली आहे. भरपूर पीकपाणी होऊनही ही भाववाढ आहे. ह्याखेरीज चुकीचं अटकसत्र, निष्कारण छळ वगैरे अनेक बाबी आहेतच. त्यामुळे सत्ताधारी पक्ष, आकाशवाणी व दूरदर्शन रंगवितात तेवढं काही चित्र खासच लोभसवाणं नाही. लोक त्रासलेले आहेत. चिडलेले आहेत. पण करायचं काय हे मात्र अनेकांपुढचं न सुटणारं कोडं आहे. जनता पक्षानं ह्या परिस्थितीत योग्य पावलं टाकली, जनतेला दिलासा दिला तर कदाचित जनताजनार्दन काँग्रेसच्या ह्या बालेकिल्ल्यात काही चमत्कार करूनही दाखवील!

ह्या आशावादाला आणखीही काही कारणं आहेत. शहरी विभागातल्या डोंबिवली, कल्याण नगरपालिका जनसंघाच्या ताब्यात आहेत, तर उल्हासनगर पालिका जनसंघ समर्थकांच्या ताब्यात आहे. जनता पक्षाचे उमेदवार आ. रामभाऊ म्हाळगी ही एक जनसंघाची मान्यवर व्यक्ती. ठाणे शहरात शिवसेनेचं प्रभुत्व आहे.

परवाच्या शिवतीर्थावरील सभेत शिवसेना तटस्थ राहील किंवा फार तर कॉंग्रेसला मदत करील, असं जरी बाळ ठाकरे ह्यांनी जाहीर केलं असलं तरी ह्या आवाहनाला ठाणेकर व ठाण्यातील खुद्द शिवसैनिकही कितपत प्रतिसाद देतील, ह्याची शंकाच वाटते. ह्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे ठाणे शिवसेना आणि ठाणे कॉंग्रेस परंपरागत वैर! शिवाय, शिवसेनेच्या नेतृत्वाखाली ठाणे नगरपालिकेनं ज्या अनेक योजना आज आखलेल्या आहेत, त्यांना जो ' खो ' कॉंग्रेस व महाराष्ट्र शासन घालीत आहे त्याचाही परिणाम ह्या निवडणुकीत जाणवल्यावाचून राहाणार नाही.

ठाणे मतदार संघात कॉंग्रेसविरोध असा प्रभावीपणे संघटित होत आहे. औद्योगिक वाढीमुळे कामगारांना महत्त्वाचं स्थान प्राप्त झालं आहे व ठाण्याच्या कामगारांत, आ. जे. मेहता, दत्ता ताम्हाणे, सूर्यकांत 'वढावकर, कृष्णा खोपकर आदींचं वजन निश्चितच भरपूर आहे. ही सगळी मंडळी आज रामभाऊ म्हाळगींच्या बाजूनं उभी आहेत. ठाणे कामगार क्षेत्रात प्रभुत्व गाजवीत असलेल्या आणखी काही व्यक्ती म्हणजे दत्ता सामंत आणि दिना बामा पाटील, कॉंग्रेसवालेच हे दोघे. पण दोघेही डिवचले गेलेले. खुल्या दिलानं कितपत हे दोघेही कॉंग्रेस उमेदवाराच्या पाठीशी उभे राहतील ह्याची शंकाच आहे.

शे. का. पक्ष, समाजवादी, रिपब्लिकन ह्यांचेही छोटे छोटे पॉकेट्स् ह्या मतदारसंघात आहेत आणि ही मंडळीही रामभाऊ म्हाळगींच्या मागे जमा झालेली आहेत.

ह्या सर्व एकत्रित शक्तींबरोबरच, खुद्द रामभाऊ म्हाळगींची निवड ही देखील जनता पक्षाच्या दृष्टीने एक जमेची बाजू आहे असं म्हणावं लागेल. म्हाळगींच्या उमेदवारीचं विरोधी पक्षातून सर्वत्र सारखंच स्वागत झालं हे विशेष! त्यांचं विधानसभेतलं कर्तृत्व ही इथल्या सुशिक्षित मतदारांच्या दृष्टीनं आणखी एक जमेची बाब!

विरोधी पक्षांनी अशी कंबर कसून, मैदानात उडी घेतली असताना, त्यांनाच फायदा व्हावा अशी अवस्था सत्ताधारी पक्षाची आहे! रामभाऊ म्हाळगी ह्यांच्या विरुद्धचे त्यांचे उमेदवार आहेत, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पा. शि. देशमुख! ते स्वतः तसे तडफेचे कार्यकर्ते! परंतु त्यांच्या निवडीमुळे जि. म. सहकारी बँकेचे लाडे, जि. प. अध्यक्षा सौ. ताराबाई वर्तक, भाऊसाहेब वर्तक, ठाण्याचे माजी नगराध्यक्ष मारोतराव शिंदे, ॲड. प्रभाकर हेगडे आदी कॉंग्रेस-अंतर्गत गट बरेचसे नाराज आहेत. कॉंग्रेसअंतर्गत ह्या दुफळीचा, नाराजीचा बराच मोठा फायदा जनता पक्षाला मिळण्याची शक्यता आहे. कदाचित त्या जोरावर ग्रामीण भागातली कॉंग्रेसची जी भक्कम फळी आहे, ती मोडता येणे जनता पक्षाला शक्य होऊ शकेल व तसे झाले तर, शहरी भागात आधीच मजबूत असलेल्या जनता पक्षाला कॉंग्रेसवर मात करणं फारसं जड जाणार नाही.

ठाणे मतदारसंघात लढत आज तरी ह्या दोघातच रंगणार असं चित्र आहे व आज एकंदर चित्र जनता पक्षाला आशादायी आहे. जनता पक्षाच्या कळपात तर रामभाऊंच्या विजयासंबंधी जबरदस्त आशावाद मला जाणवून आला. कॉंग्रेस गोटही आशावाद बाळगून आहे ह्यात वाद नाही. ही लढत रंगणार हेही निश्चित व आज निवडणुकीला महिन्याभराचा अवकाश असताना तरी जनता पक्षाच्या बाजूनं तराजू झुकलेला आहे असं चित्र आहे. जनता पक्षाची प्रचार-मंत्रणाही कॉंग्रेसपेक्षा जास्त भरीव स्वरूप आत्ताच धारण करू लागली आहे. मंडळी खेड्यांमध्ये—कॉंग्रेसच्या कळपांमध्ये शिरून कोंडी फोडायचा प्रयत्न करीत आहे...

अर्थात अद्याप महिना जायचा आहे. परिस्थिती रोजच्या रोज बदलत जाणार आहे. कॉंग्रेसमधले अंतर्गत मतभेद मिटवले जाण्यासाठी प्रयत्न होणारच नाहीत असेही नाही. कम्युनिस्ट व मुस्लिम लीग ह्यांच्याविषयी रोज खडे फोडूनही, त्यांना पाठीशी घालणाऱ्या कॉंग्रेसलाच पाठिंबा द्यायची कोलांटी उडी शिवसेनाप्रमुख मारणार नाहीत असेही नाही! ह्या साऱ्या जर–तरच्या गणिताच्या उत्तरावर शेवटी अंतिम निर्णय ठरणार! सध्या इतकंच, जनता पक्ष कॉंग्रेसच्या ह्या मतदार संघात प्रभुत्व मिळवू शकेल अशी आजची परिस्थिती आहे! आगे खुदा जाने!! □


PHONE : 591537
501455

# BHARAT UDYOG

Manufacturers of :

**Industrial Precision Sheet-Metal Pressed Parts**

507/A, Mahatma Gandhi Road
Naupada–Thane 400 602.

A SOPARKAR ENTERPRISE

# नगराध्यक्ष श्री. सतीश प्रधान

मुलाखत : नंदकुमार रेगे

ठाणे शहराला मुंबईचे सान्निध्य आणि या शहराच्या विकासाला असणारा पुष्कळ वाव या गोष्टी विचारात घेऊन वेळीच या शहराची रचना झाली असती तर ठाणे शहरापुढील बऱ्याचशा समस्या दूर झाल्या असत्या. परंतु प्रत्यक्षात या शहराचा विकास-आराखडाच चुकीच्या आकडेवारीवर आधारलेला आहे. नगराध्यक्ष श्री. सतीश प्रधान यांच्याच शब्दात सांगावयाचे म्हटले तर, '१९७४ साली ठाणे नगरपालिकेचा जो विकास आराखडा तयार करण्यात आला तो १९८१ साली शहराची केवढी लोकसंख्या होईल हे गृहीत धरून. परंतु प्रत्यक्षात मात्र १९८१ साली गृहीत धरलेली शहराची लोकसंख्या १९७४ सालीच झाली. याचे मुख्य कारण म्हणजे ठाण्यात मोठ्या प्रमाणात झालेले उद्योगधंद्यांचे आगमन होय !'

'ठाणे शहरात उद्योगधंदे यावेत आणि त्यायोगे शहराची भरभराट व्हावी म्हणून नगरपालिकेने नव्याने येणाऱ्या उद्योगधंद्यांसाठी जकातकराची १२ वर्षांची सवलत दिली. परिणामी उद्योगधंदेही आले, परंतु त्यापूर्वीच ठाणे शहरातील वाहतूक, पाणीपुरवठा इत्यादी समस्या सोडविण्यासाठी पद्धतशीर उपाययोजना झाली असती तर आजची डोकेदुखी निर्माण झाली नसती.' श्री. सतीश प्रधान यांच्या या मताशी कोणीही सहमत होईल.

उद्योगधंद्यांमुळे ठाण्याच्या रहदारीत प्रचंड वाढ झाली. बोरीबंदर स्टेशनमधून दररोज पाच लाख लोकांची ये-जा होते, तर ठाणे रेल्वेस्टेशनातून रोजी साडेतीन लक्ष लोकांची ये-जा होते. म्हणजे रहदारीच्या दृष्टीने भारतात पहिला क्रमांक लागतो बोरीबंदरचा आणि दुसरा क्रमांक लागतो ठाणे स्टेशनचा. परंतु या रहदारीचे प्रमाणात रेल्वेस्टेशनवर आणि स्टेशनच्या परिसरात आजपर्यंत कोणत्या सुविधा होत्या ? फारच थोड्या.

ऑक्ट्रॉय कराची माफी देऊन ठाणे शहरात उद्योगधंदे आणले तरी गुडस् यार्डसाठी लागणारी जागा नगरपालिकेच्या तत्कालीन पदाधिकाऱ्यांनी नाकारल्यामुळे ठाण्याचे गुडस् यार्ड भांडूपला गेले. त्यामुळे उद्योगांचे एकप्रकारे नुकसानच झाले, अशी व्यथा श्री. प्रधान यांनी बोलून दाखविली.

ठाणे शहराचा योजनाबद्ध विकास होण्यासाठी एक विकास आराखडा आखण्यात आला. त्यामध्ये नगरपालिकेच्या कामासाठी तसेच मार्केट, बगिचे इत्यादी सार्वजनिक कार्यासाठी विशिष्ट जागा राखून ठेवल्या. परंतु ठाणेकर नागरिकांचे दुर्दैव असे की, ठाणे नगरपालिकेचे तत्कालिन सभासद, पदाधिकारी, नगरपालिकेचे आणि सरकारी खात्यातले अधिकारी यांनी हातात हात घालून या राखून ठेवण्यात आलेल्या जागांची मन मानेल तशी विल्हेवाट लावली, असा स्पष्ट आरोप श्री. प्रधान यांनी केला. याचा परिणाम असा झाला आहे की, ठाणे नगरपालिकेला एखाद्या महत्त्वाच्या कामासाठी जागा हवी असें वाटले तर एकही सोयीस्कर जागा शिल्लक नाही.

## उत्पन्नात वाढ

'ठाणे शहर हे उद्योगधंद्यांनी गजबलेले शहर म्हणून भारतात प्रसिद्ध असले तरी बडे घर आणि पोकळ वासा अशीच त्याची परिस्थिती आहे. ही गोष्ट नगरपालिकेच्या उत्पन्नाच्या आकडेवारीवरून कळून येण्यासारखी आहे.

श्री. प्रधान यांनी १७ डिसेंबर १९७४ रोजी नगराध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली. त्यावेळी नगरपालिकेचे अंदाजपत्रक १ कोटी ९० लक्ष रुपयांचे होते. परंतु त्यांनी अंदाजपत्रकांत दुरुस्ती सुचवून ते साडेतीन कोटींचे केले. ह्या महिन्यात नगरपालिकेचे जे अंदाज पत्रक मांडण्यात येणार आहे ते साडेसहा कोटी रुपयांचे असणार आहे. याचाच अर्थ दोन वर्षांच्या कालावधीत अंदाजपत्रकात तीन कोटी रुपयांची वाढ झाली आहे. यापैकी सव्वा कोटी रुपयांच्या सरकारी अनुदानाचा समावेश आहे.

गेल्या दोन वर्षांच्या आपल्या कारकीर्दीत आपण काय केले याविषयी सांगताना श्री. प्रधान म्हणतात : अंदाजपत्रकाच्या रकमेत भरघोस वाढ झाली आहे. या व्यतिरिक्त सुंदर शहर–निर्मितीचे दृष्टीने झाडे लावण्याची मोहीम हाती घेण्यात आली. पहिल्या वर्षी शहरात ७,५०० झाडे लावण्यात आली, त्यापैकी ८० टक्के झाडे जगली. येत्या पावसाळ्यात आणखी साडेसहा हजार झाडे लावण्यात येणार आहेत. शहरातील बरेच रस्ते रुंद केले. तीन नवीन कारंजी सुरू केली. पादचाऱ्यांची सोय व्हावी म्हणून फूटपाथना रेलिंग्ज बसविली, मार्केटमध्ये भाजी विक्रेत्यांसाठी चांगल्या सोयी उपलब्ध करून दिल्या. रस्तारुंदी किंवा अन्य कारणांमुळे बेघर होणाऱ्या लोकांसाठी हौसिंग बोर्डाकडून साडेसत्ताबीस लाख रुपयांना २४० गाळे विकत घेतले. लौकरच झोपडपट्टीवासीयांसाठी आणि अत्यल्प उत्पन्न गटातील लोकांसाठी घरबांधणी योजना हाती घेण्यात येणार आहे. या योजनेनुसार साडेचार हजार रुपयांमध्ये १६० चौरस फुटांचा गाळा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

ठाणेकर नागरिकांची क्रीडांगणविषयक आणि नाट्यविषयक अडचण दूर करण्यासाठी, तसेच शाळेची आणि मार्केटची भव्य इमारत बांधण्याचे दृष्टीने उपाययोजना हाती घेतली गेली. यापैकी स्टेडियमचे आणि नाट्यगृहाचे काम अर्धवट थांबविण्यात आले आहे, तर मार्केटच्या आणि शाळेच्या इमारतींच्या बांधकामासाठी, सरकारकडून स्थगिती आली आहे. या सर्व गोष्टींच्या मुळाशी ठाण्याच्या आमदार सौ. विमल रांगणेकर याच आहेत, असा श्री. प्रधान यांनी स्पष्ट आरोप केला.

## इतर सुविधा

ठाणेकर जनतेला आणखी कोणत्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे बाबतीत आपण प्रयत्नशील आहात, असे विचारता श्री. प्रधान म्हणाले की, जुन्या बागा सुस्थितीत आणल्या जात आहेत. नव्या बागांची रचना चालू आहे. पोखरण तलाव, रायलादेवी तलाव (वागळे इस्टेट) यांची कामे चालू आहेत तर

कचराळी तलावांचे ( पाचपाखाडी ) काम लौकरच हाती घेण्यात येणार आहे. याशिवाय शहरातील कचऱ्याचा योग्य प्रकारे निचरा व्हावा म्हणून खतनिर्मितीचा यांत्रिक प्लॅन्ट बसविण्यात येणार आहे.

शहरात जी कारंजी बसविण्यात आली आहेत, त्यासाठी नळाच्या पाण्याच्या विनियोग न करता जवळपासच्या विहिरी किंवा तलाव यांच्या पाण्याचा उपयोग करण्यात येतो, ही गोष्टही त्यांनी स्पष्ट केली.

ठाणे शहराची जी आज वाटेल तशी वाढ झाली आहे, त्याचे कारण ठाण्यात आजवर झालेली अनियमित स्वरूपाची बांधकामे होत. असे सांगून श्री. प्रधान म्हणाले की, ठाणे शहरातील एकूण बांधकामांपैकी ६० टक्के बांधकामे अनियमित स्वरूपाची आहेत. यामध्ये किसननगरसारखी ३०/३५ हजार लोकसंख्येची वसाहत आहे. त्याचप्रमाणे अनेक हौसिंग सोसायट्याही आहेत. ही अनियमित बांधकामे नियमित करून दिली जात आहेत. परंतु यापुढे मात्र अनियमित कामांना नियमित करून घेतले जाणार नाही आणि त्याचे परिणाम अनियमित कामे करणाऱ्यांनाच भोगावे लागतील, असा त्यांनी स्पष्ट इशारा दिला.

ठाणे नगरपालिका आपल्या नोकरवर्गावर एकूण अंदाजपत्रकापैकी फक्त १२ टक्के खर्च करते, असे सांगताना नगराध्यक्ष म्हणाले की, एकटी मुंबई महानगरपालिका वगळता ठाणे नगरपालिका आपल्या कर्मचाऱ्यांना देत असलेल्या पगाराचे प्रमाण भारतातील कोणत्याही नगरपालिकेपेक्षा सर्वांत अधिक आहे.

### माध्यमिक शाळा उघडणार

ठाणे नगरपालिका शहरात आज ३९ प्राथमिक शाळा चालविते. परंतु आजची खरी समस्या माध्यमिक शाळांत प्रवेश मिळविण्याबाबतची आहे. ठाणे शहरातील विद्यार्थी–संख्या आजच्या माध्यमिक शाळा पुरेशा प्रमाणात सामावू शकत नाहीत. म्हणून माध्यमिक शाळा सुरू करण्याचा ठाणे नगरपालिकेचा विचार आहे. विशेषत: शहराच्या ज्या भागात आज माध्यमिक शाळांची सोय नाही, त्या भागात अशा शाळा काढण्याचा नगरपालिकेचा विचार चालू आहे. या बाबतीत शासनाशी गेली दोन वर्षे वाटाघाटी चालू आहेत. परंतु सरकारने अद्यापि या योजनेला मान्यता दिलेली नाही. ती लौकर मिळेल, अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली.

पाणीपुरवठ्यासाठी ठाणे नगरपालिका आणि या शहरातील उद्योगधंदे मिळून सालीना ८० लक्ष रुपये देतात, म्हणून पाणीपुरवठ्याची स्वतंत्र व्यवस्था करण्याचा नगरपालिकेचा विचार आहे. उल्हास नदीवर पंप बसवून हे पाणी ठाण्याला पुरविता येण्यासारखे आहे. ही योजना सध्या विचाराधीन आहे. शक्य तितक्या लौकर ही योजना प्रत्यक्षात आणण्याबाबत ठाणे नगरपालिका उत्सुक असल्याचे त्यांनी सांगितले.

पाचपाखाडी भागात नगरपालिकेसाठी भव्य इमारत बांधण्याचाही पालिकेचा संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. प्रधान यांनी दिलेल्या मुलाखतीवरून ठाणेकर जनतेला नागरी सुविधा प्राप्त करून देण्याच्या बाबतीत नगरपालिका जागरूक आहे, हे दिसून येईल. परंतु सर्वसाधारण जनतेचे मात्र त्यांना या कामी पुरेसे सहकार्य लाभले नाही तर हे सर्व परिश्रम फुकट जाण्याचीही भीती आहे. शहराच्या सुधारणेच्या मार्गात राजकीय आकस आला तर त्याचे परिणाम स्थानिक जनतेला म्हणजेच करदात्यांना कसे भोगावे लागतात, त्याचा दृश्य परिणाम–म्हणजे स्टेडियम आणि नाट्यगृहाचे पडलेले अर्धवट बांधकाम. ठाणेकर जनतेने या कामी सरकारवर एकमुखी दबाव आणून ही अर्धवट राहिलेली बांधकामे पुरी करण्यास भाग पाडले पाहिजे. □


# DINA TRADERS

**Dealers and Contractors**
**FOR**
**Kraft Paper For Packaging**
**Packagings For Industries**

Contact
**DINA TRADERS**
9, Nikunj
opposite Damani Estate
Naupada, Thana 2.
Phone : 593019

**Authorised Agents For**
**M/s Kadodra Paper**
**Industries, Surat**

# राजकारण–नव्हे समाजकारण !

## आमदार सौ. विमलाबाई रांगणेकर यांची मुलाखत

ठाणे शहराच्या विद्यमान आमदार काँग्रेसच्या सौ. विमल रांगणेकर, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे क्रिकेटपटू श्री. खंडू रांगणेकर ह्यांच्या पत्नी. 'माणूस' ठाणे–पुरवणी ठरवली गेली, तेव्हा आपापल्या प्रांतातल्या जबाबदार व्यक्ती ह्या दृष्टीने ह्या दोघांनाही भेटणं क्रमप्राप्तच होतं. पण भेटायला जायला मन धास्तावत होतं. मागच्या ठाणे नगरपालिका निवडणुकांवेळचं एका प्रचारकाचं (व जबाबदार माजी नगरसेवकाचंही) भाषण मला आठवत होतं. ह्या भाषणात ह्या प्रचारकानं दणकावून सांगितलं होतं की, रांगणेकर-मंडळींचा आब, 'भाव' आता भलताच वाढला आहे. सामान्य मंडळींना त्यांच्या घराची पायरी चढायची म्हणजे सुद्धा छातीत धडधडायला होतं. असं असलं तरी, ठाणे–पुरवणीत ही दोघंही असणं आवश्यकच होतं. शेवटी मनाचा हिय्या करून फोन उचलला. नंबर फिरवला.

'हॅलो, मला श्री. खंडेराव रांगणेकर किंवा आमदारबाईंशी बोलायचं आहे.'

'हां, मी रांगणेकर बोलतोय. बोला...'

मी कामाचं स्वरूप सांगताच, बाई घरी नसतानाही, दोघांच्या वतीने, दुसऱ्या दिवसाची वेळ मला मिळाली. दुसऱ्या दिवशी माझं स्वागतही चांगलं झालं आणि नंतर सारखाच मी त्यांच्याकडे जात राहिलो. सकाळी ७ वाजताही बेल वाजवायचो, तर कधी रात्री १० वाजताही. आणि प्रत्येक वेळी त्यांच्याकडे आठ–दहा, आठ–दहा लोक असायचेच. अगदी भाजीवाले–वाल्या, सफाई कामगार ते साहेबी टाय–सूटवालेही ! खंडू रांगणेकरांकडे तर चौदा–पंधरा वर्षांची मुलंही बिनधास्त घुसायची 'मला क्रिकेट क्लबचं सभासद व्हायचंय' सांगत. ह्यातनंच माझी धास्ती संपली, भीड चेपली आणि मुलाखत तर फार फार मनमोकळी झाली...

विमलाताईंशी बोलताना प्रथम जाणवलं ते हे की, त्या पट्टीच्या राजकारणी नाहीत. त्यांचा पिंड जाणवतो तो समाजसेविकेचा ! त्यातही त्यांना आस्था आहे ती आरोग्यविषयक सामाजिक प्रश्नांची, शहरातल्या महिला संघटनांविषयी. झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनाऐवजी, आहे त्या ठिकाणी झोपडपट्ट्यांत सुधारणा घडवून आणण्याला त्या जास्त महत्त्व देतात आणि त्याहीपेक्षा आवश्यकता त्यांना वाटते ती ह्या झोपडपट्टीवासीयांचा मानसिक दृष्टिकोन बदलण्याची ! त्यांची झेप उंचावण्याची, त्यांची राहणी सुधारण्याची ! !

विमलाताई आमदार आहेत. राजकारण अजीबात टाळणं, अर्थातच त्यांच्या आमदारकीमुळे त्यांना शक्य नाही. तरी पण दोन–चार दिवसांतल्या त्यांच्या घरी झालेल्या खेपांवरून मला असं वाटतं की, त्यांचा जास्त वेळ वर उल्लेखिलेल्या विविध सामाजिक संस्थांच्या समाजकारणातच जात असावा. ठाण्यातल्या सिव्हिल हॉस्पिटलच्या समितीवर त्या प्रथमपासून आहेत. ठाणे शहरात काम करणाऱ्या सर्वच महिला संस्थांशी–मग त्या महिला संस्था कुठल्याही पक्षांच्या व अपक्षांच्या असोत–त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन, ठाण्यातल्या महिला मंडळांनी बरीचशी भरीव कामगिरी केली आहे. ह्या कामगिरीचा स्वतंत्र लेखात मीना फणसे ह्यांनी आढावा घेतलेला असला तरी, इथे एक–दोन गोष्टी पुन्हा सांगायला काहीच हरकत नाही.

तसा ठाण्यातल्या सर्वच महिलांशी विमलाताईंचा संबंध आहे. एकेका संस्थेचे प्रश्न घ्यायचे, ते सोडवायचे, संस्थेला सुस्थिरता आणून द्यायची आणि नंतर त्या संस्थेची जबाबदारी तिथल्याच महिलांवर सोडून आपण नुसतं मार्गदर्शन करत राहायचं, प्रत्यक्ष कामाचा रोख दुसऱ्या एखाद्या संस्थेच्या जडणघडणीकडे वळवायचा, ही साधारणतः विमलाताईंनीच सांगितलेली त्यांच्या कामाची पद्धत. 'ह्यातून काही महिला मंडळांनी काही खरोखरच चांगली कामं केलेली आहेत. उदाहरणार्थ, 'सुखदा' महिला मंडळ गरजू स्त्रियांना शिवणयंत्रे पुरविते, कापड, साहित्य (अगदी दोऱ्यापासून !) पुरविते, ऑर्डर्सप्रमाणे कपडे विविध संस्थांना पुरविते. ह्या संधीचा लाभ घेणाऱ्या काही महिला आज फावल्या वेळात महिना १५०/– रुपये किंवा अधिक सहज मिळवून जातात...'

महिला आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा महिला मंडळाची हातमाग एजन्सी कल्पना, कर्मचारी महिला निवासगृहाचा (Working Women's Hostel) संकल्प आदी आजच्या ठाण्यातल्या घडामोडींचा धावता परामर्ष घेऊन श्रीमती विमलाबाई म्हणतात की, 'महिलांनी सामाजिक जबाबदारी उचलली पाहिजे. मध्यम वर्गीय महिलांना, पुढाकार घेऊन खूप कामं आजही करता येण्याजोगी आहेत. विविध विषयांत प्राविण्य मिळविलेल्या अनेक महिला आज ठाण्यात आहेत. डॉक्टर्स, वकील, अर्थज्ञ वगैरे वगैरे. ह्यांनी एकत्रित येऊन, गरजू स्त्रियांना विनामूल्य सल्ला देणारी केंद्र (Women's Aid Centres) निर्माण करावीत असं वाटतं. त्याच प्रमाणे, झोपडपट्ट्यांविषयी नुसतीच बोटं मोडण्याऐवजी तिथल्या महिलांना शिक्षण देणं आवश्यक आहे असं मला वाटतं. बालसंगोपन, साध्याच व स्वच्छ कपड्यांची व त्यांना परवडेल पण तरीही चौफेर राहील अशा आहाराची आवश्यकता वगैरे प्रश्नांवर झोपडपट्टीतील स्त्रियांना व काही अंशी इतरत्रच्याही स्त्रियांना खूप काही मार्गदर्शन केलं जाण्याची आवश्यकता आहे... तिथल्या शाळांचे प्रश्न हाताळण्याजोगे आहेत...

'मागे एकदा झोपडपट्ट्यांचा सर्व्हे आम्ही घेतला होता. तिथे अनेकांना महारोग वा तत्सम रोगांची लागण झाल्याचं आढळून आलं होतं... ह्या बाबतीत योग्य ती काळजी घेणं, सुविधा उपलब्ध करून देणं ह्या खऱ्या तर नगरपालिकेच्या प्राथमिक जबाबदाऱ्या. पण दुर्दैवानं असं म्हणावं लागतं की, नगरपालिका ह्याबाबत जागरूक नाही.

'वास्तविक ठाण्यासाठी स्वतंत्र असं 'इन्फेक्शस डिसिझेस हॉस्पिटल' आवश्यक आहे. ठाण्यातल्या अशा रोग्यांनी मुंबईच्या हॉस्पिटल्समधून प्रवेश मिळवायला फार अडचण येते... कामगारांसाठी स्वतंत्र असं तीनशे खाटांचं हॉस्पिटल ठाण्यात येत आहे. ह्याही बाबतीत ठाणे नगरपालिकेनं अक्षम्य उपेक्षा दाखवली, असंच मी म्हणेन...'

महिला मंडळ, सामाजिक कार्य, आरोग्यविषयक कार्य वगैरे आपल्या लाडक्या विषयांवर बोलता बोलता, विमलाबाई ह्या ठिकाणी अगदी नकळत माझ्या मनात असलेल्या एका प्रश्नावर आपल्या भावना दिलखुलासपणे बोलून गेल्या. दोन वर्षांच्या आपल्या अध्यक्षीय कारकीर्दीत नगराध्यक्ष सतीश प्रधान ह्यांनी भव्य स्टेडियम, पोहोण्याचा तलाव, नाटचगृह वगैरे कामं हाती घेतली. कामं जोरात सुरू असतानाच, त्यांच्यावर मनाई हुकूम बजावण्यात आला आणि ही सर्व कामं आज अर्धवट अवस्थेत बंद पडून आहेत. अनेक ठाणेकरांना हा प्रश्न जाचतो आहे. अनेक तर्कवितर्क ठाण्यात प्रचलित आहेत. कुणी म्हणतात, गेल्या १॥–२ वर्षात अगदी रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे, रेलिंग लावण्यापासून तो तहत् स्टेडियमपर्यंतच्या प्रत्येक कामात वाजवीपेक्षा प्रचंड मोठ्या प्रमाणात पैशांची धूळधाण झालेली असल्याने आर्थिकदृष्ट्या गैरप्रकारांचा अतिरेक झाल्याने ह्या कामांना पायबंद घालून सतीश प्रधानांची सी. बी. आय्. मार्फत गुप्त चौकशी चालू आहे. कुणी म्हणतात, सतीश प्रधानांची तडफ सहन न होऊन आमदार रांगणेकरबाई व इतर काँग्रेसजनांनी आकसाने तक्रारी करून कामं बंद पाडली आहेत. आणखी एक तर्क असाही आहे की, सतीश प्रधानांना काँग्रेसमध्ये आणण्याच्या दृष्टीने दडपण आणण्यासाठी हे मनाई हुकूम आहेत. कारणे काहीही असोत, त्यात तथ्य असो वा नसो, कामं अशी अर्धवट राहिल्याने ठाणेकरांची स्वप्नं आज तरी धुळीला मिळाल्यासारखी झाली आहेत. अॅड. मिनिस्ट्रेटर का होईना, पण ह्या अर्धवट वास्तू पुऱ्या होण्यासाठी हालचाली व्हाव्यात असं ठाणेकर मंडळींना मनापासून वाटतं. मग चौकशीची खेंगटं वा इतर भानगडी दुसऱ्या बाजूनं चालू राहिल्या तरी हरकत नाही.

ठाणे नगरपालिकेच्या कारभारावर हल्ला करताना आमदारबाईंनी नेमक्या ह्याच समस्येला हात घातला. त्याविषयी बोलताना त्या म्हणाल्या, '...काही तरी भव्य-दिव्य करण्याच्या व स्वतःवर प्रकाशझोत पाडून घेण्याच्या प्रयत्नात नगरपालिकेला स्वतःच्या मूलभूत कामांचा विसर पडला. स्टेडियमऐवजी ठाण्याला आवश्यकता होती चांगल्या मैदानासह छोट्यांशा क्लबहाऊसची. पण त्याऐवजी एवढा भव्य स्टेडियम बांधून एकूण खेळच ठाणेकरांना नगरपालिकेनं महाग करून टाकला. त्यात पुन्हा ह्याच्यावरचा खर्च अव्वाच्या सव्वा. जेव्हा हे बोलणं झालं तेव्हा नगराध्यक्ष म्हणाले, आता फार उशीर झाला आहे. अरे, पण आम्ही हे पहिल्या दिवसापासून सांगत होतो. ह्या स्टेडियमचा तसा ठाण्यातल्या सामान्य खेळाडूंना फारसा फायदा होईल असं वाटत नाही...

'जी गोष्ट स्टेडियमची तीच गोष्ट वियोजित नाटचगृहाची. नाटचगृहाची ठाणेकरांची सध्याची गरज, बेडेकर, एम्. एच. व न्यू इंग्लिश ह्या शाळा भागवत आहेत. तिथल्या खुल्या नाटचगृहातून होणाऱ्या नाटकांचं उत्पन्न शाळांच्या इमारत निधीसाठी व शिक्षणासाठी ह्या शाळांतून उपलब्ध करून द्यायच्या सोयींसाठी वापरण्यात येतं. नवीन नाटचगृहाच्या निर्मितीबरोबर, शाळांच्या ह्या स्तुत्य उपक्रमावर जी गदा येणार तिचाही विचार झाला पाहिजे. त्यांना काही निश्चित आश्वासनं, ह्या नाटचगृहाच्या वापरासंबंधात मिळायला हवीत. ह्या नाटचगृहासाठी देखील व्हायचा खर्च वास्तवाशी थोडा तरी मिळताजुळता हवा...

'कोपरी गावात जी माध्यमिक शाळा नगरपालिका उभारू इच्छित आहे, तिथे २७ लाख रुपये खर्चून १२ वर्गांची सोय होणार आहे म्हणे. हे काहीतरीच वाटतं. इथेही खर्चाची बाब वगळता, टप्प्याटप्प्यांनी कार्यक्रम आखायला हवा होता. शिवाय शहराच्या एका परिसरात एवढी प्रचंड शाळा उभारताना शहराच्या इतर भागांकडे व्यवस्थित दुर्लक्ष केलं जातं...

'अशा कित्येक गोष्टी सांगता येतील सध्याच्या ठाणे नगरपालिकेच्या कारभाराबद्दल. पण मी राजकारणी नाही. मला ह्या साऱ्या गोष्टींचं काही भांडवलही करायचं नाही. पण एवढं मात्र खरं की, नगरपालिकेनं अशा काही भव्यदिव्यत्वाच्या मागे लागू नये. त्यासाठी अमाप पैसा उडवू नये. त्याऐवजी ठाण्याच्या नागरी समस्यांना प्राधान्य द्यावं. ठाणे शहराच्या विस्ताराची ज्यांना कल्पना आहे त्यांना, ठाणे शहर आपल्या पाणीपुरवठ्यासाठी मुंबईवर अवलंबून आहे, हे ऐकून आश्चर्याचा धक्का बसेल. पण ही वस्तुस्थिती आहे. नगरपालिकेला स्वतंत्र पाणीपुरवठ्याचे आराखडे देऊनही ह्या प्रकरणी नगरपालिकेनं अक्षम्य दिरंगाई चालवलेली आहे... अशाच पद्धतीनं नागरी सुखसोयींशी निगडीत अनेक गोष्टी नगरपालिकेला करणं सहज शक्य आहे. उदाहरणार्थ, कामगारांच्या समाजकल्याणासाठी सुखसोयी, ललित क्रीडा केंद्रे, लायब्ररी, हॉस्पिटल, वाचनालयांचं जाळं, बसवाहतूक वगैरे वगैरे...मी मूलतः समाज कार्यकर्ती. सासर–माहेर दोन्हींकडून तो वारसा माझ्याकडे चालत आलेला आहे. राजकारणातल्या फार मोठ्या महत्त्वाकांक्षा मला नाहीत. काँग्रेसची मी एक साधी पाईक. इंदिराजींचा वीस कलमी कार्यक्रम हा खरोखरीच सामाजिक सुधारणांचा पाया आहे. पण स्टेडियम, नाटचगृह, भव्य शाळा, कारंजी, वगैरेंसारखे भपकेबाज कार्यक्रम ह्या वीस कलमी कार्यक्रमाच्या विरोधात आहेत, त्या कार्यक्रमाच्या चौकटीबाहेरचे आहेत, असं प्रांजळ मत आहे माझं. त्यातही त्यावर होणारा अफाट खर्च–लक्षावधी जनता एका वेळच्या जेवणालाही मोताद असताना हे खर्च पटत नाहीत मनाला आणि म्हणूनच हा विरोध !'

विमलाताईंकडनं निघायला रात्रीचे दहा वाजून गेले होते. दुसऱ्या दिवशीच्या 'ठाणे वैभव'नं दणकावून बातमी (अंदाज अर्थातच !) दिली– 'विमलाबाई रांगणेकर लोकसभेसाठी–सतीश प्रधानांच्या विरोधात !' राजकारणी महत्त्वाकांक्षा नाहीत म्हणता म्हणता, हा पल्ला बाईंनी गाठला की काय ? पण सकाळीच फोनवर बाईंनी खुलासा केला– 'बातमीत काही तथ्य नाही. इथलं समाजकारण हेच माझं क्षेत्र. एवढ्या मोठ्या राजकारणाचा मला अजीबात हव्यास नाही...'

–प्रतिनिधी

# नवीन ठाण्यातला ठाणेकर

स. वा. आगाशे

ठाणे शहराचं एक आगळे वैशिष्टच आहे ! निदान आता सर्व दृष्टीने विकसित झालेल्या ठाणे शहराच्या नव्या स्वरूपामध्ये हा दोष मोठ्या प्रमाणावर लक्षात येतो. शहराच्या सामाजिक जीवनामध्ये त्याला दोषच म्हणावा लागेल. इतर शहरांमध्ये सहसा न आढळणारा आणि म्हणून आगळा व वैशिष्टचपूर्ण !

या शहराच्या कानाकोपऱ्यांत अनेक श्रेष्ठ कर्तृत्वाची मोठी माणसे राहतात. अनेक संस्था आणि कार्ये या समाजधुरिणांच्या केंद्रबिंदूच्या आधाराने उभी आहेत. परंतु सर्व शहराने मान्यता दिलेली, व्यापक स्वरूप असलेली मराठी ग्रंथ संग्रहालयासारखी एखादी संस्था अपवादात्मकच. पुण्याच्या कुठल्याही गल्लीत अखिल भारतीय संस्था निर्माण होऊ शकते, पण ठाणे शहरात कोणतेही कार्य कितीही मोठे असले किंवा झाले तरी सर्व शहरव्यापी रूप घेऊ शकत नाही. इथे साहित्य मंडळे आहेत. विद्यालये, महाविद्यालये आहेत. सेवासंस्था आहेत. सांस्कृतिक मंडळे आहेत. सहकारी संस्था आहेत. संगीत सभा आहेत. साधारणपणे एखाद्या सुखवस्तू व सुसंस्कृत पांढरपेशा शहरात जितक्या आणि जेवढ्या संस्था असू शकतात, तेवढ्या येथे आहेत. पण सर्व संस्थांचे कार्य एखाद्या गटापुरते मर्यादित आहे. वाईट अर्थ टाळून या संस्थांना संस्थानेसुद्धा म्हणता येईल; इतकी ती एकमेकांपासून दूर आहेत. वाईट अर्थ मात्र टाळावाच लागेल, याचे कारण या सर्व संस्था हीन राजकारणे, स्पर्धा किंवा एकमेकांचे पाय ओढणे, यांपासून अलिप्त आहेत.

तसा अलिप्तपणा या शहराच्या समाजजीवनाचा उपजत गुणच झाला आहे. इथे समाजाचे सर्व थर आहेत. आर्थिक दृष्टीने विभिन्न, पेशाने विभिन्न व सांस्कृतिक दृष्टीने विभिन्न असा सर्व प्रकारचा समाज या ठिकाणी एकत्र आला आहे. पण या एकत्र येण्याला कोणते समान सूत्र नाही. मोहिमेवर असताना कुठे तरी राहुटी ठोकली तर त्या ठिकाणाला जसे विशेष महत्त्व नसते तसेच या ठाणे शहराचे आहे. दादर-पार्ल्याची जागा परवडत नाही म्हणून ठाण्याला जागा घेणारे आपलं मन दादर-पार्ल्याला ठेवून येतात. ठाण्याच्या समाजजीवनात त्यांना रसच असत नाही आणि याच पद्धतीने ठाण्यात आलेल्या आधीच्या ठाणेकरांनाही नवीन आलेल्यांना आपल्यात सामावून घ्यावे, एकरस करून घ्यावे, असे वाटत नाही. एखाद्या अधिवेशनाला जमा झालेले गावोगावचे प्रतिनिधी, एकाच निवासस्थानी उतरले तरी जसे एकमेकांशी सांभाळून व अलिप्ततेने वागतात, तसेच ठाणे शहरवासीयांचे आहे.

त्यामुळे इथल्या संस्थाच नव्हे तर उद्योगधंद्यांनासुद्धा वेगवेगळ्या बेटांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. बोरीबंदर स्टेशनवरील चहाच्या किंवा फळांच्या स्टॉलवाल्याचे जे नाते गिऱ्हाइकाशी असते किंवा असू शकते, तितकेच आणि तसेच नाते इथल्या धंदे-व्यावसायिकांचे ठाण्याच्या नागरिकांशी आहे. सूतिकागृह चालविणाऱ्या येथील नामवंत डॉक्टर्सना जसे ही अष्टपुत्रा होवो आणि हिची सर्व बाळंतपणे येथेच होवोत, असे वाटत नाही, तसेच वाण्यालाही या कुटुंबाची पुढच्या महिन्याची यादी आपल्याकडेच यावी, असे वाटत नाही. येथे वकिली करणाऱ्या नामवंत वकिलाला अशिलाचे कायमचे कायदेशीर सल्लागार व्हावे, असे वाटत नाही आणि इथल्या साध्या नाभिकालासुद्धा हे डोके वारंवार आपल्याकडे येवो, असे वाटत नाही. इथला बाजार दुकाने, दवाखाने, कार्यालये यांनी भरगच्च आहे. बाजार एखाद्या कुंभमेळ्याच्या बाजारासारखा किंवा जत्रेसारखा वाटतो. दुकानदाराला गिऱ्हाइकाबद्दल आस्था नाही आणि गिऱ्हाइकाला दुकानदाराबद्दल आत्मीयता नाही. हा दुकानदार ही पेठ, हे शहर, आपले आहे, या भावनेचा सार्वत्रिक अभाव आढळतो. याचाच परिणाम सामाजिक जीवनावर झालेला आढळतो. कोणतीही सामाजिक चळवळ ही एखाद्या गटापुरती मर्यादित आहे. मग ते विद्यालय असो, वाचनालय असो, की सहकारी संस्था असो.

सामाजिकच नव्हे तर राजकीय कार्येसुद्धा अशी कप्पेबंद आहेत. तसाच विचार केला तर या शहराने सर्व ठाणे जिल्ह्यास राजकीय नेतृत्व पुरविले आहे. सर्व पक्षाचे मान्यवर नेते या शहरामध्ये वास्तव्य करून होते व आहेत. पण त्यांचे कार्यसुद्धा या शहराचा विचार करता हवाबंद कप्प्यामध्येच बंदिस्त आहे. पूर्वीच्या ३०-४० हजार वस्तीमध्ये आता हजारो नवीन लोक आले आहेत. त्यामध्ये आपले पाठीराखे कोण आहेत, याची दखलसुद्धा हे नेतेमंडळ निवडणुकांपुरतीच घेताना दिसते. मग आपले शोधता शोधताच प्रचाराची वेळ सरून जाते. निवडणुकीचे निकालही त्यामुळे नामवंताला आणि नवख्याला सारखेच धक्कादायक होतात. कधी कोणाला सुखद आणि कधी दुःखद !

तसा विचार केला तर येथील सर्वच राजकीय पक्षांचे नेतृत्व तोलामोलाचे आहे. आपल्या परीने ध्येयनिष्ठा व कार्य या दृष्टीने या थोर व्यक्ती आहेत. स्वार्थी क्षुद्र विचार आणि विरोधकांबाबत द्वेषभाव यांपासून हे नेतेमंडळ अलिप्तच राहिलेले आहे, याचा प्रत्यय नुकताच येऊन गेला.

विरोधकांबद्दल येथूनच तक्रारी (खोट्यानाट्या) होऊन कोणाला राजकीय बंदिवास पत्करावा लागला नाही. मिसाबंदीचे प्रमाण ठाणे शहरात अल्पच राहिले. असे असूनसुद्धा जिल्ह्याचे नेतृत्व करणाऱ्या या व्यक्ती शहराच्या नेत्या आहेत, असे म्हणणे धाडसाचेच होईल. कारण या शहरात प्रत्येकजणच एकटा आहे, वेगळा आहे.

परंतु सर्व वृत्तींचा सामाजिक जीवनावरील परिणाम विपरीतच होत आहे. सर्व सामाजिक संस्थांच्या विकासाला व प्रगतीला मर्यादा पडत आहेत. सर्वांची वाढ खुंटल्यासारखी दिसत आहे. ज्या व्यक्तींच्या भोवती या संस्था आहेत, त्यांच्या क्षमतेच्या आकाराइतक्याच त्या संस्था लहान किंवा मोठ्या होत आहेत. या संस्थांच्या मागे सर्व शहर

With Best Compliments From :

# CATALYST ( INDIA ) LTD.

Manufacturers

of

Vanadium Pentoxide Catalyst

**For**

**Sulphuric Acid Plants**

**Ragd. Office :**

Chinai Building
79, Masjid Bunder Road,
Bombay 400 003.

Tel. No. : 32 42 46

**Factory :**

Sandoz baug, P. O.
Kolsheti Road,
Thana 400 607

Tel. No: : 59 19 12

Telex : CHINAI 011 – 2059
Telegraphic Address : CANON BOMBAY

एकजिनसीपणाने उभे असल्याचे चित्र दिसत नाही. संस्थाच्या उत्कर्ष–अपकर्षाचे प्रसंगी सर्व समाजाचे बळ उभे राहिलेले दिसत नाही. याचा परिणाम त्या संस्थांवर वाईटच होत आहे.

मरणाच्या किंवा आपत्तीत असलेल्या संस्थांना हे शहर तारू पाहात नाही आणि प्रगतिशील संस्थाना निःसंकोच प्रोत्साहन देऊ करीत नाही. कोणत्याही सामाजिक कार्यामागे सर्व व्यापक आणि ठोस सामाजिक प्रेरणा उभी राहत नाही.

यामुळेच एखाद्या सहकारी संस्थेच्या कार्यकारी मंडळात बेबनाव होऊन भांडणे कोर्टाच्या पायरीवर येऊन उभी राहिली तरी त्यामध्ये संस्थेच्या हिताचे दृष्टीने समझोता होण्यासाठी सामाजिक दडपण येत नाही. एखाद्या सहकारी बँकेच्या शहराला भूषण होऊ पाहणाऱ्या इमारतीच्या कामामध्ये पालिका अधिकारी सहजपणे अडथळे निर्माण करू शकतात. हे कार्य समाजाचे आहे, शहराचे आहे; याला अपशकून केल्यास आपण समाजद्रोही ठरू, ही भीतीच या शहरात निर्माण होत नाही. पालिकेच्या भल्याबुऱ्या कारभाराची चविष्ट चर्चा फावल्यावेळी सर्वच करतात, परंतु त्याच पालिकेच्या लाखो रुपये खर्चून उभ्या केलेल्या योजना ज्यांच्या कर्तृत्वाने कुचंबत पडतात; त्यांना जाब विचारण्यासाठी कोणीच नाही. सर्व हिंदुस्थानात भूषणावह ठरेल अशा बंधांना योग शिकविण्याच्या कार्याला एखाद्या बाईची लहर फिरतात्र अडथळेच अडथळे उभे राहू शकतात. त्या बाईला या कार्याची किंमतही कळत नाही व समाजाची चाड राहात नाही; कारण?

कारण येथले समाजकार्य पोरके आहे. ते आपले आहे अशी भावना येथील सर्व दृष्टीने समृद्ध, सक्षम नागरिकांमध्ये जोपासली जात नाही. एखाद्या विशाल वटवृक्षाच्या झाडावर बांडगुळे असावीत, त्यांना कधीना कधी खुरटावेच लागते, तशीच या सामाजिक कार्यांची अवस्था होणार काय? प्रत्येक ठाणेकराने गंभीरतेने विचार करावा असा हा अस्वस्थ करणारा प्रश्न आहे. □


With Best Compliments From :

**Turbhe Charchem Industries Pvt. Ltd.**

*The Only Manufacturers of*

**Bone Charcoal in India, meeting International Specifications.**

Office : KASARA STREET
3rd Lane, DARUKHANA
MAZGAON, BOMBAY – 400 010.

WORKS : PLOT – C – 41
T. T. C. INDUSTRIAL AREA
THANE – BELAPUR ROAD

ऑटोमॅटिक कंट्रोल्स
डिझेल जनरेटर्स
प्रोसेस इंटरलॉकिंग
इंपोर्ट सबस्टिटयूशन

कुठल्याही समस्या असो.
जरूर भेटा :–

# आर. वाय. एस. ऑटोकंट्रोल्स

कोलशेत, ठाणे – ४०० ६०७
दूरध्वनी : ५०११७५.

भारतात प्रथमच
'फिश वेफर्स'
शास्त्रोक्त पद्धतीने तयार केलेली
अत्यंत चविष्ट, रुचकर
आणि पौष्टिकही !
उत्कृष्ट पॅकिंग्जमध्ये लौकरच उपलब्ध
अधिक माहिती, व्यापारी चौकशीसाठी
व एजन्सीसाठी संपर्क साधा.

# 'स्पेसएज' प्रायव्हेट लिमिटेड

चेंबूर, मुंबई ४०० ०७१.
दूरध्वनी :
फॅक्टरी : नवी मुंबई
ठाणे – बेलापूर मार्ग

# ठाण्याहून जेव्हा प्रथमच दैनिक निघते—

नरेन्द्र बल्लाळ

१९५४ साली मी वृत्तपत्र व्यवसायात उमेदवारी सुरू केली. पुण्याचा 'सकाळ', 'तरुण भारत', 'विशाल सह्याद्री' या दैनिकात मी कॉलेज वार्ताहर, नाटय-चित्रपट समीक्षक आणि उपसंपादक अशा क्रमाने काम केले. पुढे मुंबईत महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी संचालनालयात वर्षभर काम केल्यावर 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये अगदी पहिल्या अंकापासून उपसंपादकीय जबाबदारी मी पार पाडली. अशा एकूण वीस वर्षांच्या या क्षेत्रातील अनुभवानंतर मला स्वतंत्र असे एखादे वृतपत्र काढावेसे वाटले. हे साहजिकच होते असे मी मानतो. या व्यवसायातील माझ्या अनेक सहकाऱ्यांना मात्र याचे आश्चर्य वाटते. पत्रकारांनाच नव्हे तर या व्यवसायाबाहेरील अनेकांनाही या गोष्टीचे आश्चर्य वाटते. त्याची कारणे दोन : पहिले आणि मुख्य कारण म्हणजे 'टाइम्स'सारख्या अत्यंत सुप्रतिष्ठित अशा वृत्तसंस्थेतील भरघोस वेतनाची व सुस्थिर नोकरी मी सोडली हे. दुसरे कारण, मुंबईला अगदी जवळ असणाऱ्या ठाण्याचे स्वतंत्र दैनिक (साप्ताहिक-पाक्षिक वगैरे काही नाही, एकदम दैनिक!) काढायला मी धजावलो हे. मुंबईची शहर आवृत्तीची वृत्त-पत्रे जिथे पहाटे येऊन धडकतात, तिथे हे दैनिक काढायचे कारण काय! असा प्रश्न वाचकांना पडला, तर हे दैनिक कसे काय चालेल अशी चिंता व्यवसायबांधवांना पडली!

पण मला तशी चिंता मुळीच वाटत नव्हती. मुंबई-ठाण्याला मी १९७१ मध्ये राहायला आलो. असंख्य उद्योगधंद्यांनी भर-लेला आणि झपाट्याने विस्तार पावणारा इथला औद्योगिक परिसर पाहून आणि खुद्द ठाणे जिल्ह्याचे विविधरंगी रूप लक्षात, आले तेव्हा, या भागाला स्वतःचे असे व्यक्तिमत्त्व असून त्याला स्वतःच्या अशा दैनिकाची तीव्र गरज आहे असे मला वाटू लागले. हे दैनिक कसे असावे याबद्दलच्या काही कल्पनाही मनात खेळू लागल्या. १९७२ मध्ये मला थॉम्सन फाऊंडेशन फेलोशिप मिळाली. आम्हाला शिकवणाऱ्या ब्रिटिश पत्रकारांशी चर्चा करता करता मनात असलेल्या जिल्हा पत्राची कल्पना अधिक पक्की झाली. फेलो-शिपचा अभ्यासक्रम पूर्ण करून परत येताच मी त्या दृष्टीने चाचपणीस (भारदस्त शब्द वापरायचा म्हणजे– मार्केट सर्व्हे) सुरुवात केली. मधल्या दोन-तीन वर्षांत या दृष्टीने मी जे प्रयत्न केले, विविध लोकांना भेटलो आणि बोलणी केली, ते सगळे प्रकरण मोठे मजेदार आहे. ते सगळे लिहायचे म्हणजे भल्याभल्यांची बंभेरी उडेल– पण ते सगळे मी कधीतरी लिहिणार आहेच.

शेवटी १ ऑगस्ट १९७५ रोजी मी 'महाराष्ट्र टाइम्स'चा राजीनामा दिला आणि २५ ऑगस्टला 'ठाणे वैभव'चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. वास्तविक तेव्हा आणीबाणी अंमलात आली होती. अनेक जुनी वृत्तपत्रे धडाधड बंद पडत होती. अशा वेळी नवे आणि तेही दैनिक पत्र काढणे हा प्रकार म्हणजे आत्मघात ठरेल, असे अनेक अनुभवी पत्रकारांनी मला सांगितले. पण ज्या स्वरूपाच्या वृत्तपत्राची कल्पना माझ्या मनात होती, तसे वृत्तपत्र आणीबाणीत अथवा नित्यवत परिस्थितीत पाहिजे तसेच चालवता येईल अशी माझी खात्री होती.

'ठाणे वैभव' हा मी एक प्रयोग मानतो. किंबहुना प्रायोगिक नाटक आणि हे दैनिक यांची तुलना करायचा मोहही मला होतो. प्रायोगिक नाटकाला स्वतःचा प्रेक्षकवर्ग तयार करावा लागतो. 'ठाणे वैभव'लाही स्वतःचा वाचकवर्ग आधी तयार करावा लागला. हा तयार करायला विलंब लागणे तर क्रम-प्राप्तच होते. पण जिल्ह्यातील विविध प्रश्नांचा त्याच्यातून सविस्तर ऊहापोह होऊ लागला, विविध समस्यांना वाचा फुटू लागली, अनेक कर्तबगार व्यक्तींवर प्रकाश टाकला जाऊ लागला, अनेक संस्थांच्या चांगल्या कार्याला तपशीलवार प्रसिद्धी मिळू लागली, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सभांचे सविस्तर वृत्तान्त प्रसिद्ध होऊ लागले, त्यांच्या कारभाराची प्रसंगोपात परखड व सकौतुक शहानिशा होऊ लागली, तेव्हा 'ठाणे वैभव'ला लोकांचे आणि नेत्यांचे प्रेम व आदर मिळवायला वेळ लागला नाही.

'सत्य असेल ते छापणार आणि योग्य वाटेल ते करणार' हे गोपाळ गणेश आग-रकरांचे ब्रीद कपाळी धारण करण्याचे धार्ष्ट्य मी केले. पण त्याचेही स्वागत झाले. बाळासाहेब ठाकरे माझे वीस वर्षांचे स्नेही, त्यांनी आवर्जून कळवले, 'हे ब्रीदवाक्य माथी धरणाऱ्याला डर कशाची? आगे बढो!'

कोणाचीही भीती न बाळगता 'ठाणे वैभव'ने बातम्या दिल्या, अग्रलेख लिहिला. या बातम्यांतील वा अग्रलेखांतील रोख हा व्यक्तीकडे कधीच नव्हता, तर तो हल्ला असे प्रवृत्तींवर. या प्रवृत्ती सोडल्या तर त्या-त्या व्यक्तींशी वैर असण्याचे कारण नाही, ही माझी भूमिका ज्या नेत्यांच्या-कार्य-कर्त्यांच्या हे लक्षात आले नाही त्यांनी त्यांच्या सोयीप्रमाणे जनसंघाचा, काँग्रेसचा, शिवसेनेचा असे शिक्के माझ्यावर मारले! आता त्यांना कळू लागले आहे की, आरंभी आश्वासिल्याप्रमाणे हे दैनिक जे सत्य, जे शिव त्याचे आहे.

या जिल्ह्याचे हे 'सांस्कृतिक व्यासपीठ' बनावे, ही माझी तळमळ आहे. जलप्रदूषण, वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण याविरुद्ध मी आरंभापासून मोहीम उघडली आहे. असे कुठे प्रदूषण आढळले की, लोक माझ्याकडे धाव घेतात. त्यांच्या तक्रारीला छापील शब्दांनी वाचा फोडताच योग्य कारवाई होते. मुंबईच्या वृत्तपत्रांना जागा देता येणार नाही, असे कितीतरी प्रश्न येथे आहेत. त्यांना 'ठाणे वैभव' प्रसिद्धी देते. डोंबिवलीच्या एका शिक्षणसंस्थेतील भ्रष्टाचाराचे साद्यन्त वृत्त आम्ही प्रसिद्ध केले आणि चौकशीची चक्रे फिरून त्या प्रकरणी न्याय्य ते केले गेले. आदिवासींची एक शाळा कोसळली होती. छायाचित्रांसह आम्ही ते छापले आणि भरा-भर मदत मिळून ती शाळा अधिक चांगल्या स्वरूपात उभी राहिली.

अनेक संस्थांचे चांगले कार्य लोकांपुढे येत

With Best Compliments From

# SETHI NIPPON PVT. LTD.

**Manufacturers of ALLOY STEEL
Castings in Collabarotion with
Nippon Precision Casting Corporation Japan**

Dhun Mansion,
Avantikabai Gokhale Road, Girgaon, Bombay 400 004.
Work : Kudal ( Dist. Ratnagiri )

नव्हते. आम्ही ते प्रसिद्ध करू लागलो, तशी त्यापासून तसेच काही चांगले करण्याची प्रेरणा इतर संस्थांना मिळाली. तशी कामे होऊ लागली. कल्पनांचे, विचारांचे अभिसरण होऊ लागले. हे फार मोठे कार्य या दैनिकाला करता आले, ही मी अभिमानाची गोष्ट मानतो.

आज एस. टी. च्या विभागीय नियंत्रकापासून कंडक्टरपर्यंत, प्राचार्यांपासून विद्यार्थ्यांपर्यंत, मंत्र्यांपासून आमदार–खासदारांपर्यंत, संस्थाचालकांपासून ज्येष्ठ शासकीय अधिकाऱ्यांपर्यंत आणि कलावंत, साहित्यिकांपासून खेळाडूंपर्यंत कोणीही केव्हाही हक्काने 'ठाणे वैभव'कडे येतो आणि आपले मन मोकळे करतो. म्हणून वैदिक विद्वानांच्या सत्काराचे मला प्रेमाचे निमंत्रण येते, तसेच अंजुमन तरक्की-ए-उर्दूच्या कार्यकारिणीवरही अगत्याने घेतले जाते. रेल्वे मजदूर युनियनच्या कार्यालयाचे उद्घाटन करायचा माझा काय अधिकार? पण लोकांनी मला तो बहाल केला आहे. 'दसरा–ईद मिलान' सोहळ्याला मुसलमान बांधवांना मीच अध्यक्ष हवा असतो आणि अ. भा. विद्यार्थी परिषद रक्तदान शिबिराचे उद्घाटन करायला मलाच प्रेमाने निमंत्रण देते.

हे सगळे मी सांगतो, ते वैयक्तिक मोठेपणा म्हणून नव्हे. हे प्रेम मला लोकांनी दिले आहे. ते 'ठाणे वैभव' मुळे. हे यश संपादकाच्या त्या खुर्चीचे आहे.

या जिल्ह्यात दैनिकास पोषक परिस्थिती नाही, असा तथाकथित 'अनुभवी' पत्रकारांनी कितीही कंठशोष केला तरी, 'ठाणे-वैभव' तशी पोषक परिस्थिती नसताही यशस्वी झाले आहे, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. शहराप्रमाणेच ग्रामीण व आदिवासी भागातही 'ठाणे वैभव' लोकप्रिय झाले हे विशेष.

आता व्यावहारिक बाजूबद्दल बोलायचे तर 'ठाणे वैभव'ला पहिल्या वर्षी आलेला तोटा केवळ प्रचंड आहे. जाहिरातींच्या नावाने पहिल्या वर्षी तर आनंदच होता. ठाणे व डोंबिवली नगरपालिका आणि अधूनमधून 'सिडको' याव्यतिरिक्त जाहिराती जवळ जवळ नव्हत्या. पहिले वर्षभर आम्हाला स्वतंत्र जागा नव्हती. माझ्या घराच्या पुढच्या खोलीचेच कार्यालय व जुळणी विभागात रूपांतर केले होते. एकीकडे जुळणी, दोन मैलांवरच्या मुद्रणालयात छपाई, शिवाय आरंभी मिळालेले काही अप्रामाणिक जुळारी, विक्रेते, वार्ताहर व जाहिरात एजंट यांनी आरंभकाळात 'ठाणे वैभव'चे अतोनात नुकसान झाले.

धंद्यात आर्थिक अडचण उभी राहिली तर कधीही हाक मारा, असे तोंड भरून सांगणाऱ्यांनी ऐनवेळी तोंडघशी पाडले. ज्यांच्या ज्यांच्यावर आम्ही अंकनिर्मितीसाठी अवलंबून होतो, त्यांनी जास्तीत जास्त अडवायचे नीच प्रयत्न केले. त्या सगळ्याला मी कसे काय तोंड देऊ शकलो, याचे आज माझे मलाच आश्चर्य वाटते. या सर्व वेळी पत्नी व आई यांनी मला फार मोठे मनोधैर्य दिले.

पण कधी कधी अनपेक्षित ठिकाणांहून अत्यंत मोलाची मदत मिळाली. डॉ. शांताराम आपटे यांनी त्यांचे–माझे मित्र श्री. विष्णू रत्नपारखी यांच्या मध्यस्थीने 'ठाणे वैभव'च्या वाढत्या व्यापास अगदी मध्यवस्तीत आपल्या इमारतीतली जागा दिली, हा अजूनही माझ्या परिचितांनाच काय पण मलाही चमत्कार वाटतो. खऱ्या अर्थाने 'ठाणे वैभव'चे पाय रोवले गेले ते या वास्तूमुळे.

आता यथाकाल 'ठाणे वैभव'चे मुद्रणालय होईल. आकार वाढवायचा आहे. ब्रिटिश काउंटी वृत्तपत्रांच्या धर्तीवर दैनिक चालवण्याचे माझे स्वप्न तेव्हा अधिक प्रकारे साकार होईल.

सहसा मी कधी मागे वळून पाहत नाही, पण आज एक शेर आठवतो—

इस तरह तय की हैं हमने मंझिलें
गिर पडे, गिरकर उठे, उठकर चले ! □


Cable : WESTINGLAS Phone : 386644

With Best Compliments from :

WESTERN INDIA GLASS WORKS LTD.

20, ALTAMOUNT ROAD, BOMBAY 400 026.

Always insist on

# FABINA®

**SUITINGS & SHIRTINGS**

## Mfg. : Fabina Textile Pvt. Ltd.

Registered Office :

**Balrajeshwar Road, Mulund,**

**Bombay 400 080**

## BRAHANS RUBBER PRIVATE LIMITED

Grams : " BRAHANSPRO "

*Worhs & Offices*

16 A Mahal Estate
Mahakali Caves Road
Audheri (East)
Bombay–400 093

Tel. : 562364

*Workes*

15 Bharat Industial Estate
Ram Mandir Road
Goregaon (East)
Bombay – 400 063

Tel. : 695311

*Manufactires of*

Moulded & Extruded Rubber Components from Natural, spnthetic and Ebonite Rubber for sugar, Textile, Rayon, Engineering, Eleetrical Chemicnl, Agricultural and Pharmaceutical, Organisations. Hose pipes and Tubings out of Natural and synthetic Rubber.

AND

**Quality Rubber Compounds**

# ठाण्यातल्या मैदानांवरून...

खंडू रांगणेकर

ठाण्यातल्या मैदानांना उतरती कळा लागलेली आहे. साहजिकच त्याचा परिणाम ठाण्यातल्या क्रीडाक्षेत्रांवर झालेला आहे. माझ्या आठवणीत, काही वर्षांपूर्वी ठाण्यातली मैदानं खेळाडूंनी फुललेली असायची. उत्तमोत्तम सामने तिथे खेळले जायचे. भारतीय व महाराष्ट्र पातळीवर क्रीडा-स्पर्धा गाजवणारे नामांकित खेळाडू ही मैदानं मारीत असायचे. आज हे सर्वच आस्ते आस्ते कमी होत् चाललंय.

आजचं पोलीस परेड मैदान पूर्वी बी. जे. हायस्कूलच्या अखत्यारीत होतं. तर जेलच्या बाजूच्या तळ्याजवळील मैदान म. हो. विद्यालय वापरायचं. ह्या ठिकाणी आज चर्च उभं आहे. आज जिथे पोलीस क्वार्टर्स उभी आहेत, तिथेही पूर्वी सुंदरसं मैदान होतं. 'ठाणा यंग क्रिकेटर्स' ह्या मैदानाचा सरावासाठी उपयोग करीत. क्रिकेटचे सामने मात्र प्रामुख्याने सेंट्रल मैदानावरच खेळले जायचे.

माझ्या ठाण्यातल्या क्रीडाजीवनाच्या आठवणींच्या काळात प्रामुख्यानं दोनच शाळा नावारूपाला आलेल्या होत्या. बी. जे. हायस्कूल आणि एम. एच. हायस्कूल. त्या वेळी आंतरशालेय क्रिकेट स्पर्धा होत नसायच्या. पण ह्या दोन शाळांमधला सामना म्हणजे अक्षरशः मेजवानी असायची. ऑक्स्फर्ड आणि केंब्रिज विद्यापीठांमध्ये दर वर्षी गाजणाऱ्या, क्रिकेट–जगाचं लक्ष वेधून घेणाऱ्या सामन्यांची आठवण करून देणारा! घासलेटचे रिकामे डबे, झांजा आणि शिट्या ह्यांना सामनाभर नुसता ऊत यायचा! दोन्ही शाळांचे विद्यार्थी आणि शिक्षक दोघांचाही उत्साह ह्या सामन्याच्या वेळी ओसंडून वाहायचा. म्हसोबाला ही मंडळी कौल लावायची मैदानात उतरण्यापूर्वी, तर जेलमधल्या मारुतीला नवस बोलायची. पैजांची प्रेक्षकांमध्ये खैरात उडायची. ह्या सामन्यांची आज नुसती आठवण झाली, तरी मन त्यात तासन् तास गुंगून जातं.


आजच्या इतका औद्योगीकरणाचा विस्तार तेव्हा ठाण्यात नव्हता. साहजिकच, कंपन्यांचे संघही नव्हते. पण खाजगी क्लब आणि संघ ह्यांची मात्र रेलचेल होती. त्यांच्यातले सामनेही असेच रंगायचे. इतके की, त्या सामन्यांनंतरच्या काव्यात पुढचे एक–दोन आठवडे कसे निघून जायचे, त्याचंही भान नसायचं! ठाणा यंग क्रिकेटर्स, ठाणा फ्रेंड्स युनियन, न्यू हिंद क्लब, झोरास्ट्रियन क्रिकेट क्लब, आनंद भारती, युनायटेड स्पोर्टस् क्लब, माणिक भारती, बोहरा क्रिकेटर्स, यंग स्टार्स वगैरे नावं आजही माझ्या डोळ्यासमोर, ठाण्यातल्या जुन्या क्रिकेटचा विचार करता उभी राहतात. खत्तलवाडा भागातल्या ख्रिश्चन तरुणांचा एक संघ त्या वेळी फार प्रभावी होता. दुर्दैवानं त्या संघाचं नाव मात्र मला आठवत नाही.

चाळीसएक वर्षांपूर्वीच्या त्या काळात ठाण्यातल्या क्रीडापटूंनी, विशेषतः क्रिकेटपटूंनी, मुंबईची मैदानंही खूप गाजवली होती. चौरंगी सामन्यांचा तो काळ. राम देशपांडे हे माझे क्रिकेटमधील गुरू. त्यांनी मला खूप काही शिकवलं. ते स्वतः चौरंगी सामन्यांत, हिंदूतर्फे खेळत. त्याचप्रमाणे त्या वेळचे पारशी संघांतून खेळणारे केकी तारापोर आणि होमी प्रिंटर ह्यांचाही माझ्या क्रिकेट जीवनावर चांगला ठसा उमटलेला आहे. मी स्वतःदेखील अल्बर्ट अल्मेडाबरोबर चौरंगी सामन्यातनं इतरांतर्फे ( Rest of Bombay ) खेळलेलो आहे.

स्मृतींची सहजी जरी चार पानं चाळली तरी ठाणे क्रिकेट गाजवणाऱ्या अनेक व्यक्तींची नामावली डोळ्यासमोर उभी राहते. मोरू गुप्ते, जगन पाटील, किलजी, एक्या कानडे, रंग्या लोखंडे, जया प्रधान, डॉली टाटा,...वगैरे वगैरे. माझे हे सर्व त्या वेळचे हिरो होते. के. आर. कोळी आणि भावे ह्यांनी त्या काळी मुंबईतली कॉलेजची मैदानं गाजवून सोडली होती. भावे तर त्या काळच्या जबरदस्त झेवियर्स कॉलेज संघाचा कर्णधार होता. मी तर भावेला ठाणे–क्रिकेटचा उद्गाताच म्हणेन, इतके त्याचे ठाणे क्रिकेटवर उपकार आहेत. आणखीही काही नावं आठवतात. भाईसाहेब कोतवालांची वामनमूर्ती तुफान वेगानं गोलंदाजी करीत असे. आजही वेगवान गोलंदाजांअभावी भारतीय क्रिकेटची स्थिती खूपदा केविलवाणी होताना दिसते. पण भाईसाहेब कोतवालांची गती आठवली की, अजूनही वाटते, दोनचार कोतवाल पुन्हा एकदा भारताला मिळावेत. ठाणे बार असोसिएशनच्या क्रिकेट संघातर्फे खेळणारे सबनीस ह्यांनीही असंच त्या वेळी ठाणं गाजवलं होतं. धोतर नेसून क्रिकेट रुबाबात खेळणारी त्यांची उंचीपुरी मूर्ती आजही डोळ्यासमोरून हलत नाही.

ह्यावरून आठवण झाली. माधवराव हेडगे आणि यशवंत नाखवा यांची. 'धोती'वरच त्या काळी तडफदार खेळ करून त्या काळी टेनिसची कोर्टं गाजवीत होते पण महाराष्ट्र-भर टेनिसची मैदानं गाजवली ती मात्र ठाण्याच्या रणदिवे पितापुत्रांनी. त्या वेळी ठाण्यात टेनिससाठी तीन कोर्टं होती आणि तिन्ही ठिकाणी नंबर लागलेले असायचे.

आज ठाण्यात डिस्ट्रिक्ट ॲसोसिएशन खेळासाठी आहे. परंतु तरीही २५ ते ४० वर्षांपूर्वीच्या ठाण्यातली क्रीडाविषयक हालचालींची सर आजच्या ठाण्याला येत नाही.



*With best Compliments from :*

**Shrikrishna Brush Co.**

Naupada, P. O. Thana – 2, Bombay

*Manufacturers of :*

Flat Paint Brushes, Steelwire Brushes
and House-Hold Brushes
on Govt list

Tel. : 591129 (Bombay)

*With best Compliments from :*

**ORNATE CHEMICALS PRIVATE LIMITED**

8, Rama Niwas Opp. School No. 19,
Vishnunagar, Naupada, Thane 400 602.

Tel. : 595749

*With best Compliments from :*

**JUPITER ENGINEERS**

**Manufacturer of Plant and Equipment
for Chemicals, Pharmacentical,
Dairy and food Industries.**

**Fabricators and Manufacturer
of spare parts**

Plot No. 195, 16th Road
Wagle Estate, Thane

Phone : 594559

आकर्षक दिवे, प्रेझेंटेबल्स,
शिसवी देव्हारे व फर्निचर, उत्कृष्ट लाकडी फर्निचर
योग्य भावात मिळेल

**कांचन ट्रेडर्स**

प्रोप्रायटर : राजेंद्र देसाई

आम्ही रॅमन बोनस स्टँप देतो.

ESTD 1902

Phone : 321215 — Gram : PERFORATED

**ZENITH IRON WORKS**

*Manufacturers of :*

Exparded Metals, wire Neetting, Barbed wire
Perforated sheets, welded Mesh, Steel furniture
Collapsible Gates, window grills,
Compound gates, Rolling shutters

**Dealers in cement sheets & wooden furniture**

*Factory* : Agra Road, Mulund, Bombay 400 080

*Show Room* : 30 Nakhola Street,
Bombay 400 003.

मैदानी आणि बैठ्या खेळांनी, खेळांच्या स्पर्धांनी ठाण्यातली मैदानं तेव्हा सतत गजबजलेली असायची. व्हॉलिबॉल, फूटबॉल, टेबलटेनिस, बॅडमिंटन, कॅरम, खोखो, कबड्डी, आट्यापाट्या आणि विटीदांडूदेखील—अतिशय चुरशीने सामने खेळले जायचे.

आज क्लब्स वाढलेले आहेत. खेळाडूंची, विद्यार्थ्यांची संख्याही वाढलेली आहे. त्या त्या खेळांसाठी, जिल्हा पातळीवरच्या प्रातिनिधिक संस्थाही अस्तित्वात आलेल्या आहेत. एवढं असूनही खोखो–कबड्डी वगळता, गुणवत्तेच्या दृष्टिकोनातून पाहू गेल्यास, ठाण्यातल्या खेळाचा दर्जा घसरलेला आहे असं नाइलाजानं म्हणावं लागतं. नव्या नव्या इमारतींमुळे मैदानं कमी झाल्याचा हा परिणाम असेल कदाचित. किंवा आहारातला चौफेरपणा, सकसपणा कमी झाल्याचाही तो परिणाम असेल. त्याचबरोबर, तरुण वर्गाला मोहविणाऱ्या अनेकविध स्थळांचाही ठाण्यातल्या खेळावर परिणाम झालेला असावा. चित्रपट, लोकनाट्य, नाटकं, शिवाजीपथ, तलावपाळी किंवा ठाणे चौपाटी, उद्यानं—मैदानांपेक्षा ह्या ठिकाणी तरुणांची हल्ली झुंबड उडते. मैदानं ओस पडतात. हा कदाचित आजच्या आपल्या राहणीमानाच्या परिस्थितीतलाच दोष असावा.

ह्याचा अर्थ ठाण्यातलं क्रीडाविश्व साफ थंड आहे, असंही नाही. हनुमान व्यायाम शाळा, मावळी मंडळ, युनायटेड स्पोर्टस क्लब, आनंद भारती, आर्य क्रीडामंडळ, उमा नीलकंठ व्यायाम शाळा, वगैरे संस्था आजही ठाण्यातल्या खेळाच्या प्रसारासाठी, वाढीसाठी भरीव कामगिरी करत आहेत. ॲथलेटिक्स, रिंगटेनिस, बास्केटबॉल वगैरे खेळांची लोकप्रियता वाढत आहे, तर खोखो, कबड्डी खेळाचा दर्जा उंचावलेला आहे. क्रिकेटच्या क्षेत्रापुरतं बोलायचं तर तिथेही खूप आशादायक चित्र आहे. गुलाम शेख ह्या नवोदित डावखोऱ्या मंदगती गोलंदाजानं खूपच आशा ठाण्यासाठी निर्माण करून ठेवल्या आहेत. ठाणे क्रिकेटच्या आजच्या वाढीला जे. के. 'सारखे औद्योगिक समूह देखील चांगला हातभार लावत आहेत. जे. के. च्या क्रिकेट संघात आज अमरनाथ बंधू, कर्सन घावरी आदींचा समावेश आहे. जे. के. क्रिकेट संघाप्रमाणेच, टेकसनचे हॉकी— फुटबॉल संघही ठाण्याच्या आशा पल्लवीत करीत आहेत. जे. के. चा व्हॉलीबॉल संघही उत्कृष्ट आहे आणि ठाण्यातला व्हॉलीबॉलपटू पारकर राष्ट्रीय संघात प्रवेशासाठी आज दार ठोठावत आहे. 'कलरकेम–लायन्स क्लब' ह्यांनी एकत्रित येऊन खुल्या टेबल-टेनिस स्पर्धा भरवायला सुरुवात केलेली आहे.

चित्र जरी असं अगदी निराशाजनक नसलं तरी मला वाटतं, ठाण्यात अजूनही खूप करता येण्याजोगतं आहे. विशेषतः प्राथमिक व माध्यमिक शालेय पातळीवर नित्यनियमित सराव, वेगवेगळ्या पातळींवरच्या स्पर्धा ह्यांतून ठाण्याच्या क्रीडाविश्वाला उत्कृष्ट कामगिरी पार पाडता येईल. लायन, रोटरी, जेसीसारख्या संस्था, शाळा–कॉलेजे, ठाणे परिसरात अफाट पसरलेल्या औद्योगिक संघटना व स्थानिक स्वराज्य संस्था ह्यांनी ह्या बाबतीत एकत्रित येऊन भरीव उपाय योजले तर ठाण्यातल्या खेळाचा दर्जा उंचावणं, त्याला पुन्हा जुनं वैभव प्राप्त करून देणं अशक्य नाही. □

---

**ठाणे पुरवणी : आणखी काही मुलाखती – व्यक्तिपरिचय : पुढील अंकी.**

---


Cable : GLASSUNIT Phone : 386644

With Best Compliments From :

# GENERAL GLASS CO. PVT. LTD.

**20, ALTAMOUNT ROAD, BOMBAY 400 026.**

सहकाराशिवाय मला अननुभूत शक्ती, मान व सामाजिक
उद्दिष्टे असलेला दुसरा मार्ग माहीत नाही ........ —इंदिरा गांधी

समाजातील सर्व स्तरातील नागरिकांबरोबर संपर्क साधून जिल्ह्याचा विकास सहकारी अर्थव्यवस्थेतून घडविणारी एकमेव बँक............

# दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, ठाणे

मुख्य कार्यालय : १५–४ छत्रपती शिवाजी पथ, (पो. बॉक्स नं. १९) ठाणे
दूरध्वनी क्रमांक : ५९३८३६ व ५९३०१४

**आर्थिक स्थैर्य ३१–१२–१९७६**
(आकडे लाखात)

| | |
|---|---|
| भांडवल व निधी .... | रु. १७४·०३ |
| ठेवी .... | रु. ९०६·९५ |
| दिलेली कर्जे .... | रु. ६४४·२९ |
| खेळते भांडवल .... | रु. ११८६·७० |

**आपल्या ३४ शाखांमार्फत सेवेस तत्पर**

जी. बी देशपांडे
व्यवस्थापक

बा. ना. भोईर
उपाध्यक्ष

वि. द. खाडे
अध्यक्ष



Winners of

## G. S. PARKHE INDUSTRIAL MERIT AWARD - 1976

CALPANA CHEMIE - TECHNICK

Phone : 593515
CABLE CALTECH,
THANE

P. O. Box 203
1/32, Calpana Sahaniwas
GHANTALI THANE 400 602

*Contact us for*

Swiss made Anemometers – Therms Air, Micro Air, Mini Air

*Manufacturers of*

Horizontal Mixers, Vertical Come - Screw Mixers, Salt Grinders, Swarf Crushers, Metal Chips Crushers, Continuars Oil tractors, Industrial Dryers, Fluid Bed Dryers, Air Blowers, Exhausters. Centrifuges, Air Conveyor Dryers.

FACTORY : W - 60, MIDC. DOMBIVLI ( EAST )

हिंदी चित्रपट

## अभिनयात जान आहे पण कथा निष्प्राण

# जिंदगी

शिरीष सहस्रबुद्धे

जिंदगी या नावाचा हा कितवा चित्रपट असेल कोण जाणे. अर्थात त्याला जिंदगी हे नाव देण्याचं कारणही अज्ञातच म्हटलं पाहिजे. कारण हे नाव सार्थ ठरावं असं काही श्रेष्ठ जीवनदर्शन त्यात घडवल्याचं कुठेच दिसत नाही. जीवनाचं एक रूप, एक तुकडा, एक प्रवाह त्यात दिसतो हे खरं, पण त्यात विशेष असं काय आहे? जीवनाचं दर्शन–मग ते जीवन वास्तव, सत्य, यथार्थ असेल, किंवा कल्पनारम्य–मनोरंजक–बेगडी–नाटकी – अवास्तव–स्वप्निल–भ्रामक वगैरे असेल–ज्यात घडत नाही, अशी कलाकृती आढळणं जवळ जवळ अशक्यच नाही काय? अशा स्थितीत एखाद्या सूडकथेला किंवा रक्तपाती गुन्हेगार कथेलाही जिंदगी म्हणायला काय हरकत आहे? किंबहुना सर्वंच चित्र–नाटकांना हे नाव द्यायला काहीच हरकत नाही. एनी वे, नावाबद्दल इतका काथ्याकूट करायलाच हवा होता असं नाही, पण एन. सी. सिप्पी–हृषिकेष मुकर्जींच्या जोडीनं यापूर्वी अनेक चांगली चित्रं दिलेली आहेत. त्यांनीच ‘जिंदगी’सारखं नावापासूनच ढिसाळ आणि दुय्यम दर्जाचं (sub–standard) चित्र द्यावं, याचा विस्मय आणि खेद वाटला एवढंच.

सारांश, शीर्षकात म्हटल्याप्रमाणे ‘जिंदगी’ प्रेक्षणीय ठरली आहे, ती केवळ संजीवकुमार – मालासिन्हा या जोडीच्या अफलातून अभिनयामुळे. इतर बाबी फारशा उल्लेखनीय नसल्यानं त्यांचा नामोल्लेख नंतर करू. संजीवकुमारची ही म्हाताऱ्याची कितवी भूमिका आहे, हे खुद्द त्यानं तरी मोजलं असेल की नाही शंका आहे. पण त्याच्या म्हाताऱ्याच्या भूमिका निवडल्या तरी त्यात साम्य, तोचतोचपणा शोधून काढणं खूप कठीण आहे. जिंदगीमधल्या त्याच्या भूमिकेचं (शुक्लाजी), ‘अर्जुन पंडित’मधल्या त्याच्या अर्जुनच्या भूमिकेशी नातं सांगता येईल, अर्थात लांबचं. पण अर्जुन पंडितमधली त्याची भूमिका बरीचशी रंगेल, दणकट, ठणठणीत आहे. जुनं होऊनही गुळगुळीत न झालेल्या नाण्यासारखी. म्हातारपणीही. शिवाय या भूमिकेला अर्जुन ‘सरदारा’च्या पूर्वाश्रमाच्या जीवनप्रवाहाचीही भक्कम बाजू आहे. त्या मानाने शुक्लाजींची भूमिका पक्की मध्यमवर्गीय, कमी elevated आणि मातीशी जास्त नातं सांगणारी–down to earth–अशी आहे. संजीवच्याच ‘आंधी’मधल्या किंवा ‘मौसम’-मधल्या प्रौढ भूमिकेचा एखादा धागा शुक्लाजींच्या भूमिकेत आहे, असा भास होतो. चित्रपटाची सुरुवातच शुक्लाजींच्या निवृत्तीपासून होते. बरेचसे केस पांढरे, क्वचित कुठे टकलाचाही भास, नाकावर घसरणारा लठ्ठ काचांचा जुनाट गोल चष्मा, बंद गळ्याचा खास कारकुनी कोट–थोडक्यात म्हणजे हेडक्लार्कच्या खुर्चीशिवाय इतर कुठंही फिट बसणार नाही, असा साचेबंद अवतार घेऊन संजीव या चित्रपटात वावरला आहे. सुरुवातीचा प्रसंग सोडला तर बहुतेक चित्रपट त्याच्या घराच्या आणि पर्यायानं श्रीयुत किंवा श्रीमती शुक्लांच्या अवतीभोवतीच फिरला आहे. निवृत्तीच्या समारंभातलं त्याचं भाषण, घरातल्या, घरगुती आनंदातला त्याचा इंटरेस्ट, मुलांनी मातापित्याच्या ताटातुटीचा प्रस्ताव मांडल्यानंतरची त्याची प्रतिक्रिया, आपला भाचा प्रभू याच्याबरोबरचं त्याचं दुपदरी वागणं आणि सगळ्यात प्रभावी ठरणारं त्याचं पत्नीबरोबरचं टेलिफोनवरचं संभाषण–हे आणि असे अनेक प्रसंग संजीवच्या समर्थ अभिनयानं या चित्रात सजीव–सुंदर झाले आहेत. टेलिफोनवरच्या संभाषणाच्या उल्लेखावरून आठवण झाली ती सौ. सरोज शुक्लाच्या भूमिकेनं. माला सिन्हानं संजीवला दिलेल्या तोडीस तोड अप्रतीम साथीची. बुलंद! इतका जबरदस्त आणि तुल्यबल–समतोल अभिनय करणारी ताकदीची जोडी यापूर्वी किती वेळा पडद्यावर आली असेल, निदान अलीकडच्या काही वर्षांत, कुणास ठाऊक? माला सिन्हा ही जुनी अभिनेत्री, पण इतका प्रत्ययकारी आणि जिवंत अभिनय तिनं यापूर्वी किती चित्रपटांत केला असेल, हे खरोखरच तिलाच विचारणं योग्य होईल. निदान माझ्या डोळ्यांसमोर तिची प्रतिमा तिच्या पिढीतल्या सर्वसामान्य साचेबंद ‘खास हिंदी’ चित्र-नायिकांपेक्षा वेगळी नव्हती. ती ‘जिंदगी’ पाहिल्यानंतर साफ बदलावी लागली. अर्थात त्यात आनंदच वाटला. मात्र तिंची अनेक एक्स्प्रेशन्स आणि संवादफेक काही वेळा मीनाकुमारीची आठवण करून देतात. त्यातनं लाभणारा पुन:प्रत्ययाचा वगैरे आनंद जमेत धरला तरी मुळात ती काही फारशी सुखद बाब नव्हे. संजीव'कुमारला म्हाताऱ्याच्या भूमिकेत पाहायला सरावलेल्या डोळ्यांना माला सिन्हानं त्याच्यावर मात केल्यासारखं वाटणं अशक्य नाही. कदाचित ती वस्तुस्थितीही असू शकेल. मला या तुलनेत फारसा रस नाही. तथापि माला सिन्हाची ही भूमिका आणि संजीव–मालाची ही जुगलबंदी दीर्घकाल स्मरणात राहील हे निर्विवाद.

या वृद्ध जोडीसमोर चित्रपटात तीन तरुण जोडपी आहेत. विनोद मेहरा–मौसमी चटर्जी, अनिल धवन–अरुणा इराणी आणि राकेश पांडे–अलका. यांची नावं दिली हेही खूप झालं. ए. के. हनगल आणि लीला मिश्रा हे एक वृद्ध जोडपंही आहे. प्रभू ऊर्फ देवेनवर्मा नावाचा एक धंदेवाईक छापातनं काढलेला ब्रह्मचारीही आहे. अर्थात चित्रपट शुक्लादांपत्यानं केव्हाच आपल्या नावे लिहून टाकला आहे. राजेश रोशनचं संगीत बरं आहे. विशेषत: ‘मैं ना बोलू’ हे गीत. उरलेल्या दोनांपैकी एक पारंपरिक द्वंद्वगीत. ते बालिश आहे. दुसरं समूहगीत सुसह्य आहे. पण एकंदरीत तीनही गाणी घुसडल्यासारखीच.

चित्रपटाच्या निष्प्राण कथेबद्दलही लिहायला हवंच. कथानकाचा एकूण मामला गुजराती पद्धतीचा, अतिनाट्यात्मक जिन्नस मद्रासी धंदेवाईक फॉर्म्युलाच्या तेलात तळून काढल्यासारखा आहे. हृषिकेष मुकर्जींनी सादर केलेल्या चित्रपटाचे कथानक (मग त्याचे दिग्दर्शक रवी टंडन असेनात का.)

इतकं सवंग, तकलादू आणि अजागळ किंवा (किंवा कदाचित गल्ल्यावर डोळा ठेवून पद्धतशीरपणे बेतलेलं) असावं याचा खेद वाटतो. पुण्या-मुंबईत इतर कथा घडत असताना विनोद-मौसमी म्हणे नैनितालला शिकायला असतात, आणि तेही फक्त बी. ए. होण्यासाठी ! एक द्वंद्वगीत बऱ्या पार्श्वभूमीवर टाकता यावं म्हणून एवढी बुद्दू तडजोड? पुन्हा नैनितालपर्यंत जाऊन शिकल्यानंतर तिला अक्कल काय येते ती एवढीच की, आईवडिलांना आधार देण्यासाठी ती प्रेमवीर बिनोद सोडून बडे बापके व्हिलन बेटे मनजीत-बरोबर शादी करायला निघते. निदान विनोदला पहिला चान्स तरी द्यायचा प्रेमासाठी त्याग करायचा ! शुक्लाजी मुलांच्या पालनपोषणासाठी म्हणे ४१,००० रु. कर्ज करून ठेवतात आणि कर्त्या झालेल्या मुलांना कळूही देत नाहीत. कथानकातले असे अनेक कच्चे दुवे सोडून दिले तरी भडक आणि ठिसूळ दिग्दर्शन—पटकथासंवादलेखनाचा प्रश्न उरतोच. विशेषतः मध्यंतरानंतर घटना—संवाद अनेकदा अतिनाट्याकडे—मेलोड्रामाकडे झुकताना दिसतात. कारुण्य गडद करण्यासाठी अतिशयोक्तीपेक्षा उनोक्ती (undertone) अनेकदा अधिक प्रभावी ठरू शकते, हे आपल्याकडच्या शोकात्मिकाकारांना कधी उमजणार ? हृषिकेष-सिप्पींशी संबंधित असलेलं चित्र कौटुंबिक जिव्हाळायुक्त रडारडीच्या प्रांतात घुसेल अशी शंका स्वप्नातही आली नाही. अशावेळी, वस्तुतः श्रेष्ठ शोकात्मिका ठरावी अशा 'आनंद' चित्रपटाची हृषिद्रांनी केलेली कलात्मक आणि हलकीफुलकी पण परिणामकारक हाताळणी आठवल्यावाचून राहात नाही. त्यांचा जुना 'आशीर्वाद' किंवा अलीकडचा 'मिली' या दोहोतही, वाव असूनही त्यांनी अतिनाट्याचा मोह टाळलाय, याचीही आठवण येते आणि मग 'जिंदगी' मधलं भडक अतिनाट्य अधिकच बोचतं. त्यात पुन्हा कथेत चोरूनमारून घुसवलेला मालमसाला पुष्कळ. अगदी मराठीतल्या जुन्या 'ऊन-पाऊस' चित्रपटापासून अलीकडच्या 'नटसम्राट' पर्यंत ठिकठिकाणची उचलेगिरी भरपेट केलेली आहे, मात्र शिताफी पुरेशी झालेली नाही ! नशीव, संजीव-मालाच्या अकृत्रिम अभिनयाचा आधार लाभला, एरवी ही जिंदगी असह्य-भडक-अवास्तव ठरली असती ! ☐

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## १९।२।७७ ते २५।२।७७

### बंदी घातलेल्या संघटनांबद्दल फेरविचाराची शक्यता

गेल्या काही दिवसांत भारताच्या राजकारणात दूरगामी परिणाम करणाऱ्या महत्त्वाच्या घटना घडल्या आहेत. बाबू जगजीवनराम यांनी कॉंग्रेस पक्षाला ठोकलेला रामराम व राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांचे अनपेक्षित देहावसान. हे दोन्ही नेते एकमेकांचे निकटचे सहकारी होते, तसेच ते पंतप्रधान इंदिरा गांधी यांचेही संकटकालीन पाठीराखे होते. रवी—शनीचा षडाष्टक योग व मंगळ—शनीचा प्रतियोग पंतप्रधानांच्या दृष्टीने फारसे उपकारक नाहीत. दोन महान सच्चे सहकारी दूर होणे ही घटना त्यामुळेच घडली आहे. त्यामुळे इंदिरा गांधींचा निर्धार कसाही व्यक्त होत असला तरी त्यांच्या मनाची स्थिती बरीच दोलायमान झाली तर नवल वाटू नये. कारण मकर राशीवर रवी—मंगळ व शनी यांचा दिसणारा परिणाम स्पष्ट होत आहे. अंतर्गत राजकारणात त्याचे पडसाद उमटू लागतील असे दिसते. प्रामुख्याने रा. स्व. संघ, जमाते इस्लाम, आनंदमार्ग वगैरे संघटनांवरील बंदीच्या बाबतीत फेरविचाराची शक्यता नाकारून चालणार नाही. कॉंग्रेस पक्षातील मतभेद बरेच डोके वर काढतील. त्याचा परिणाम जनता पक्षाला उपकारक ठरू शकेल. भारताची आर्थिक बाजू भक्कम होत असली तरी भाववाढीचा राक्षस उग्र बनण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात राजकीय वादळ होऊ शकेल.

---

**मेष : आर्थिक उन्नती**

ग्रहांचा राजा रवी अकरावा व मंगळ—बुध दहावे ही परिस्थिती इतकी छान आहे की, यावेळी तुम्ही अनेक क्षेत्रांत भाग्यवान व्यक्ती म्हणून नावलौकिक मिळवला तर आश्चर्य वाटू नये. नोकरी, धंदा, राजकारण या प्रत्येक क्षेत्रात तुमचे स्थान उंचावणार आहे. यावेळी तुम्ही कोणताही धंदा उभारा, त्यात मोठे यश तुमच्या पदरात पडणार आहे. रेसमध्ये अगर लॉटरीमध्ये तुम्हाला घबाड मिळण्याची शक्यता नाकारू नका. राजकारणात तुमचा प्रभाव वाढणार आहे. प्रतिष्ठा उंचावणार आहे. शेतीची परिस्थिती समाधानकारक राहील. व्यापारी लोकांनी यावेळी 'हात धुऊन' घ्यायला हरकत नाही. नोकरीत घेणे म्हणून तुम्हाला अधिकार मिळतील. अंमलबजावणी खाते, इन्कमटॅक्स खाते, पोलीस खाते या क्षेत्रांतील नोकरांना बरेच काही मिळणार आहे. मेष राशीचा कोणताही माणूस यावेळी बेकार राहणार नाही. शुभ दिनांक २०—२३.

**महिलांना :** तुम्ही नोकरीचा प्रयत्न करा. चांगली नोकरी मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** यश हाती येईल व प्रगती होईल.

**वृषभ : धंदा सुधारेल**

यावेळी अकरावा चंद्र असताना आठवडा सुरू होत आहे. चंद्र—मंगळ, चंद्र—बुध त्रिकोणयोग अगदी सुरुवातीला होत आहे, ही एक अनुकूल अशीच घटना होय. तुमचा यावेळी कोणताही धंदा असू द्या, त्यात तुमचे पाऊल पुढेच पडणार आहे. धंद्यातील मंदी नाहीशी होईल. नवीन भांडवल गुंतवणुकीस अवसर मिळेल. यावेळी तुम्ही भागीदारीत एखादे धाडस केले तरी ते यश मिळवून देईल. नोकरीची परिस्थिती बरीच समाधानकारक राहील. वरिष्ठांच्या मर्जीचा फार मोठा प्रत्यय तुम्हाला येईल. गैरसमज दूर होईल. ज्यांच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. जे सेवानिवृत्तीच्या मार्गावर असतील त्यांना मुदतवाढ मिळेल. बेकारांचा वनवास आता संपलेला आहे. यावेळी सार्वजनिक कार्यात तुम्हाला पुढाकार मिळेल. आर्थिक परिस्थिती अडचणीच्या दिव्यातून बाहेर पडून प्रगतीचे वळण घेईल. नवे स्थित्यंतर घडेल. शुभ दिनांक २१—२२.

**महिलांना :** मनःस्थिती सुधारेल. प्रसन्नता मिळून हातून नवे काही तरी घडेल.

**विद्यार्थ्यांना :** कलाक्षेत्रात यश मिळेल.

### मिथुन : राजकारणात सरशी

राशिस्वामी बुध यावेळी मंगळाच्या ताब्यात आहे. बुध हा नेहमीच परावलंबी ग्रह आहे. तो ज्याच्या सहवासात असेल त्याच्यासारखा वागतो. मंगळ आठवा आहे. स्थावराच्या कामात तरी त्याला वारसाहक्काने संपत्ती, जमीन असे काहीं तरी मिळू शकेल. कोर्टातील दावे, फिर्यादी तुमच्यासारख्या होतील. व्यापारी क्षेत्रात, वकिली व्यवसायात मोठे नेत्रदीपक स्थित्यंतर घडणार आहे. वकिली व्यवसायाला चांगले दिवस येतील. तुमच्यापैकी ज्यांना वाहन खरेदी करावयाचे आहे, म्हणजे ज्यांना ऐपत आहे, त्यांना हा काळ अनुकूल आहे. अनेक अडचणींवर मात करून यावेळी तुम्ही यशाचे शिखर गाठणार आहात. नोकरीत स्थित्यंतर होईल. चालू नोकरी बदलेल किंवा कामात मोठा बदल होईल. तो उपकारक असेल. पैशाची नेहमीची कमतरता यावेळी तरी भासणार नाही. लेखकांना सुवर्णसंधी मिळेल. शुभ दिनांक २२–२३.

**महिलांना :** लेखिकांचे नाव गाजेल. नव्या कलाकृतीची सुरुवात होईल.

**विद्यार्थ्यांना :** सर्वच बाबतीत शुभ काल आहे.

### कर्क : शुभ घटना घडतील

राशिचंद्रासमोर मंगळ आहे. शिवाय हा मंगळ मकरेत उच्चीचा आहे. रवी कुंभ राशीत आहे. तुमचा पिंड राजकारणी नाही. कला-साहित्य या क्षेत्रांत तुम्हाला मोठे स्थान यावेळी मिळू शकेल. प्रसिद्धी व पैसा या दोन्ही आघाडींवर अनेक स्वप्ने साकार होतील. यावेळी तुम्ही एखादा स्वतंत्र धंदा सुरू करावयाचा ठरवले तर त्याला आर्थिक व तांत्रिक मदत उपलब्ध होईल. तुमची परदेशी प्रवासाची इच्छा असली तर तुम्ही प्रयत्न करा. तुमची इच्छा सफल होईल. आर्थिक बाजू सुधारेल. कष्ट व श्रम या दोन्हींचे चीज होईल. काही तरी मनासारखे घडेल. लॉटरीत अगर रेसमध्ये लाभ होऊ शकेल. जमिनीचा प्रश्न सुटेल. जमीनविक्रीत लाभ होईल. शनी-मंगळाचा प्रतियोग आहे. त्यामुळे तब्येतीला जपणे आवश्यक आहे. शुभ दिनांक २०–२१.

**महिलांना :** अपेक्षित लाभ पदरात पडायला अजून थोडे थांबायला हवे.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात जास्त लक्ष देणे आवश्यक आहे.

### सिंह : वनवास संपला

राशिस्वामी रवी तुम्हाला आता खूपच अनुकूल झाला आहे. मंगळाची भरपूर कृपा आहे. गुरूचा तुमच्यावर वरदहस्त आहे. आता माघार नाही. कटुतेचे, अपमानाचे, कोंडमाऱ्याचे दिवस आता इतिहासजमा झाले आहेत. आता तुम्ही पद्धतशीर योजना आखून कोणत्याही कामात रस घेतलात तर हा आठवडा बरेच काही तुमच्या पदरात टाकील. नोकरीधंद्याची स्थिती समाधानकारकपणे सुधारेल. नोकरीतील अन्याय दूर होईल. तुम्हाला काही तरी जबाबदारीचे काम मिळेल. त्या कामामुळे तुमचे अधिकार वाढतील. धंद्यात यश व प्रगतीचे नवे पर्व सुरू होईल. बाराव्या शनीची तुम्ही पर्वा करू नका. व्यवसायात आजवर जी मंदी जाणवत होती ती कमी होईल. आर्थिक परिस्थितीला अजून काही काळ अस्थिरतेची छाया राहील. तरी पण पैशाची कमतरता नाही. शुभ दिनांक २०–२२.

**महिलांना :** नोकरीत समाधानकारक वातावरण राहील.

**विद्यार्थ्यांना :** पैशाचा व्यवहार जपून करा.

### कन्या : आर्थिक स्थितीत सुधारणा

कन्या राशीच्या लोकांना हे दिवस तसे वाईट नाहीत. पण धावपळ व धांदल, तसेच कामाची गर्दी यामुळे मिळणारा लाभ पदरात पाडून घेणे कठीण होते. मित्रहो, यावेळी तुमची अनेक कामे सहजपणे पुरी होणार आहेत. नोकरीची परिस्थिती साधारणपणे समाधानकारक राहील. वरिष्ठांची मर्जी राहील. तुमचे एखादे काम त्यांच्याकडे मांडू शकाल. आर्थिक परिस्थितीचा ताण कमी होण्याची चिन्हे दिसू लागतील. लॉटरीत भाग घ्या. आजवर नोकरीत केलेल्या कामाचे चीज होण्याची चिन्हे दिसू लागतील. दुय्यम धंद्याला चांगले स्वरूप येईल. मध्यंतरी तुमचे त्याकडे दुर्लक्ष झाले होते, त्यात आता सुधारणा दिसेल. अपेक्षित पत्रव्यवहार होईल. मनःस्थिती प्रसन्न राहील. वातावरण सुधारेल. घरगुती वातावरणात प्रसन्नता येईल. लेखनात प्रसिद्धी मिळेल. अविवाहित लोकांचे विवाह ठरतील. शुभ दिनांक २३–२४.

**महिलांना :** तब्येत सुधारेल. मनःस्थिती समाधानकारक राहील.

**विद्यार्थ्यांना :** अभ्यासात प्रगतीची चिन्हे दिसतील.

### तूळ : प्रगतीला वेग

तूळ राशीला गेले दिवस अनुकूलतेचे वरदानच मिळाल्यासारखे झाले आहे. रवी-गुरू हे दोन ग्रह तसेच मंगळ इतका अनुकूल आहे की, यावेळी जे जे मागाल ते ते 'तथास्तु' म्हणून तुम्हाला मिळणार आहे. तुम्हापैकी जे राजकारणात निवडणुकीला उभे असतील, त्यांची लोकप्रियता वाढणार आहे. तुम्ही लेखक अगर पत्रकार असाल तर तुमच्या लेखणीला भलतीच धार चढणार आहे. त्या लेखणीने विरोधकांचे मन 'घायाळ' झाल्याशिवाय राहणार नाही. नोकरीची परिस्थिती अतिशय समाधानकारक राहील. प्रमोशन मिळण्याच्या दृष्टीने हालचाली होतील. धंद्याला वळण लागेल. एखादा नवीन धंदा सुरू करायला हरकत नाही. आर्थिक बाजू बरीच भक्कम होईल. शुभ दिनांक २१–२४.

**महिलांना :** मंगलकार्यात पुढाकार घ्यावा लागेल.

**विद्यार्थ्यांना :** मनोरथ पूर्ण होतील.

### वृश्चिक : नोकरीत सुधारणा

राहू व हर्षल बारावे असताना तुम्ही कोणताही धाडसी निर्णय घेणे उचित होणार नाही. विशेष करून नोकरीत बदल करू नका. यावेळी वरिष्ठांबरोबर कोणताही मतभेद होणार नाही, याची काळजी घ्या. बेकारांना नोकरीच्या दृष्टीने काही हालचाली करता येतील. पण अजून काही दिवस थांबावे लागणार आहे. आर्थिक बाजू बळकट होण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागणार आहेत. लॉटरी–रेसमध्ये पैसे मिळू शकतील. परंतु त्याच्या आहारी जाऊ नका. नवा धंदा कोणताही करा. भागीदारी मात्र करू नका. प्रवासाचा योग आहे. परदेशी प्रवासास अनुकूलता आहे. संसारात एखादे नवे स्थित्यंतर होण्याची शक्यता आहे. स्थावराचे तंटे वाढवू नका. तडजोडीवर भर देणे उचित होईल. शुभ दिनांक २१–२४.

**महिलांना :** मनःस्थिती शांत राहण्यासाठी उपासना करा.

**विद्यार्थ्यांना :** भांडणापासून अलिप्त राहावे.

### धनू : नोकरीत स्थिरता

राशिस्वामी पाचवा ही तुमच्या बाबतीत एकच अतिशय भाग्याची गोष्ट होय. इतर

ग्रह बरे असोत, अथवा वाईट असोत, तुम्हाला गुरूची कृपा ही अधिक लाभदायक ठरते, असे अनुभवाने पटते. यावेळी तुम्हाला रवी–मंगळाची साथ उत्तम आहे. शनी–मंगळाचा प्रतियोग व रवी–शनीचा षडाष्टक असे सध्या होत आहे. ते तुम्हाला हितकारक नसले तरी प्रतिकूल मात्र नाहीत. तुम्ही मनात जे ठरवले असेल ते पार पाडण्याचे मनोधैर्य तुम्हाला प्राप्त होणार आहे. सण, व्रतवैकल्ये, धार्मिक अध्ययन वगैरे पार पडेल. नोकरीच्या दृष्टीने फार मोठ्या उलाढाली घडणार नाहीत. मात्र नोकरीतील अस्थिरतेची स्थिती बदलणार असून अडचणी लवकर दूर होतील. आर्थिक बाजू बऱ्याच प्रमाणात लाभदायक ठरेल. कुणाकडे काही येणे असेल तर ते वसूल होऊ शकेल. प्रवास सुखकारक होईल. शुभ दिनांक २३–२५.

**महिलांना** :–नोकरीचे प्रयत्नात यश येईल.

**विद्यार्थ्यांना** : परीक्षेत यश मिळेल.

### मकर : खबरदारी घ्या

आजवर एकट्या शनीने तुम्हाला बरीच साथ दिली आहे. त्याने तुमची धाडसी वृत्ती बरीच जोपासली आहे. राशीस्वामी शनी चंद्रासमोर कर्क राशीत आहे. पण सध्या शनी–मंगळाच्या प्रतियोगाची बरी–वाईट फळे तुम्हाला थोडीफार तापदायक ठरणार आहेत. विशेष करून तुम्ही ज्या क्षेत्रात काम करता, त्या क्षेत्रात तुम्हाला स्पर्धक निर्माण होणार आहेत. राजकारणात तर थोडी फार विचित्र परिस्थिती होणार आहे. सहकारी तुमच्याबरोबर निष्ठेने राहतील, अशा भ्रमात तुम्ही राहू नका. राजकारणात यांचा प्रत्यय अधिक मोठ्या प्रमाणात येणार आहे. नोकरीबाबत काय बोलावे? तुम्ही गुणी माणसे दुखवून ठेवली आहेत. ती यावेळी तुमच्याविरुद्ध उचल खाणार आहेत. वरिष्ठांकडे, तुमच्याविरुद्ध कागाळ्या करू लागणार आहेत. शारीरिक व मानसिक स्थिती बरीच दोलायमान राहील. शुभ दि. २१–२२.

**महिलांना** : तब्येतीची काळजी घेणे आवश्यक आहे.

**विद्यार्थ्यांना** : अभ्यास चिकाटीने करणे आवश्यक आहे.

### कुंभ : राजकीय प्रतिष्ठा

रवी राशीत आहे, तर मंगळ बारावा आहे. कुंभ राशीच्या लोकांना संमिश्र स्वरूपाचे अनुभव येणार आहेत. एखादी गोष्ट अनुकूल घडेल तर एखादी गोष्ट लगेच प्रतिकूल देखील घडू शकेल. शनिप्रधान अशी आपली रास राजकीय धूर्तता व कौशल्यांची प्रतीक आहे. अशा वेळी तुम्ही जर राजकारणात एक व्यक्ती म्हणून वावरत असाल तर तुमचे महत्त्व फारच वाढणार आहे. प्रतिष्ठा वाढणार आहे. नोकरीची स्थिती अतिशय समाधानकारक राहील. बराच बदल अपेक्षित आहे. प्रामुख्याने अनेक दिवस मागे पडत चाललेली प्रमोशन–कामे आता सहज घडून येतील. बारावा मंगळ थोडा–फार विरोध वाढवणार असला तरी त्यामुळे प्रत्यक्षात नुकसान होणार नाही. बेकारांना आता फार दिवस रिकामे राहावे लागणार नाही. विवाहाचा प्रयत्न यशस्वी होईल. आर्थिक बाजू थोडी फार सुधारली तरी मोठे वायदे करू नये. रेसमध्ये बरे व वाईट असे दोन्ही प्रकारचे अनुभव येतील. शुभ दिनांक २२–२४.

**महिलांना** : नोकरीत बढती मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : भांडण व संताप यापासून अलिप्त राहा.

### मीन : अत्यंत सावध राहावे

गुरूची सात्त्विकता व धार्मिकता ही तुमच्या राशीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. तुमच्या राशीचा स्वामी गुरू आहे. सध्या गुरू दुसरा असून तो आठवड्याच्या मध्यास तिसरा होणार आहे. त्यावेळी तुम्ही जे काही घडवू शकाल ते लाभदायक ठरणार आहे. तुम्ही लेखक, पत्रकार असाल तर तुमच्या लेखणीला धार चढणार आहे. तुमची लेखक म्हणून लोकप्रियता वाढणार आहे. लेखनाच्या साहाय्याने चार पैसे मिळवण्याचे सामर्थ्य तुम्हाला प्राप्त होणार आहे. असे असले तरी रवीसारखा ग्रह बारावा आहे, त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण बुद्धिभेद व फसवणूक असे प्रकार रवी बारावा असताना होतात. त्यामुळे अत्यंत सावध राहणे जरूर आहे. अकरावा मंगळ आर्थिक बाजू भक्कम करील. खूप पैसा मिळेल. तो वापरताना मात्र जपून वापरा. प्रवास लांबणीवर पडेल. विवाहेच्छूंचे विवाह लांबणीवर पडतील. शुभ दिनांक २१–२३.

**महिलांना** : सार्वजनिक कार्यात महत्त्व वाढेल. नोकरीत यश.

**विद्यार्थ्यांना** : लेखनाची आवड उत्पन्न होईल. □


*With Best Compliments From :*

**J. K. Helene Curtis Limited**

*Manufacturers fo*

NATURENE PERFUMED HAIR DYE
TRU TONE PERMANENT HAIR DYE
MONARCH RANCE OF PRODUCTS
FOR MEN
TIARA SHAMPOOS AND TALCUM
POWDERS
AND
TIARA BAN-DAN ANTI-DAYDRUFF
CREME SHAMPOO

**J. K. Helene Curtis Limited,**
**BOMBAY - 400 038**

Phone : 32 04 73 Gram : ' ARPANPACK '

# ARPAN

## PACKAGING INDUSTRIES

*OFFICE :* 111, KAMBEKAR STREET, BOMBAY - 400 003.

**FOR QUALITY PACKAGINGS FOR ALL INDUSTRIES**

*FACTORY :* PLOT NO. A-475, ' U ' ROAD, WAGLE INDUSTRIAL ESTATE, THANA


**18** YEARS OF SERVICES TO THE PHARMACEUTICAL INDUSTRIES

## KISHORE INDUSTRIES

*Head Office :* 174, Dr. D. N. Road, Bombay 400001.
Grams : " CONEYARNS ". Phone : 264339.

*Factory :* Samrat Silk Mills Compound, L.B.S. Marg, Vikhroli, Bombay 400079. Phone : 582067.

**TOP QUALITY NEUTRAL GLASS PHARMACEUTICAL CONTAINERS**




FOUNDER: LATE SHRI N. K. MEHRA

MANOOS ( Marathi Weekly )    75 : Paise    Regd. No. PNC-68

हार्दिक शुभेच्छा

# एक हितचिंतक

# ठाणे